किंमत १ रुपया
( वा. वर्गणी ६ रु. )

Reg. No. B. 3434 Licence No. 53.
Licenced to post without prepayment

# अर्थ

## दिवाळी अंक

वर्ष १९ | पुणें, बुधवार तारीख ४ नोव्हेंबर, १९५३ | अंक ४३


## दि बँक ऑफ महाराष्ट्र लि., पुणें

स्थापना : १९३५





### : भांडवल :

| | | | | |
|---|---|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | .. | रु. | ५०,००,००० |
| विक्रीस काढलेलें व खपलेलें भांडवल | | ... | रु. | ३२,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल | ... | ... | रु. | १६,००,००० |
| रिझर्व्ह व इतर फंड | ... | ... | रु. | ६,१६,००० |
| एकूण खेळतें भांडवल | .. | ... | रु. | १,५०,००,००० चे वर |

### : संचालक मंडळ :

श्री. वा. पुं. वर्दे (अध्यक्ष)
श्री. धों. कृ. साठे
श्री. मा. रा. जोशी
श्री. श्री. गो. मराठे, (उपाध्यक्ष)
श्री. मा. म. गुते
श्री. न. ग. पवार
श्री. मा. वी. शहा
श्री. फ. दो. पदमजी
श्री. शं. ल. किर्लोस्कर

चिं. वि. जोग
मॅनेजर.


Western India House, Poona.

कंपनीच्या वाढत्या वैभवाचें
नवें भव्य व उत्तुंग प्रतीक

# वेस्टर्न इंडिया हाऊस, पुणें

आपला दिवाळी सण असाच
वाढत्या आनंदांत साजरा होवो !

## वेस्टर्न इंडिया विमा कं. लि. सातारा

पुणें शाखा — लक्ष्मी रस्ता, पुणें २.

# पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

## पुणें शहर

पोस्ट क्स नं. ५११ — टेलिफोन नं. २४८३

पंचवार्षिक योजनेंत सहकारी चळवळीला प्रामुख्याचें स्थान आहे. आपल्या चालू व पुढील योजनेचें यश केवळ सहकार्यावरच अवलंबून आहे. या आमच्या बँकेंत ठेवलेली ठेव म्हणजे अप्रत्यक्षपणें पंचवार्षिक योजनेला मदतच होय.

बँकेच्या पुणें जिल्ह्यांत सर्वत्र शाखा असून त्यांचेमार्फत शेतीचे उत्पादनासाठीं कर्जें दिलीं जातात व ठेवीहि स्वीकारल्या जातात. गेलीं छत्तीस वर्षें जिल्ह्यांतील लोकांचा विश्वास बँकेनें संपादन केलेला आहे. त्याचें द्योतक म्हणजे आज बँकेचें खेळतें भांडवल एक कोटी साठ लाखांचे वर आहे.

भाग भांडवल नुकतेंच सहा लाखांचे दहा लाख करण्यांत आलें आहे. प्रत्येक भाग रुपये पन्नासचा आहे.

मुख्य कचेरींत सेफ डिपॉझिट लॉकरची व सेफ कस्टडीची सोय आहे. सोनें-चांदीचे तारणावर सर्व शाखांत व मुख्य कचेरींत कर्ज दिलें जातें.

अधिक माहितीसाठी भेटा अगर लिहा.

मो. वि. रवडे,
मॅनेजिंग डायरेक्टर.

## लेख व लेखक

१ उत्पादनवाढ, हेंच धर्माचरण (संपादकीय) ३५५
२ डॉ. राधाकृष्णन् ह्यांचा संदेश ३५६
३ भारताच्या पंचवार्षिक योजनेंत शेतीवर भर कां? (कॅनेडिअन बँकर) ३५७
४ महाराष्ट्रीय बँकांचें एकत्रीकरण (चिं. वि. जोग) ३५९
५ महाराष्ट्रांतील गेल्या दुष्काळापासून बोध (डॉ. र. गो. काकडे) ३६५
६ प्रो. र. धों. कर्वे (डॉ. र. पु. परांजपे) ३६९
७ मध्यमवर्गाला आवाहन (शंकर ज. जोशी) ३७१
८ पंचवार्षिक योजनेचें कार्य व महाराष्ट्रांतील ग्रामीण जनता (भा. मं. काळे) ३७७
९ स्थानिक व्यापारी बँका (गो. वि. सराफ) ३८३
१० प्रायोगिक बँकेची योजना (बी. आर. केंभावी) ३८५
११ शेतकऱ्यांची दीर्घ मुदतीच्या कर्जांची गरज (म. सि. पुटाणी) ३८९
१२ मोड-कचरा व चिंध्या ही संपत्ति-सोनें आहे (पी. बी. पाटील) ३९५
१३ शेड्यूल्ड बँकांचा भारतांतील व्यवहार ३९७
१४ देशांतील आर्थिक दुःस्थितीवर उपाय (वा. पुं. वर्दे) ३९८
१५ प्रायोगिक बँकेच्या योजनेचें स्वागत ३९९
१६ चित्रपट निर्मितींत भारताचा दुसरा क्रमांक ३९९
१७ दरमाणशीं दररोज किती अन्न मिळतें ? ३९९
१८ भारतीयांची आयुर्मर्यादा सर्वांत कमी ३९९
१९ विविध माहिती ४००

**"अर्था"चा ता. ११ व १८ चा अंक बंद राहून ह्यापुढील अंक २५ नोव्हेंबर रोजीं प्रसिद्ध होईल.**

**BANKERS' ANNUAL NUMBER, 1953.**

*Editor*
S. V. Kale.
*Publisher*
*Poona Banking Association*
*261, Budhawar, Poona 2.*
*Pages 112* ] [ *Rs. 2-8-0*

*ARTICLES by*
Shri. B. T. Thakur, Seth Pranlal D. Nanjee,
Shri. D. S. Savkar, Shri. D. Freeman,
Shri. K. P. Mathew, *and many others*

**देना बँक**
देवकरण नानजी बँकिंग कं. लिमिटेड

**५९ शाखा आणि १२ सेफ डिपॉझिट व्हॉल्ट्स**

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | १ कोटि रु. |
| खपलेलें व वसूल | ५० लक्ष रु. |
| रिझर्व्ह व इतर फंड | १४ लक्ष रु. |
| ठेवी | ९३ कोटी रु. पेक्षां ज्यास्त |
| खेळतें भांडवल | ११ कोटी रु. पेक्षां ज्यास्त |
| खात्यांची संख्या | ८५ हजारांपेक्षां ज्यास्त |

*मुंबईत १६, गुजरातमध्यें १७, सौराष्ट्रांत १२, महाराष्ट्रांत ११ आणि मध्यप्रदेश, कलकत्ता व दिल्ली येथें प्रत्येकीं १ याप्रमाणें कचेऱ्या.*

सर्व प्रकारचा बँकिंगचा व्यवहार केला जातो.

**प्रवीणचंद्र व्ही. गांधी**
मॅ. डायरेक्टर.

**पूर्व खानदेश सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि. जळगांव**

—×—

मुख्य कचेरी : जळगांव
तारेचा पत्ता "EKCOBANK" टेलिफोन नं. ३५४

| | |
|---|---|
| वसूल भाग भांडवल | रु. १५,०९,९०० |
| राखीव गंगाजळी | रु. १२,५७,२०० |
| इतर गंगाजळी | रु. ८,३७,८५४ |
| ठेवी | रु. १,६१,६२,५६६ |
| खेळतें भांडवल | रु. २,५३,६६,०१९ |
| सहकारी सोसायट्यांना दिलेलीं कर्जें | रु. १,२७,१०,३४२ |

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

शाखा १३ : अंमळनेर, भुसावळ, बोदवड, चाळिसगांव चोपडा, धरणगांव, एरंडोल, फैजपूर, जामनेर, पाचोरा, पारोळा, रावेर, यावल.

उपशाखा ११ : भडगांव, एदलाबाद, नशिराबाद, निंभोरा, मेहुणबारे, म्हसावद, कजगांव, सावदा, शेंदुर्णी, वरणगांव, व वरखेडी.

जळगांव हेड ऑफिसला व पारोळा शाखेस सेफ डिपॉझिट लॉकर्सची सोय आहे.

डब्ल्यु. डी. साळुंखे, ॲडमिनिस्ट्रेटिव्ह ऑफिसर
आर. वाय. सोनवणे, मॅनेजिंग डायरेक्टर

किर्लोस्कर

ही दिवाळी
आमच्या ग्राहकांस व
आश्रयदात्यांस
सुखसमृद्धीची जावो!

किर्लोस्कर बंधु, लि., किर्लोस्करवाडी

ही दिवाळी
सर्वांस
सुखाची
व
समृद्धिची
जावो.

ओगले ग्लास वर्क्स लि.,
ओगलेवाडी.

# अर्थ
## दिवाळी अंक
बुधवार, ता. ४ नोव्हेंबर, १९५३





स्थापना : १९३५
संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


*"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौधर्मकामाविति ।*
*—कौटिलीय अर्थशास्त्र*

**"अर्था"च्या वाचकांस व हितचिंतकांस नवें वर्ष आनंदाचें व समृद्धीचें जावो.**

# उत्पादनवाढ, हेंच धर्माचरण

"अर्था" चा १९ व्या वर्षाचा हा दिवाळी अंक वाचकांस सादर करण्यास आम्हांस आनंद होत आहे. "अर्था" स १८ वर्षें पुरीं झालीं, त्यानिमित्त गेल्या जानेवारीमध्यें आर्थिक क्षेत्रांतील तज्ज्ञ व पुढारी ह्यांनीं त्याच्या कामगिरीबद्दल प्रशंसोद्गार काढले, हें वाचकांस माहीत आहेच. "अर्था" चा वाचकवर्ग अत्यंत जागरूक असून पत्रद्वारां कित्येक लोक विविध विषयांवर प्रश्न विचारीत असतात व त्यांस योग्य तीं उत्तरें देणें हेंहि "अर्था" चें एक महत्त्वाचें कार्य चालू असतेंच. व्यवसायांत गुंतलेल्यांना "अर्था" च्या परिशीलनानें प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष फायदा सतत होत रहातो, ही त्यांच्या नित्य अनुभवाची गोष्ट आहे. महाराष्ट्रीय सहृदय व्यक्ती व संस्था ह्यांच्या हार्दिक सहाय्यामुळेंच "अर्था" चें व्रत टिकवितां आलें आहे. "अर्थ" हा प्रचलित व्यावहारिक जमाखर्चाच्या दृष्टीनें त्याच्या चालकांना कधींच किफायतशीर झालेला नाहीं; परंतु त्यानें समाजाचा आर्थिक पाया मजबूत करण्याचे जे प्रयत्न चालविलेले आहेत, त्यांचें फळ व्यापक दृष्टीनें बहुमोल ठरणारें आहे. "अर्था" च्या सहाय्यकांस व हितचिंतकांस ह्याची जाणीव आहे आणि म्हणूनच आम्हांला त्याबद्दल कृतज्ञता वाटते. त्या सर्वांना ही दिवाळी व नवें वर्ष समृद्धीचें जावो.

ह्या अंकांतील विषयांकडे लक्ष दिलें असतां असें दिसून येईल कीं, प्रस्तुत अंकांत चालू आर्थिक प्रश्नांबाबत मार्गदर्शन करण्याचा विशेष प्रयत्न करण्यांत आला आहे. पंचवार्षिक योजनेंत औद्योगीकरणापेक्षा शेतीवर भर जास्त कां, ह्याचा उलगडा "कनेडिअन बँकर" मधील लेखानें चांगला होईल. "आर्थिक अपरिहार्यता" हेंच त्या प्रश्नाचें उत्तर आहे; इतर देशांचा अनुभवहि तेंच सांगतो. परदेशी मदतीविना इतर देशांनाहि औद्योगीकरण घडवून आणतां आलेलें नाहीं, हें खरें असलें तरी ही मदत मिळविण्याचीं साधनें त्यांचेजवळ होतीं; भारताला इतरांच्या दानावर व सहानुभूतीवर अवलंबून रहावें लागत आहे, ही गोष्ट चटकन् नजरेस आल्यावांचून रहात नाहीं. उत्पादन वाढल्यानंतर त्याचा उपयोग खाण्याकडे किंवा वापराकडे केला न जातां त्यांतून भांडवलाची निर्मिति व्हावी, ह्यासाठी निष्ठुरपणें जनतेला बचत करावयास लावली पाहिजे, हें स्पष्ट सांगितलें आहे, तें लोकांच्या सुखसमृद्धीच्या कल्पनांना व अपेक्षांना धक्का देणारें आहे.

चालू पिढीनें कष्ट व बचत करून उत्पादनक्षमता वाढविली म्हणजे, पुढच्या पिढीस त्याचा फायदा मिळेल आणि ज्या प्रमाणांत हें कार्यक्षमतेनें होईल, त्या प्रमाणांत आपलें उद्दिष्ट आपणांस लवकर गांठता येईल. भारतानें हातीं घेतलेला मर्यादित कार्यक्रम पार पाडावयाचा म्हटला, तरी भयानक अडचणींतून मार्ग काढावा लागणार आहे, ह्याची जाणीव सामान्य नागरिकास होणें अगत्याचें आहे. पंचवार्षिक योजनेमुळें होणाऱ्या फायद्याकडेच फक्त त्याचें लक्ष केंद्रित न करतां, त्यासाठी प्रत्येकाकडून स्वार्थत्यागाची व कष्टाची अपेक्षा कशी आहे, हेंच अधिक प्रभावीपणें त्यास समजावून सांगितलें पाहिजे.

लहान बँकांच्या बरोबरच महाराष्ट्राला मोठ्या बँकांची आवश्यकता आहे, असें श्री. चिं. वि. जोग ह्यांनीं प्रतिपादन केलें आहे. महाराष्ट्रांतील आजच्या मोठ्या बँका जरूरीपेक्षां लहानच पडतात. मोठी बँक हवी, ह्याचा अर्थ लहान बँका नकोत, असा मुळींच नाहीं. श्री. गो. वि. सराफ ह्यांनीं आपल्या लेखांत स्थानिक लहान बँकांची उपयुक्तता वर्णन केली असून अशा लहान बँका रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शनास अनुसरून निर्दोष रीतीनें चालविल्या तर त्यांचेंहि भवितव्य उज्ज्वल आहे, असें त्यांनीं सांगितलें आहे. श्री. जोग व श्री. सराफ ह्यांच्या लेखांत विरोध मुळींच नसून, ते एकमेकांना पूरकच आहेत. श्री. बी. आर. केंभावी ह्यांनीं प्रायोगिक 'डमी' बँकेची त्यांची योजना मांडली आहे, तिचेकडे आम्हीं वाचकांचें लक्ष वेधूं इच्छितों. अशा प्रायोगिक बँकेपासून होणारे फायदे श्री. केंभावी ह्यांनीं वर्णन केले आहेत व त्यांच्या योजनेस शिक्षणतज्ज्ञांचा व प्रगतिप्रिय बँकर्सचा पाठिंबा मिळालेला आहे.

महाराष्ट्रांतील गेल्या दुष्काळापासून कोणता बोध घेतला पाहिजे आणि सरकारी धोरणांत इष्ट बदल घडवून आणण्यासाठी जागरूक लोकमताची आवश्यकता कशी आहे, हें डॉ. र. गो. काकडे ह्यांनीं अनुभवपूर्वक सांगितलें आहे. महाराष्ट्रांतील दुष्काळाचें गांभीर्य व त्यावरील उपाययोजना ह्यासंबंधीं दिसून आलेली अनिष्ट प्रवृत्ति त्यांनीं नमूद केली आहे आणि सरकारी धोरणाचा अपुरेपणा स्पष्टपणें दाखविला आहे.

डॉ. र. पु. परांजपे ह्यांनीं प्रो. र. धों. कर्वे ह्या प्रभावी लेखकाच्या व लोकशिक्षकाच्या कामगिरीचें सिंहावलोकन करून, लोकसंख्येच्या प्रश्नाच्या ह्या द्रष्ट्याच्या दूरदृष्टीबद्दल धन्यवाद दिले आहेत. बाणेदारपणानें, स्वार्थत्यागपूर्वक व चिकाटीनें प्रो. कर्वे ह्यांनीं त्यावेळच्या लोकमताविरुद्ध परंतु हितकारक प्रचार करून भारताच्या पुढील एका महाभयानक प्रश्नाकडे लोकांचें लक्ष वेधलें; लक्षावधि हिंदी कुटुंबें त्यांना दुवा देतील अशी त्यांची कामगिरी झालेली आहे. देशाच्या सर्वांगीण प्रगतीचा आधारस्तंभ जो मध्यमवर्ग, त्याची आजची दुर्दशा श्री. शंकर ज. जोशी ह्यांनीं रेखाटून, त्याच वर्गाचे हातून बहुमोल कार्य होईल, असा आशावाद प्रकट केला आहे. प्रस्तुत अंकांतील इतरहि लेख वास्तववादी व मार्गदर्शक

वाटतील असेच आहेत. ह्या सर्व तज्ज्ञ व अनुभवी लेखकांचे आम्हीं आभारी आहों.

उपराष्ट्रपति, डॉ. एस. राधाकृष्णन्, ह्यांचा "उत्पादनवाढ म्हणजेच धर्माचरण" हा आर्थिक प्रगतीचा संदेश त्यांनीं किर्लोस्करवाडी येथील भाषणांत दिला, तो शेजारीं आम्हीं प्रसिद्ध केला आहे. सांस्कृतिक व आर्थिक दृष्टिकोन ह्यांत तफावत वाटते तीं खरी नाहीं; जें खऱ्या आर्थिक दृष्ट्या हितावह, तें आध्यात्मिक दृष्ट्याहि उपकारक असतें. म्हणूनच, व्यापक हिताच्या दृष्टीनें, जें समाजाच्या जीवनास सौख्य व शांति देतें त्यास धार्मिक व नैतिक पाठिंबा मिळाल्याविना रहाणार नाहीं. डॉ. राधाकृष्णन् ह्यांनीं वेस्टर्न इंडिया विमा कंपनीच्या पुणें येथील "वेस्टर्न इंडिया हाऊस"च्या उद्घाटनप्रसंगीं कंपनीचे जनक व संवर्धक विमा-महर्षि श्री. चिरमुले ह्यांच्या ऋषितुल्य जीवनाचा व विमा कंपनीच्या व्यावहारिक उज्ज्वल कामगिरीचा उत्कृष्ट संयोग सुस्पष्ट केला-शिवाजी व रामदास ह्यांच्या सहकारी प्रयत्नांचा गौरवपूर्वक उल्लेख करून धर्म आणि अर्थ ह्या पुरुषार्थांचें साहचर्य त्यांनीं स्पष्ट केलें, तें उद्बोधक आहे. धर्म आणि काम हे अर्थमूल आहेत; अर्थ हाच प्रधान पुरुषार्थ आहे, ह्या भूमिकेवरच स्थापन झालेल्या "अर्थ" साप्ताहिकाचें बोधवाक्य वाचकांच्या परिचयाचें आहेच.


ऐहिक प्राप्तीसाठी आपलें कर्तव्यकर्म केलें पाहिजे, असेंच आर्यांचें जीवित-ध्येय होतें. धर्म, अर्थ, काम व मोक्ष ह्या चार पुरुषार्थांपैकी चतुर्थ पुरुषार्थाचें प्राबल्य नव्हतें. मोक्षाची कल्पना ही मागाहून आलेली आहे. धनप्राप्ति निषिद्ध नव्हती, एवढेंच नव्हे तर तत्कालीन लोकांचा प्रधान उद्देश धनप्राप्ति हाच असे. आपले प्राचीन पूर्वज ऐहिक वैभवप्राप्तीसाठी कर्तव्यकर्म केलें पाहिजे, असेंच सांगत आलेले आहेत. डॉ. राधाकृष्णन् ह्यांचा "अधिक उत्पादन करा" हा संदेश ह्या दृष्टीनेंहि मननीय वाटेल. आर्थिक उत्पादन कार्यक्षमतेनें व दरमाणशीं तर ताशीं वाढत्या प्रमाणांत होत गेलें पाहिजे, हें वेगळें सांगावयास नकोच.

**उपराष्ट्रपति डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन् ह्यांचा संदेश**

"चार ते पांच हजार वर्षांच्या अखंड घडामोडींचा इतिहास असणाऱ्या ह्या महान् राष्ट्राचे तुम्ही नागरीक आहांत, हें ध्यानीं राखा. ग्रीस, रोम, कार्थेज, असिरिया, बॅबिलोनिया, ह्यासारख्या तत्कालीन संस्कृती नष्ट झाल्या; आपली संस्कृति मात्र कायम टिकून राहिली आहे. "धर्म" ह्या शब्दांत व्यक्त होणाऱ्या कांहीं मूलग्राहि तत्त्वांवर आपला विश्वास आहे, हेंच त्याचें कारण आहे. शिस्तीचें, सहकारी, एकमेकांस साहाय्यकारी जीवन म्हणजेच "धर्म" होय. धर्माप्रमाणें आपण वागलों, तेव्हां आपण उत्कर्षाप्रत गेलों; जेव्हां "धर्म" सोडला तेव्हां आपली अधोगति झाली. परस्पर साहाय्यानें आणि सहकारी प्रयत्नांनीं आपण नुकतेंच राजकीय स्वातंत्र्य मिळविलें आहे.

"केवळ राजकीयच नव्हे, तर आर्थिक व सामाजिक क्षेत्रांतहि आपलें स्वातंत्र्य प्रभावी करणें आपलें आजचें कर्तव्य आहे. राजकीय प्रगतीस जे गुण लागतात, त्याच गुणांचे जोरावर आपण आर्थिक प्रगतीहि घडवून आणूं शकूं. आपण जेव्हां मोठालीं देवळें बांधलीं, मोठे रस्ते तयार केले, तेव्हां कामगार व नेते ह्यांनीं सहकारी वृत्तीनेंच कामें केलीं; राष्ट्राचा उद्धार घडवून आणण्याच्या सत्कार्यासाठी कुटुंबाच्या घटकांप्रमाणें ते एकजीव झाले. आज जागतिक परिस्थितीनें आपणांस आव्हान दिलें आहे तें आपण स्वीकारलें पाहिजे आणि निःस्वार्थीपणें, शिस्तीनें, तळमळीनें, उत्साहानें व सहकार्यानें राष्ट्रोद्धाराच्या पवित्र कार्यास वाहून घेतलें पाहिजे. ह्या मोठ्या कार्यांत तुम्ही-आम्हीं गुंतलेलें आहों. वरपासून-खालपर्यंत, सर्वांनीं, उत्पादनांत वाढ कशी करतां येईल हें एकच ध्येय ठेवलें पाहिजे. वैयक्तिक स्वार्थ किंवा खाजगी नफा हें उद्दिष्ट असतां कामा नये; समाजसेवा व राष्ट्रीय हित, हाच ध्यास असावयास हवा. तुम्ही हें ध्येय गांठण्याची शिकस्त कराल, अशी मला आशा आहे."

(किर्लोस्करवाडी येथें दि. २७ ऑक्टोबर रोजीं केलेलें भाषण.)

# दि बेळगांव बँक लि.

तार : सर्व्हिस (शेड्यूल्ड बँक). फोन नं. ११८

—स्थापना १९३०—



हेड ऑफिस : रविवार पेठ, बेळगांव

बेळगांव, रत्नागिरी, कोल्हापूर व धारवाड जिल्ह्यांत मिळून

—२२ शाखा—

**प्रगतीचा नवा टप्पा:**—बँकेनें चालू सालीं अद्यावत् पद्धतीची स्वतःची तीन मजली इमारत बांधवून पुरी केली व तीमध्यें एप्रिल १९५३ पासून व्यवहार चालू केला आहे. तसेंच बँकेच्या इमारतींतील मजबूत तळघरांत सेफ डिपॉझिट व्हॉल्टही बांधवून लॉकर्सची व्यवस्था केली असून, लॉकर्स मेसर्स गोद्रेज, बॉइस-कडून करवून घेतले आहेत.

पुढील आंकडे बँकेचें आर्थिक स्थैर्य व जनतेचा पूर्ण विश्वास दर्शवितात.

| | | |
|---|---|---|
| बँकेचें वसूल भांडवल | रु. | ६ लाख |
| रिझर्व्ह फंड वगैरे | रु. | १,९०,००० |
| एकूण ठेवी | रु. | ८१,००,००० चे वर |
| खेळतें भांडवल | रु. | ९०,००,००० चे वर |

आकर्षक दरानें ठेवी स्वीकारल्या जातात व सर्व तऱ्हेचा बँकिंगचा व्यवहार केला जातो.

एच. एस. कुलकर्णी, B. A., जनरल मॅनेजर

जी. एल. गजेंद्रगडकर, M. B. E., रिटायर्ड डेप्युटी कलेक्टर, चेअरमन.

# भारताच्या पंचवार्षिक योजनेंत शेतीवर भर कां ?

## औद्योगीकरणाचा इतर देशांचा अनुभव

("कनेडिअन बँकर")

पंचवार्षिक योजनेनुसार, भारताचें राष्ट्रीय उत्पन्न ११% नें वाढविण्याची कल्पना आहे. देशाची उपलब्ध संपत्ति, त्याच्या शेतीची व उद्योगधंद्यांची सद्य:स्थिति आणि आर्थिक प्रगतीची दिशा, हें सर्व लक्षांत घेऊनच योजना आंखण्यांत आलेली आहे.

### ही औद्योगीकरणाची योजना नव्हेच !

खालीलप्रमाणें वेगवेगळया गोष्टींसाठी तरतूद करण्यांत आलेली आहे:—कालव्यांतून पाणीपुरवठा व वीज-उत्पादन २७·१%, वहातुक व दळणवळण २४·०%, शेती व विकास योजना १७·५%, शिक्षण, आरोग्य, इ. १६·४%, उद्योगधंदे ८·४%, इतर ६·६%. ज्यांना मागासलेल्या देशांच्या आर्थिक उद्धाराचा मार्ग औद्योगीकरण हाच आहे असें वाटतें, त्यांना, त्याचप्रमाणें ज्यांना भारतासारख्या देशानें पाश्चात्य देशांतून कच्च्या मालाच्या बदली पक्का माल खरीदतां येईल असा पक्का माल भारतानेंच तयार करण्याचा उपद्व्याप करणें मूर्खपणाचें वाटतें, त्यांना पंचवार्षिक योजनेंतील अग्रहक्काची वरील प्रमाणें चमत्कारिक वाटतील. ज्या योजनेंत एकूण खर्चाच्या फक्त ८·६% खर्च उद्योगधंद्यांवर होणार आहे, ती औद्योगीकरणाची योजना कशी म्हणतां येईल ? भारताचा प्रयत्न प्रथम शेतीचें व कच्च्या मालाचें उत्पादन वाढविण्याचा आहे. औद्योगिक उत्पादन वाढीसहि महत्त्व दिलें आहे तें पोलाद, सिमेंट, पंप, डीझेल इंजिनें, रेल्वे इंजिनें, इत्यादींस म्हणजे वरील कार्यक्रमास आवश्यक असलेल्या बाबींस. बाकीच्या उत्पादनाचीं लक्ष्यें घालून दिलीं आहेत, त्यांत कपास आणि ताग व त्यापासूनचें कापड आणि सायकली ह्या बाबी आहेत !

### इतर देशांचा इतिहास

पंचवार्षिक योजनेचा पाया शेतींत सुधारणा, हाच आहे. बिगर-शेती व्यवसायांत मोठ्या प्रमाणावर नागरिकांना काम मिळावयाचें असेल, तर शेतकऱ्यांनीं स्वत:पुरतेंच केवळ नव्हे, तर शहरांतील कामगारांना पुरेल एवढें उत्पादन केलें पाहिजे. सर्व मोठ्या औद्योगिक राष्ट्रांचा इतिहास हेंच सांगतो. ह्या नियमास अपवाद असलेलें ग्रेट ब्रिटन परदेशांतील शेतकऱ्यांकडून धान्य आयात करण्यापूर्वी पुरें एक शतक औद्योगिक राष्ट्रच होतें. पहिल्या महायुद्धापर्यंत जर्मनीनें शेतीच्या व औद्योगिक उत्पादनाच्या वाढींत समतोलपणा राखला होता. दोन युद्धांचे वेळीं ग्रेट ब्रिटनची नाकेबंदी झाली, तशी होऊं न देण्याचा जर्मनीचा प्रयत्न होता. रशिआमध्यें, बोल्शेव्हिस्टांनीं १९१७ च्या क्रांतीनंतर फार झपाट्यानें औद्योगीकरण केलें, परंतु शेतीचें उत्पादन वाढेपर्यंत त्यांना औद्योगीकरणाची व शस्त्रास्त्रवाढीची गति थोपवून धरावी लागली. शेतकऱ्यांना अधिक उत्पादनास चालना देण्यासाठी "न्यू एकॉनॉमिक पॉलिसी" च्या नांवाखाली १९२० मध्यें भांडवलशाहीचा त्यांनीं मोठ्या प्रमाणावर अवलंब केला. पंचवार्षिक योजनेच्या अखेरीस त्यांना पुनः अन्नतुटवडा भासूं लागला. त्यांनीं शेतांचें एकत्रीकरण करून व शेतीचें यांत्रिकीकरण करून तुटवडा भरून काढला. रशियावर अवलंबून असलेल्या देशांतून आजहि त्याच मार्गानें शेतीच्या उत्पादनांत वाढ घडवून आणण्यांत येत आहे; औद्योगीकरणाची ती आवश्यक पायरी आहे. जपानमध्यें, भरमसाट सरकारी करांनीं व इतर मार्गांनीं शेतकऱ्यांकडून व्हावयाचा उपभोग मर्यादित करण्यांत आला; उद्देश हा कीं औद्योगिक वाढीस साधनसामुग्री उपलब्ध व्हावी. जपाननें आग्नेय आशियांत आक्रमण केलें, त्याचा आर्थिक पाया जपानच्या कारखान्यांतून होणाऱ्या प्रचंड उत्पादनास बाजारपेठ मिळवून देणें हा होता. शहरी लोकसंख्या वाढली, तिला पुरेसें अन्न मिळणेंहि जरूर होतें. औद्योगीकरणाच्या पहिल्या टप्प्याचे काळांत, शेतकऱ्यानें अधिक उत्पादन करावें, परंतु हें जादा उत्पादन त्यानें खाऊं मात्र नये, अशी अपेक्षा होती.

### बाहेरील साहाय्याची जरूरी

बाहेरील साहाय्य न घेतां, फारच थोड्या देशांना औद्योगीकरण घडवून आणतां आलें आहे. अशा साहाय्याचे अभावीं, ग्रेट ब्रिटनला स्वत:चें भांडवल सांठवून कारखाने उभारण्यास व जगांतील पहिल्या अनुक्रमाचें औद्योगिक राष्ट्र बनण्यास शंभर वर्षेंहि पुरलीं नाहींत. ग्रेट ब्रिटनला अनेक गोष्टी अनुकूल होत्या आणि औद्योगिक उत्पादन वाढलें तरी कामगारांच्या राहणीचें मान वाढलेलें नव्हतें. युनायटेड स्टेट्सला पहिल्या प्रतीच्या शेतीच्या जमिनीचे प्रचंड प्रदेश धान्योत्पादनास उपलब्ध होते. अमेरिकेंत वसति करण्यासाठी जे बाहेरून लोक आले, ते सर्व काम करणारे तरुण होते; म्हातारे-कोतारे त्यांनीं मागें ठेवले होते व त्यांच्या पोषणाची जबाबदारी दुसऱ्या देशांवरच होती. रेल्वे व जमिनी ह्यांच्यामध्यें गुंतविण्यासाठी ग्रेट ब्रिटनमधून मोठ्या प्रमाणावर भांडवल मिळूं शकलें. जपानच्या कच्च्या रेशमास परदेशी बाजारपेठांत एवढी प्रचंड मागणी होती कीं, त्याच्या विक्रींतून जपानला भांडवली माल मिळवितां आला. भारी कर लादून सामान्य लोकांत खपेल अशा उपभोग्य मालाच्या उत्पादनास जपाननें बंदी केली व औद्योगिक उत्पादनक्षमता वाढविण्याचा कर व इतर मार्गानें प्रयत्न करण्यांत आला.

### शेतीच्या उत्पादनवाढीबाबत मूलग्राही प्रश्न

भारतांतील योजकांनीं वरील आर्थिक अपरिहार्यता ओळखून अन्नाच्या उत्पादनवाढीस प्राधान्य दिलें आहे. अन्न आणि वस्त्र ह्या बाबतींत युद्धपूर्व काळाइतकें रहाणीचें मान सुधारलें, म्हणजे तें मान आणखी पुढें न वाढवितां शहरी कामगारांना खाऊं घालण्यासाठी वाढत्या अन्नोत्पादनाचा उपयोग केला जाईल. पंचवार्षिक योजनेंतील वेगवेगळया बाबींत गुंतलेल्या कामगारांचें व नवीन निघणाऱ्या खाजगी उद्योगधंद्यांतील लोकांचें पोषण त्यामुळें होऊं शकेल. ह्या गृहीत गोष्टींवरच योजना आधारलेली आहे.

ह्याचा व्यावहारिक अर्थ असा कीं, चालू पिढीनें बचत करावयाची, त्यांतून उत्पादनक्षमता निर्माण व्हावयाची व त्याचा फायदा पुढील पिढ्यांना मिळावयाचा. शेतकरी उत्पादनवाढ करण्यास तयार होतील का; त्यांनीं वाढवलेलें उत्पादन त्यांनींच न संपविण्याचा सल्ला ते ऐकतील का; त्यासाठी सक्ति करावी लागेल का; हे प्रश्न मूलग्राही महत्त्वाचे आहेत. पडीत जमीन लागवडीखालीं आणणें, कोरड्या प्रदेशांस पाणी पुरवून तेथील

उत्पादन सुधारणें, ओल्या ठिकाणीं उत्पादनवाढ घडवून आणणें, ह्यावरच शेतीच्या मालाचें उत्पादन वाढणें अवलंबून आहे. जेथें पाणीपुरवठा पुरेसा आहे, तेथें रासायनिक खतांचा वापर करून जपानच्या आदर्शाप्रमाणें उत्पादनांत वाढ करावयाची आहे. ह्या खतांच्या पुरवठ्याचा प्रश्न बिकट नसून, त्यांच्या वापराचा आहे. एका लहानशा कारखान्यांत तयार होणाऱ्या खतांस भारतांत आजच पुरेशी मागणी नाहीं!

**योजनेच्या आर्थिक बाजूच्या अडचणी**

पंचवार्षिक योजनेच्या आर्थिक बाजूलाहि अडचणींतून मार्ग काढावा लागेल. शेतकऱ्यांनीं उत्पादन वाढविलें पाहिजे आणि त्याबरोबर त्यांनीं स्वतःचें व स्वतःच्या कुटुंबाचें रहाणीचें मान मात्र वाढवितां कामा नये. शेतीचा माल बाजारांत विकून जो पैसा येईल तो बचत केला पाहिजे, किंवा वहातुकीसाठीं रेल्वेला दिला पाहिजे. नियोजित खर्चाच्या भारतांतील उभारणींपैकी ४४% रक्कम सरकारी वाढाव्यांतून व १३% रक्कम सरकारी रेल्वेजच्या वाढाव्यांतून यावयाची आहे. म्हणजे, ५७% रक्कम शेतकऱ्यांकडून प्रत्यक्ष, किंवा अप्रत्यक्षपणें वहातुकीसाठीं जादा दर आकारून, घेतली जाईल. फक्त ९% रक्कम सरकारी रोखे विकून जमा होईल आणि सुमारें एक तृतीयांश म्हणजे ३३% रक्कम लहान बचतयोजना, अल्प मुदतीचीं कर्जें, इत्यादींतून जमा होईल. म्हणजे, चलन-वृद्धीच्या मार्गानें बराच खर्च भागविला जाईल, ही भीति अगदीं साधार आहे. पंचवार्षिक योजनेच्या उत्साही नियोजकांनाहि भारतांतच एकूण खर्चाच्या ६०% पेक्षा जास्त रक्कम उभारण्याचें उद्दिष्ट ठेवतां आलें नाहीं; ४०% रक्कम बाहेरून यावयाची आहे. सहाजिकच, परदेशी भांडवल आकर्षण्याचे व त्याला भारतांत यावयाच्या सवलतींचे महा-बिकट प्रश्न उपस्थित होतात.

---

**पोलादाचा नवा कारखाना**

बिहारचे उद्योगमंत्री श्री. महेशप्रसाद सिंह ह्यांनीं असें जाहीर केलें आहे कीं, भारतांत काढण्यांत येणारा नवा पोलादाचा कारखाना बिहारमधील अगर बंगालमधील कोळशाच्या खाणीजवळ काढण्यास भारतीय सरकार अनुकूल दिसत नाहीं.

**रशिआचीं नवीं विमानें**

रशिअन सरकारनें मोलोटोव्ह ह्या गांवीं नवीं विमानें बांधण्यास प्रारंभ केला आहे, असें समजत. त्यांपैकी ४०० विमानें हैड्रोजन बाँब नेण्यासाठीं व १,१०० विमानें अणुबाँब नेण्यासाठीं बांधण्यांत येत आहेत. ह्यांपैकीं कांहीं विमानें ६,५०० मैलांचें उड्डाण न थांबतां करूं शकतील, अशीं आहेत.

**माणसाचे दांत कमी होत चालले**

अमेरिकन दंतवैद्यांना शास्त्रज्ञांनीं असें सांगितलें आहे कीं मनुष्याचा चेहरा कालगतींत लहान होत चालला आहे. लाखों वर्षांपूर्वीं माणसाच्या जबड्यांत ४० दात असत; आतां फक्त ३२ च असतात. आणखी सुमारें १० लाख वर्षांनीं माणसाला फक्त २० च दात असतील, असें त्यांचें म्हणणें आहे.

**वनस्पतींवर संगिताचा परिणाम**

सुप्रसिद्ध संगीत कलाकार पं. ओंकारनाथ ठाकूर ह्यांच्या मतानें संगिताचा वनस्पतींवर व प्राण्यांवर परिणाम होतो. परंतु हें सिद्ध करण्यासाठीं जरूर असणारी प्रयोगशाळा हाताशीं पाहिजे, असें त्यांचें म्हणणें आहे. आपण असे कांहीं प्रयोग केले असून प्राचीन भारतीय वाङ्मयांत ह्याविषयासंबंधीं असलेले उल्लेख खरे आहेत, असेंहि ते म्हणाले.


**दि मराठा को-ऑपरेटिव्ह क्रेडिट बँक लि., बेळगांव**

स्थापना ] बेळगांव [ १९४२

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. १,००,००० |
| वसूल भांडवल | रु. ५४,१०० चे वर |
| रिझर्व्ह फंड व इतर रिझर्व्हज् | रु. ४०,७८० चे वर |
| एकूण खेळतें भांडवल | रु. ४,९६,००० चे वर |

या बँकेंत सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात.

व्याजाचे दर आकर्षक आहेत. याचा ठेवीदारांनीं अवश्य फायदा घ्यावा.

बँक सुरुवातीपासून " अ " वर्गांत आहे. यावरून बँकेचा कारभार अत्यंत दक्षतेनें केला जातो, हें सिद्ध होतें.

विशेष माहितीसाठीं भेटा.

ए. के. सोमणाचे, D. CO-OP. सेक्रेटरी. जी. एम्. भातकांडे, चेअरमन.



**दि कराड अर्बन को. बँक लिमिटेड.**

**कराड ( उ. सातारा )**

स्थापना : सन १९१७

फोन नंबर ४३

*************************************

नवीन वर्ष बँकेचें भागदार, ठेवीदार व हितचिंतकांना सुखाचें जावो!

*************************************

अध्यक्ष : श्री. पु. पां. ऊर्फ बाबूरावजी गोखले, B. A., Ex. M. L. A.,

| | |
|---|---|
| खेळतें भांडवल | रु. २९,६०,००० |
| भाग भांडवल | रु. १,४६,३१० |
| गंगाजळी | रु. १,३२,९०० |
| इतर निधी | रु. १,९६,५४५ |
| ठेवी | रु. २४,६८,७०४ |

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

समक्ष भेटा अगर लिहा.

शंकर पुरुषोत्तम कुलकर्णी
मॅनेजिंग डायरेक्टर.

# महाराष्ट्रीय बँकांचें एकत्रीकरण

## आक्षेपांचें व गैरसमजांचें निराकरण

( चिं. वि. जोग, बी. कॉम., एफ. आय. बी. लंडन )

मागील वर्षी "अर्था"च्या दिवाळी अंकात महाराष्ट्राला एका मोठ्या बँकेची आवश्यकता आहे व अशी मोठी बँक निर्माण होण्यासाठी एकत्रीकरणाचा मार्ग ( अमलगमेशन ) कितपत श्रेयस्कर होईल यावद्दल मी माझे विचार मांडले होते. त्यावर कल्पनेपेक्षाहि पुष्कळच चर्चा झाली व अनेक संबंधित लोकांनीं साधकबाधक मतांचें निदर्शन करून असें एकत्रीकरण इष्ट का अनिष्ट यावद्दल आपली मतें मांडलीं. सर्वसामान्य लोकांनीं व वृत्तपत्रांनीं मात्र त्याबद्दल अनुकूलच मत प्रकट केलें व या विचाराचें स्वागत केलें, इतकेंच नव्हे तर महाराष्ट्रांतील व्यापारी व कारखानदार यांची प्रमुख संस्था—मराठा चेंबर ऑफ कॉमर्स—तिनेंहि या योजनेचा पाठपुरावा केला. पण प्रत्यक्ष बँकांशींच संबंधित असलेल्या अनेक लोकांनीं मात्र या लेखांतील विचारांचे विरुद्ध अथवा अशा एकत्रीकरणाची आवश्यकता नाहीं अशीं मतें दिलीं व त्याबद्दल आक्षेप व्यक्त करून त्या आक्षेपांची एक भिंतच उभी करण्याचा प्रयत्न केला.

### चर्चेचें स्वरूप व अपेक्षित निष्पत्ति

त्यानंतर सुमारें एक वर्षानंतर त्याच विषयाचा मी परत परामर्श घेत आहें. मागील वर्षाचा लेख लिहिण्याची कल्पना मला त्यावेळीं राजस्थानमध्यें होऊं घातलेल्या चार संस्थानी बँकांच्या एकत्रीकरणावरून सुचली होती, व अशा तऱ्हेचें मोठ्या प्रमाणावर एकत्रीकरण महाराष्ट्रांत झाल्यास त्याचे काय फायदे होतील याचें मी विवेचन केलें होतें. या राजस्थानमधील बँकेस रिझर्व बँकेनें आपले प्रतिनिधीहि नेमण्याचें कबूल केलें होतें व अशा प्रकारें या एकत्रीकरणासाठी लागणारें मधाचें बोट किंवा साहाय्यकारी तरफ (लिव्हर) याचीहि सोय त्याबाबत तिथें होती. तरी पण नुकत्याच येणाऱ्या वार्तांवरून असें दिसतें कीं, इतकें असूनहि राजस्थानमधील एकत्रीकरणाची योजना बारगळण्याच्या मार्गावर आहे व स्वतःच्या हितसंबंधांत जागरूक असणाऱ्या लोकांचा दुराग्रह शेवटीं श्रेष्ठ ठरूं पहात आहे. महाराष्ट्रांत, याउलट, अशा प्रकारची कुठलीहि साहाय्यकारी तरफ नाहीं किंवा असा जोडण्यास आवश्यक दुवा नाहीं, त्यामुळें अशा योजनेची निष्पत्ति इथें काय होणार हें उघडच आहे; तरीपण अशा एकत्रीकरणाविरुद्ध घेतले गेलेले आक्षेप व माझ्या लेखांतील कांहीं विधानांचा केला गेलेला गैरसमज, यांचें निराकरण करण्यासाठीच मी आज परत लिहीत आहें.

या आक्षेपांना उत्तरें देण्यापूर्वी माझ्या लेखाचे वेळीं असलेली परिस्थिति व आज बरोबर एक वर्षानंतर असणारी परिस्थिति यांचें सिंहावलोकन करणें जरा योग्य होईल. मागील वर्षी केवळ सहजगत्या हातांस लागतील त्या बँकांचे आंकडे विवेचनासाठी न घेतां महाराष्ट्रियांनीं चालविलेल्या, महाराष्ट्राच्या उन्नतीसाठी झटणाऱ्या व महाराष्ट्राचे आर्थिक हितसंबंध ज्यांत गुंतले आहेत, अशा प्रमुख शेडयूल्ड बँकांचेच आंकडे साक्षेपानें व उद्बोधक व्हावे म्हणून घेतले होते. त्यांत मुंबई वगळली नव्हती, हें त्यांत मुंबईची एक बँक समाविष्ट आहे, यावरून दिसून येईल. कुठल्या तरी आक्षेपकानें लिहिल्याप्रमाणें, तीं केवळ आठ बँकांच्या ताळेबंदांच्या जमा व नावें बाजूंची फक्त बेरीजच नव्हती. त्यांत एक विशिष्ट व चांगला अर्थ अभिप्रेत होता. आजहि साक्षेपानें याच आठ बँकांच्या एकत्रित ताळेबंदाकडे नजर टाकली तर काय दिसेल त्याची प्रत्यक्ष कल्पना येण्यासाठी १९५१ व १९५२ चे दोन्ही वर्षांचे ताळेबंद शेवटीं जोडले आहेत.

### गेल्या वर्षातील परिस्थितीचें सिंहावलोकन

१९५२ साल हें हिंदी बँकांना खडतर असेंच गेलें, किंबहुना तें एक कसोटीचेंच वर्ष होतें. तेव्हां या आठ बँकांनाहि त्याची झळ लागली असें गृहीत धरलें, तरी तें जमेस धरूनहि असें दिसतें कीं, एकूण खेळत्या भांडवलांत वाढीऐवजीं घटच आहे. नफ्यांतहि त्याच प्रमाणांत घट आहे. प्रत्यक्ष आंकड्यांत नफा किंचित् जास्त दिसतो याचें कारण १९५१ पेक्षा १९५२ सालीं मागील वर्षातील पुढें ओढलेल्या नफ्याची रक्कम जास्त आहे. एकूण १९५२ चा नक्त नफा १९५१ च्या नक्त नफ्यापेक्षा कमीच आहे. ठेवींत एकूण बँका मिळून वाढ दिसत असली तरी ती फार नाहीं. प्रत्यक्ष वाढ तीनच बँकांच्या ठेवींत आहे व तीहि इतरांच्या ठेवींत घट झाल्यामुळें असेल असें धरलें तर हा फक्त अदलाबदलीचाच प्रकार आहे. नवीन ठेवी किंवा नवीन पैसा येऊन ही वाढ फार दिसत नाहीं. नांवें बाजूकडे नजर टाकली तर असें दिसेल कीं कर्जें कमी झालीं आहेत, गुंतवणूक ( इन्व्हेस्टमेंटस ) वाढली आहे व मागील वर्षापेक्षा 'रोख व बँकांत रकम' या सदरांतहि चांगलीच वाढ आहे. हिंदुस्थानांतील बँकिंगच्या धंद्यांत याच वर्षी हें प्रमाण कमी झालें असतां आपल्याकडेच तें वाढलें आहे, हें कशाचें गमक समजावें ? अशी रक्कम मोठ्या प्रमाणांत बिनव्याजी ठेवण्याची गरज का भासावी ? आर्थिक स्थैर्य व लोकांचा विश्वास याचा व या प्रमाणाचा मेळ कसा घालावा ? इतरत्र सरासरी तें ८ ते १०% पडत असतां आपल्याकडे या वर्षी एकूण ठेवींशीं रोकड व बँकेंतल्या रकमेचें प्रमाण २०३/४% आहे. मागील वर्षीच ५६ लाख रु. जास्त असे बिनव्याजी होते ते यंदा ७१ लाख आहेत. म्हणजे ४% सरकारी रोख्यांत जरी हे गुंतवले तरी सर्व बँका मिळून २ लाख, ८० हजार रु. इतका नफा वाढेल. एकूण ६॥–६॥। लाख रुपयांत ही पडणारी भर उल्लेखनीय व दणदणीत अशी नाहीं काय ? अर्थात् हें एकत्रीकरण झाल्यासच शक्य आहे. कर्जें कमी झाल्यानें व अन्य प्रकारें उत्पन्नांत घट आहे पण खर्च मात्र वाढतेच आहेत. पगारांत एक लाख रु. नीं वाढ आहे व इतरत्रहि थोडी थोडी वाढ आहे. एकूण परिस्थितीवरून आशादायक व इष्ट बदल मुळींच दिसून येत नाहीं. त्यामुळें मागील वर्षी मी एकत्रीकरणापासून सुचवलेले फायदे आजहि जास्तच प्रकर्षानें मिळणें शक्य आहे. या आठ बँकांखेरीज महाराष्ट्रांतील इतरहि बँकांचे १९५० व १९५२ चे तुलनात्मक आकडे लेखाचे शेवटीं दिले आहेत तेहि उद्बोधकच आहेत. या आंकड्यांना सत्य लपवितां येत नाहीं हा त्यांचा मोठा दोषच समजला पाहिजे. तात्पर्य, महाराष्ट्राला एकत्रीकरणानें जर एखादी मोठी बँक लाभली तर भक्कम पाया, उत्पन्न वाढण्यासारखी जिंदगी व येण्यांत होणारी

अदलाबदल ( ॲडजस्टमेंट ), खर्चांत काटकसर, अनावश्यक शाखा बंद होऊन नवीन पाहिजेत त्या ठिकाणीं काढण्याची शक्यता व एकूण खेळतें भांडवल, ठेवी व नफा यांत वाढ या गोष्टी आजमितीसहि लागू आहेत.

**मतप्रदर्शनास मोकळीक**

आतां आपण मागील वर्षी घेतल्या गेलेल्या आक्षेपांचा विचार करूं. हा लेख लिहिल्यानंतर वृत्तपत्रांनीं व इतर सामान्य जनतेनें त्याचें चांगलेंच स्वागत केलें, व कित्येक वर्तमानपत्रांनीं अग्रलेख लिहूनहि यावर आपलीं मतें मांडलीं. त्यावेळीं एकतर एका बँकेचा व्यवस्थापक या नात्यानें मी हा लेख लिहिण्यास धजलों तरी कसा, याबद्दलच अनेकांनीं आश्चर्य व्यक्त केलें. पण बँका व त्यांचे व्यवहार यावर बोलण्याचा अधिकार फक्त संचालकांसच असावा व माझ्यासारख्या व्यक्तीस व्यवस्थापक म्हणून नसावा असा कुठेंहि, अलिखित सुद्धां, नियम नाहीं. या विषयावर मला काय वाटतें तें लोकांपुढें मांडण्याचा माझा रास्त हक्क आहे. पटणाऱ्यांनीं त्या गोष्टी पटवून घ्याव्यात अगर न घ्याव्यात; त्याबद्दल माझा हट्टाग्रह नाहीं, दुराग्रह तर नाहींच नाहीं; पण आग्रह मात्र निश्चित आहे. त्यामुळें मी त्या लेखांचीं कात्रणें संबंधित व्यक्तींना पाठवून मत अजमावण्याचा प्रयत्न केला, यांत गैर काय झालें? त्यांत दडपण आणण्याचा उद्देश कुठेंच प्रतीत होत नव्हता व त्यामुळें मी कांहींतरी नवीन एक वावटळ उठवण्याचा प्रयत्न करीत आहे, असा देखावा कांहीं लोकांनीं कां करावा, हेंच मला कळलें नाहीं.

**कोण म्हणतो, फक्त एकच मोठी बँक पाहिजे ?**

आतां मूळ आक्षेपांकडे वळतांना, पहिला आक्षेप असा घेतला गेला कीं, अशा प्रकारें मोठी व एकच एक बँक अस्तित्वांत असण्याचें कांहींहि कारण नाहीं. सध्यां चाललेल्या या बँका स्थिर व भक्कम पायावर उभ्या असून तशी आवश्यकता महाराष्ट्रांत अजून वाटत नाहीं. दुसरें म्हणजे, अशी बँक सध्यां अस्तित्वांत असलेल्या लहान बँकांच्या स्वातंत्र्यावर गदा आणून निर्माण होणें इष्ट नाहीं. त्यायोगें लहान बँकांना या क्षेत्रांतून उठवल्यासारखें होईल. लहान मासा मोठ्या माशाला खाऊं शकत नाहीं, हें माहीत असल्यानेंच मोठ्या माशानें त्याला सांगावें 'मी तुला खाणार आहे, पण तसं तुला नको असलं तर तूं मला खालंस तरी चालेल' तशांतला हा प्रकार होईल. पण हा आक्षेप अनाठायीं आहे. प्रथम हीं गोष्ट स्पष्ट केली पाहिजे कीं, महाराष्ट्रांत मोठी अशी एकच एक अथवा एकमेव बँक असावी व ती या अस्तित्वांत असणाऱ्या बँकांचें एकत्रीकरण करूनच निघावी असा माझ्या लेखाचा सारांश मुळींच नव्हता. मी फक्त एवढेंच म्हटलें होतें कीं, आज संक्रमणावस्थेंतून जात असतां महाराष्ट्राला जर आर्थिक दृष्ट्या बलवान् व्हायचें असेल तर त्यासाठीं एक तरी मोठ्या व सामर्थ्यवान् बँकेची आवश्यकता आहे. त्याचा अर्थ ती एकच असावी असा नाहीं. अशा ४ बँकाहि जरी निघाल्या तरी त्या हव्यात, पण सुरुवातीला एक तरी हवी ना! एकदम जर अनेक निघाल्या तर सोन्याहून पिवळें होईल. १९३५ पूर्वी महाराष्ट्रीय लोक यशस्वी बँका काढूंच शकणार नाहींत असा एक गैरसमज इतरत्र होता, पण आपण तो आज दूर केला आहे. तरी सुद्धां आजहि इतर प्रांतीय लोक, "महाराष्ट्रीय पढाडीनें मोठ्या प्रमाणावर कांहींच करूं शकत नाहींत; अर्थात् त्यामुळें एक अग्रेसर व मोठी बँक त्यांच्या हातून निघणें शक्यच नाहीं," असें उपहासानें बोलतातच.

महाराष्ट्राचें दारिद्र्य हा सर्वांच्या उपेक्षेचा व कुचेष्टेचा विषय कां व्हावा ? महाराष्ट्रांत बुद्धिवाद फार म्हणूनच बुद्धिभेदहि फार. म्हणूनच त्यांच्याच हक्कांच्या बाबींत सुद्धां त्याची पायमल्ली करून इतर लोक आपलें कार्य साधतात, असें आजहि सर्वजण म्हणतात. मागील वर्षी सुद्धां, कुणीतरी आक्षेपकानें विलीनीकरणाची चळवळ ही अशा "बुद्धिवंतांचीच" नव्हे काय, असा सवाल केला होता. त्या विधानाचा त्याच लेखाला अनुसरून कसा अर्थ घ्यावयाचा हें मला अजून समजलेलें नाहीं. तात्पर्य, या सवाला उत्तर म्हणून महाराष्ट्राला एक तरी मोठी बँक पाहिजेच पाहिजे. ही मोठी बँक सध्याच्या आठ बँका एकत्रित येऊनच व्हावी असें नाहीं, पण कांहीं वर्षांपूर्वी अनेक वजनदार व्यक्तींनीं अशी एक नवीनच मोठी बँक काढण्याचा प्रयत्न केला, तो कितपत यशस्वी झाला हें आपणांस माहीत आहेच. तात्पर्य, अशा रीतीनें जर एक मोठी बँक अस्तित्वांत येऊं शकत नाहीं, तर त्यासाठीं सगळ्यांत सोपा उपाय म्हणजे एकत्रीकरण ( अमलगमेशन ) हा होय, एवढाच अर्थ मला ध्वनित करावयाचा आहे; आणि हें एकत्रीकरण महाराष्ट्राच्या उन्नतीसाठींच व्हायचें असल्यानें, तें मोठ्या प्रमाणावर झालें तरच आपला इष्ट हेतु साध्य होईल व म्हणून आठ शेड्यूल्ड बँकांनीं हा प्रयत्न करावा, असें सुचविलें होतें. केवळ दोन अगर तीन बँका एकत्र येऊन आपलें ध्येय साध्य होणार नाहीं. अशा दोन अगर तीन बँकांचें एकत्रीकरण होण्याचे वेळीं तो प्रश्न त्यांच्या एकमेकांचे संबंधांवर व गुणांवरच अधिष्ठित होईल. पण व्यापक देशहिताचे दृष्टीनेंच बघायचें असेल, तर हें एकत्रीकरण मोठ्या प्रमाणावरच पाहिजे.

**बँक एकदम मोठी कशी होईल ?**

यावर कांहींनीं असा आक्षेप घेतला कीं समजा, अशी बँक निर्माण झाली तरी शेवटीं तिचें खेळतें भांडवल दहा कोटींचे आसपास येणार असल्यानें तीं कांहीं फार मोठी बँक होणार नाहीं व ती मोठ्या बँकांशीं टक्कर तरी देऊं शकेल कां ? त्याला उत्तर असें कीं, दहा कोटींची ही नवी बँक जरी एकदम पहिल्या पांच क्रमांकांत आली नाहीं, तरी भारतांतील एकूण ९० चे वर असणाऱ्या शेड्यूल्ड बँकांत तिचा नंबर १५ चे आंत येईल, हें नक्कीच उपेक्षणीय नाहीं. १०० मुलांच्या वर्गांत पहिला नंबर नसला तरी अगदीं ९० वा नंबर असण्यापेक्षा तो १५–१६ वा तरी असणें, भूषणावहच आहे. तसेंच, निर्माण झाल्यावर लगेच तिची मोठ्या बँकांशीं तुलना करणेंहि न्याय्य होणार नाहीं. कारण, त्यानंतरच तिचें खेळतें भांडवल फार झपाट्यानें वाढूं लागेल. बंगालमध्यें तसा अनुभव आलेला आहे, तेव्हां ती निश्चितपणें वरवरच जात जाईल. शिवाय, ही तुलना बाल्यांतच करणें चुकीचें आहे. त्यादृष्टीनें भारतांतील एक नंबरची जी इंपीरियल बँक ऑफ इंडिया तिचा जगांत ४३ वा नंबर लागतो व इतर लहान लहान राष्ट्रांच्याहि अनेक बँका तिच्याहून सरस आहेत, म्हणून तिचें स्थान गौण कां मानूं नये ? पण तसें नसून, आपल्यापुरतें बघितल्यास आपणांस ती फार मोठीच वाटते.

**लहान बँकांचें मोठें खेळतें भांडवल !**

त्यानंतर, अशा लहान बँकांनीं एकत्र यायची जरूरी नाहीं हें सिद्ध करतांना एका आक्षेपकानें, सचोटीनें चालणाऱ्या या लहान बँका तुटपुंज्या भांडवलावरहि कोट्यवधि रुपये खेळतें भांडवल जमवूं शकल्या आहेत, असें विधान केलें आहे. पण आंकडेशास्त्रास धरून बोलतांना असें मोघम व अतिरंजित विधान करणें हा इष्ट व शिष्टसंमत प्रकार नाहीं. माझ्या माहितींत तरी महाराष्ट्रांत अशी एकहि बँक नाहीं कीं ज्यायोगें हें विधान सिद्ध होऊं शकेल.

मी उदाहरणासाठी म्हणून घेतलेल्या आठ बँका मिळूनसुद्धां जिथें खेळतें भांडवल १० कोटींचें वर जात नाहीं, तिथें अशी तुटपुंज्या जमा भांडवलावर सचोटीनें कोट्यवधींचें खेळतें भांडवल असणारी बँक असेलच कशी ! फार काय, वरील आठ बँकांतहि एक कोटीचेवर खेळतें भांडवल असणाऱ्या बँका तीन किंवा जवळ जवळ दोनच आहेत, ही वस्तुस्थिती आहे. तात्पर्य, अतिरंजित विधानें वस्तुस्थितीवर मात करतील अशी जर कुणाची कल्पना असेल किंवा भ्रम असेल तर ते स्वतःचीच फसवणूक करून घेत असतील. शिवाय, पुढें-मागें जर एकाद्या बँकेची अशी स्थिति झाली तर त्या बँकेच्या आर्थिक स्थैर्याचे दृष्टीनें त्यांत धोका राहील. जमा झालेलें भांडवल व खेळतें भांडवल यांचें परस्पराशीं योग्य असेंच प्रमाण असलें पाहिजे; नाहींतर तें या धंद्याच्या मूलभूत तत्त्वाशींच विसंगत ठरेल. कारण, जमा झालेलें भांडवल जितकें कमी, तितकी ठेवीदारांना सुरक्षितता कमी, हेंहि ध्यानांत धरलें पाहिजे.

**मोठ्या बँकेस मिळणारें काम**

नंतर आणखी एक असा आक्षेप येतो, कीं अशी मध्यवर्ती मोठी बँक झाल्यावर तिची मक्तेदारी कशावरून सुरू होणार नाहीं? आज मोठ्या बँकांत जी लहान गिऱ्हाइकांची अडचण होते ती इथेंहि सुरू होईल. शिवाय लहान बँका ग्राहकवर्गाशीं घनिष्ठ संबंध ठेवतात ते दोघांनाहि पोषक असतात, तीहि परिस्थिति बदलेल. पण मागें स्पष्ट केल्याप्रमाणें अशी मोठी एक बँक निघूनहि लहान बँका तिथें असूं शकतीलच. तेव्हां ठेकेदारी व दूरचे संबंध हे प्रश्न उपस्थित होऊंच शकत नाहींत. पण, उलट, अशी मोठी बँक निघाल्यानें, आज लहान बँकांच्या ज्या गैरसोयी होत आहेत त्या मात्र दूर होतील. आज रिझर्व बँकेनें जी बिल मार्केटची योजना काढून बँकांना सवलत देऊं केली आहे तिचा फायदा आम्हीं लहान असल्यानें आम्हांला मिळूं शकत नाहीं. आम्ही आज लहान असल्यानें दिल्ली, कानपूर, मद्रास, कलकत्ता इथें जे आमचे आर्थिक व व्यापारविषयक संबंध गुंतले आहेत त्यांना आम्ही शाखा नसल्यानें मदत करूं शकत नाहीं. महाराष्ट्रांत प्रतिवर्षी लाखों रुपयांचे नारळ खपतात. पण त्यासाठीं मलबार-कारवारच्या आपल्या लोकांना साहाय्य देऊन आपण त्यांना हा धंदा देऊं शकत नाहीं. वरील ठिकाणीं आम्हीं एजन्सीवजा शाखासुद्धां काढूं शकत नाहीं. उलट, मोठ्या बँका मात्र महाराष्ट्रांत वाटेल त्या ठिकाणीं शाखा काढून आमच्यासमोर केव्हांहि बागुलबुवा उभा करूं शकतात. हल्ली महाराष्ट्रांतील कारखानदारांचा परदेशांशीं खूपच संबंध येतो. पण आम्हीं लहान असल्यानें, आमच्यापैकीं कुणालाहि परदेशी हुंडणावळीचा व्यवहार करावयाची परवानगी नाहीं. मोठ्या बँकाकडे हा व्यवहार जाऊन आम्हीं लाखों रुपयांचा व्यवहार गमावून बसतों. शिवाय, या व्यवहारांत चांगलाच नफा होत असल्याकारणानें लोण्याचा ऐवज मोठ्या बँका घेतात व फक्त पोस्टमनसारखी देवाण-घेवाण तेवढी आम्ही करतों. तात्पर्य, आमचा ज्यावर न्याय्य हक्क आहे तोहि आमचे डोळ्यादेखत हिरावला जातो. हे सगळे दोष मोठी बँक झाल्यावर दूर होऊन त्यायोगें नफ्यांत चांगली वाढ होणार नाहीं काय?

**व्यापक हितासाठींच !**

म्हणूनच लहान बँकांचें अस्तित्व मान्य करूनहि आम्हांला मोठी बँक हवीच हवी. बरें, या विरोधकांनीं सांगितल्याप्रमाणें या लहान सचोटीच्या बँका देशभर पसरलेल्या खेड्यापाड्यांत खोलवर जाऊन तेथील भूमिगत पैसा बाहेर काढून, तिथल्या लोकांना बँकिंगच्या सवयी लावून आपलें अस्तित्व प्रकर्षानें राखूं शकतीलच, व बँकिंगचीं पाळेंमुळें खोलवर नेल्याचें श्रेय त्यांना लाभेल. मी तर उलट असें विचारतों कीं, या लहान बँकांना सुद्धां अस्तित्वासाठीं शहरी भागांतच एकमेकांशीं स्पर्धा करण्यासाठीं शाखा कां उघडाव्याशा वाटाव्यात? पुणें, कोल्हापूर, सांगली, नागपुर, बेळगांव, जळगांव, धुळें इथंच जाऊन एकमेकांचाच ग्राहक वर्ग ओढण्याकडेच त्यांनीं आपलें लक्ष कां घालावें? या बाबतींत कुठल्याहि बँकांत एकमत नाहीं. जिथें बँकिंगचा प्रसार हें उच्च ध्येय नाहीं, तिथें एकमेकांनीं एकमेकांचीं क्षिति कां बाळगावी? व मग एक बँक असें करतें, तर दुसरीनें कां करूं नये असा साहजिकच प्रश्न येतो. आपापल्या संस्थेबद्दल प्रेम असणें ही अगदीं स्वाभाविक गोष्ट आहे. तिला लहानाची मोठी करून वाढविल्यानें ती सोडणेंहि कठीण असतें व म्हणून विलीनीकरणाला विरोध करणारे लोक, तें कसें शक्य आहे, असें विचारतात. पण हें मान्य करूनहि देशहितासाठीं, आपल्याच लोकांच्या फायद्यासाठीं, आपापल्या संस्थांचा दुरभिमान सोडणें व स्वार्थत्याग करणें हें जास्त अभिमानास्पद ठरणार नाहीं काय?

**प्रांतीय भावनेचा बागुलबोवा**

आतां आपण आणखी कांहीं आक्षेपांचा विचार करूं. कांहीं लोक म्हणतात, या प्रश्नाकडे तुम्हीं प्रांतीय भावनेनें बघतांच कां? समजा, तुम्हीं अशी महाराष्ट्रीय बँक काढली तर सिंधी, पारशी, गुजराथी, अशा इतर प्रांतीय व जातीय लोकांनीं तुमच्याकडे ठेवी कां ठेवाव्यात! नि त्यांनीं जर त्या काढून नेल्या तर दरिद्री महाराष्ट्राची ही बँक काय प्रगति करूं शकणार आहे? हें विधान भ्रममूलक तर आहेच पण शिवाय उद्वेगपूर्णहि आहे. त्या विधानाशीं सहमत असणाऱ्या लोकांना माझी येवढीच विनंति आहे कीं, त्यांनीं आजवरकेलाहि आपल्या बँकांच्या ठेवींचें पृथक्करण करावें व अशा एकूण ठेवींत वरील प्रकारच्या किती ठेवी आहेत (आज वरील बँक अस्तित्वांत नसतांनाहि) त्यांचे व टक्केवारी प्रमाण यांचे उद्बोधक आंकडे प्रसिद्ध करावेत. माझी खात्री आहे कीं, हे आंकडे प्रसिद्धीलायक नक्कीच नसतील. उलट, आक्षेपकांना असेंच आढळून येईल कीं, महाराष्ट्राच्या बँका या महाराष्ट्रीय लोकांच्याच सर्वथैव पाठिंब्यावर चालल्या आहेत. उलटपक्षीं, आमच्याचपैकीं अनेक महाराष्ट्रियांच्या, मोठमोठ्या कारखानदारांच्या मोठमोठ्या ठेवी व व्यवहार महाराष्ट्रीयेतर बँकांतच आज मोठ्या प्रमाणावर आहेत असेंच आढळून येईल व आपली अशी मोठी बँक झाल्यावर ते लोक निश्चित आपल्यांत येतील. त्यामुळें वरील नवीन बँकेच्या निर्मितीनंतर जरी इतर प्रांतीय लोकांनीं आपल्या सर्व ठेवी, अगदीं मुदतीच्या ठेवी सुद्धां, मुदत भरण्यापूर्वी परत मागितल्या तरी ती बँक मोठ्या खुषीनें त्यांना त्या परत देऊं शकेल. या आक्षेपकांना उलटपक्षीं असेंच दिसून येईल कीं या इतर प्रांतीय लोकांचा आपल्याशीं येणारा संबंध ठेवीदार म्हणून येण्यापेक्षा ऋणको या नात्यानेंच जास्त येतो व तो देखील महाराष्ट्रियांच्यापेक्षा जास्त विश्वासू अशा प्रकारें नव्हे. उलटपक्षीं, अशा ठेवींना त्यांच्या हितसंबंधाची बँक निघाली कीं प्रथम पाय फुटतात. पुण्यासारख्या ठिकाणीं हा अनुभव नेहमी आहे. उलटपक्षीं, आपलेच ठेवीदार आपल्याला जास्त भक्कम तऱ्हेनें चिकटून रहातात. अर्थात्, वरील लोकांतहि कांहीं अपवाद आहेतच व अशा लोकांनीं कुठल्याहि तऱ्हेची काळजी व्यक्त न करतां आमच्यावर विश्वास ठेवून आपल्या ठेवी आमच्याकडे ठेवल्या, तर आम्हीं नक्की त्यांच्या विश्वासास पात्रच ठरूं.

**प्रादेशिक पुनर्घटना**

यानंतर कांहीं लोक अशी पुनर्घटना प्रांतीय तत्त्वावर करण्या-

ऐवजीं प्रादेशिक तत्त्वावर 'रिजन वाइज' करा असें म्हणतात, व माझेंहि तसेंच मत आहे. मात्र सध्यां अस्तित्वांत असलेला मुंबई प्रांत हाच मात्र मी एकजिनसी प्रदेश समजत नाहीं. उलट आज ना उद्यां निर्माण व्हावयाचा संयुक्त महाराष्ट्र हाच प्रादेशिक तत्त्वावर आधारला जाणार आहे. या लोकांना संयुक्त महाराष्ट्र हा एक प्रदेश कां वाटूं नये ? व मुंबई प्रांत ( सध्यांचा ) हाच प्रदेश एकजिनसी कां वाटावा ? आमच्या मतें संयुक्त महाराष्ट्र हाच एक अविभाज्य प्रदेश ठरेल. मी सुद्धां रूरल बँकिंग इन्क्वायरी कमिटी-पुढें साक्ष देतांना अशा प्रदेशनिहाय बँकांचाच पुरस्कार केला होता व तो अजूनहि कायम आहे. कुणीतरी म्हटल्याप्रमाणें, इंग्लंडहून आल्यावर तिथल्या पांच मोठ्या बँकांची भुरळ पडून मी तें तत्त्व विसरून मोठ्या बँकेचे विचार मांडत आहें, असें मुळींच नाहीं. प्रादेशिक तत्त्वावरच बँकांची पुनर्घटना करतांना अशी एका प्रदेशा-साठीं एक मोठी बँक असणें योग्य आहे असें म्हणणें विसंगत नाहीं. उलट आक्षेपकच प्रादेशिक बँका व मोठी बँक यांची गल्लत करीत आहेत. अशा प्रादेशिक तत्त्वावर प्रत्येक प्रदेशासाठीं मोठी एक बँक निघाल्यावर आज ज्या ५–६ मोठ्या बँकांना सबंध भारतांतील बँकिंग पादाक्रांत करण्याची ईर्षा आहे, तिला पायबंद बसेल. अशी बँक निघाल्यावर शाखा उघडतांना मोठ्या बँकांऐवजीं तिला प्रथम प्राधान्य द्यावें लागेल. बरें, आज मुंबई प्रांत हाच एक प्रदेश (स्वाभाविक) समजणाऱ्या लोकांना मग त्याच प्रदेशांत दुसऱ्या मोठ्या बँकेनें कुठेंहि शाखा काढून (उदाहरणार्थ, मिरज, सांगली, गोकाक, बेळगांव) स्थानिक बँकांना शह दिला, तर कां बढकी भरावी ? कारण कुठल्याहि एकसंधी प्रांतांत प्रादेशिक तत्त्वाप्रमाणें मोठ्या बँकांनाहि शाखा काढण्यास स्वातंत्र्य असणारच ! असें असतांना उपरनिर्दिष्ट ठिकाणीं मुंबईतल्याच एकाद्या बँकेनें जर शाखा उघडल्या तर या लोकांनीं कां ओरड करावी ? तेव्हां त्यांचे आक्षेप कसे फोल आहेत हें उघड दिसून येतें. एका विरोधकानें मी हें एकत्रीकरण मुंबई वगळून करण्याचें सुचविलें आहे व त्यामुळें मुंबईबद्दलचा आपला आग्रह आपण होऊन सोडत आहोंत व त्यामुळें मी आठ ऐवजीं या प्रदेशांतील सर्व बँकांचें एकत्रीकरण सुचविलें असतें तर बरें असें ध्वनित केलें आहे. पण मी घेतलेल्या आठ बँकांत एक मुंबईची बँक आहे व लहान बँका नष्ट करून मोठी बँक निघावी किंवा ती एकमेवच असावी असा माझ्या लेखाचा उद्देश नव्हता. त्यामुळें वरील आक्षेप आपोआपच निराधार ठरतात. वरील मुख्य आक्षेप संपल्यानंतर आतां किरकोळ मुद्यांचा विचार करूं.

### सुसूत्रीकरणाच्या मर्यादा

कांहीं लोकांचें म्हणणें असें आहे कीं केवळ बंगाल, राजस्थान अगर अन्यत्र अशी लाट आली म्हणून आपणहि तिच्या आधीन होऊं नये. राजस्थानची गोष्ट वेगळी आहे. बंगालमध्यें १९४६ सालीं खूप बँका बुडाल्या व त्या अनिश्चितेच्या वातावरणामुळें तिथें ही लाट आली. तशी महाराष्ट्रांत आज परिस्थिति नाहीं. पण तशी परिस्थिति नाहीं म्हणून आपण संघटित होऊन एकत्र होऊं नये असं म्हणणं मात्र रास्त नाहीं. रोग बरा करण्यापेक्षां तो होऊं न देणें श्रेयस्कर. त्यामुळें अशी परिस्थिति आल्यानंतर मग जागें होणें म्हणजे आग लागल्यानंतर विहीर खणणें होय. आज ती लागलेली नाहीं, तेव्हां विहीर कशाला, अशांतला प्रकार होईल. महाराष्ट्रांत असा प्रकार होणार नाहीं याची कांहीं हमी आहे कां ? १९२५ पूर्वी महाराष्ट्रांतहि असें झालेंच होतें, व ह्यापुढें कशावरून होणार नाहीं ? तसें नसतें तर कांहीं दिवसांपूर्वी कांहीं बँकांवर कांहीं ठिकाणीं ठेवीदारांनीं एकदम गर्दी केली, तसें ना होतें. आजहि अनेक बँकांचे भागीदार, त्यांच्या शेअर्सवर व्याज दिलें जात नाही म्हणून नाखूष आहेत व ज्या बँका देऊं शकतात त्यांत ते वाढ मागत आहेत. बँकांचें जसे ठेवीदाराबद्दल जागरुक रहाणें कर्तव्य आहे, तसेंच भागीदारांबद्दलहि आस्था बाळगणें त्यांचें कर्तव्य आहे. आज महाराष्ट्रांतील वरील आठ बँकांचें सरासरी व्याज काढलें तर ते फक्त ३·९% पडतें. भागीदारांना मिळणारा हा मोबदला योग्य आहे असें कुणी म्हणूं शकेल काय ? या सर्व मुद्यांना हात घालण्यापेक्षा, एकत्रीकरणाऐवजीं बँकांनीं सुसूत्रीकरणाचें (कोऑर्डिनेशन) धोरण अवलंबावें व ठेवींचे दर, कर्जांचे व्याजाचे दर, ड्राफ्ट व बिलांचें कमिशन यांचे दर एकमेकांत ठरवून घेऊन एक असेच ठेवावेत व निदान चढाओढीची अनिष्टता काढून टाकावी, म्हणजे आहे त्याहि परिस्थितींत पुष्कळच सुधारणा होईल असें कांहींचें म्हणणं आहे. पण तें प्रत्यक्षांत उतरणें फार कठीण आहे. तसें नसतें तर आज नाणेटंचाईच्या वेळीं ठेवी गोळा करण्यासाठीं बँकांमध्यें जी अनिष्ट स्पर्धा सुरू झाली आहे तिचा अन्वय कसा लावतां येईल ? प्रत्येक बँक वेगवेगळ्या तऱ्हेच्या योजना काढून वा अन्य तऱ्हेनें ठेवीदार आपणांकडे कसे आकृष्ट होतील याचें धोरण आंखीत आहेत. तेव्हां असें सिंडिकेट कांहीं बाबतींत स्थापन होणें कठीण आहे व यदाकदाचित् जरी झालें तरी तीं बंधनें प्रत्येक बँक पाळीत आहे कीं नाहीं हें कोण बघणार ! असे करार हे साधारणतः न पाळण्यासाठींच असतात असा सर्व जगाचा, सर्व ठिकाणीं, अनुभव आहे.

### रिझर्व्ह बँकेकडे बोट

याशिवाय आणखी एक उपस्थित केलेला मुद्दा असा आहे कीं, असे वादग्रस्त प्रश्न खुद्द रिझर्व्ह बँकेनेंच हातीं घेऊन त्यांची इष्टानिष्टता ठरवून त्याची दिशा दाखवावी. पण याबाबत रिझर्व्ह बँकेनेंच गतिमान व्हावें असें म्हणण्याइतकें आम्ही कां अगतिक व्हावें ? राज्यें किंवा असे मोठे प्रश्न हे लोकमतानुसारच चालले पाहिजेत व लोकांना, याबाबत काय हवें व काय नको हे वेगवेगळ्या संबंधित व्यक्तींच्या अगर संस्थांच्या कानावर नेण्याचा पूर्ण अधिकार आहे. मतप्रदर्शन ही लोकशाहीच्या प्रगतीस एक अत्यंत आवश्यक गोष्ट आहे. तेव्हां आपल्या गरजा काय आहेत हें रिझर्व्ह बँकेनें आपणांस सांगण्यापेक्षा आपणांस काय हवें आहे हें आपणच त्यांच्या कानावर घालणें ह्यांत काय गैर आहे ?

कांहीं संबंधी लोकांचें याबर असें मत पडलें कीं आतां बँकिंग-बाबत १९४९ सालीं कायदाच झाला असल्यानें रिझर्व्ह बँकेच्या हातीं पुष्कळच सत्ता आली आहे व निरोगी अशा बँकिंग प्रवृत्तीची वाढ होईल अशाच तऱ्हेनें ह्या सत्तेचा वापर होत असल्यानें


सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि.
सारस्वत बँक बिल्डिंग, गिरगांव मुंबई
शेअर भांडवल व रिझर्व रु. १२,७०,३००
ठेवी ....... ....... ....... रु. १,१९,२१,७००
एकूण खेळतें भांडवल रु. १,३३,९४,५००
बँकेचे सर्व व्यवहार केले जातात
शाखा:- दादर माहीम
शाखा:- बेळगांव पुणें
स्थापना १९१८


बँका बुडण्याचे प्रकार होणारच नाहींत व रिझर्व्ह बँक प्रत्येक बँकेसच योग्य दिशा दाखवेल. पण आज कायदा झाल्यानंतर तीन वर्षांनींहि बँका बुडाल्याच आहेत. १९५२ सालीं असे प्रसंग आले व नुकतेच नॅशनल सेव्हिंग्ज बँकेचें उदाहरण लोकांसमोर आहेच. तेव्हां यापुढें बँका बुडण्याचे प्रकार होणारच नाहींत हें म्हणणें चुकीचें आहे.

### चर्चेपासून फायदाच होईल

अशा रीतीनें माझ्या लेखांतील एकत्रीकरण व मध्यवर्ती बँक यांवर घेतले गेलेले आक्षेप कसे निराधार आहेत हें दिसून येईल. कांहीं लोकांचें यावर असें मत पडलें कीं अशा विषयावर वर्तमानपत्रांत चर्चा व्हावी हें इष्ट नाहीं; त्यायोगें महाराष्ट्रांतील बँकांवर कांहींतरी संकट कोसळलें आहे किंवा कोसळूं पाहत आहे असा लोकांचा ग्रह होईल, असें त्यांचें म्हणणें आहे. पण कुणाच्याहि मनांत तसा विकल्प येण्याचें कारण नाहीं असा मी लगेच खुलासाहि केला होता. उलटपक्षीं अशी चर्चा झाल्यानेंच सामान्य जनतेलाहि ठेवीदार, भागीदार या नात्यानें, या क्षेत्रांत काय चाललें आहे तें कळेल व त्यांचेंहि मत मिळेल असेंच मला वाटलें व तेंच इष्ट झालें असें मला वाटतें. वर्तमानपत्र व अर्थकारण यांचे वांकडें असावें असा नियम नाहीं. पंचवार्षिक योजना, बँका व विमा कंपन्या यांचें राष्ट्रीयीकरण योग्य का अयोग्य, अवमूल्यन व त्याचे इष्टानिष्ट परिणाम, यांवर जसा वर्तमानपत्रांत उहापोह होतो तसाच या बाबतींतहि झाला. त्यामुळेंच इतर विषयाप्रमाणें या विषयावरहि कुणाची मतें काय आहेत व एकूण मतप्रवाह कसा आहे तें कळलें व त्या दृष्टीनें कुठलाहि गैरसमज न होतांच ही चर्चा झाल्यानें वर वाटलेली भीति अनाठायीं आहे. कुठल्याहि व्यक्ती वा संस्थांवर विशिष्ठ हेतूनें चर्चा नसावी हें मान्य आहे पण तात्त्विक विषयावर चर्चा करण्यास कांहींच हरकत नाहीं.

तेव्हां या सर्व गोष्टींचा परत साधकबाधक विचार करून, लहान बँकांचें अस्तित्व व महत्त्व मान्य करूनहि, महाराष्ट्राला एक तरी मोठी बँक हवी कां नको व हवी असल्यास ती लवकर व कुठल्या सुगम उपायानें होईल हें बघणें संबंधी लोकांचें कर्तव्य ठरेल. लहान बँकांचें अस्तित्व व महत्त्व ह्यांचें मी विस्तारानें वर्णन केलें नाहीं, ह्याचा अर्थ तें मला मान्य नाहीं, असें म्हणणें चुकीचें आहे. लहान बँकांना जें कार्य करतां येणार नाहीं, तें करण्यासाठीं मोठ्या महाराष्ट्रीय बँकांची आवश्यकता आहे, असा माझा मुद्दा आहे. उपयुक्त कार्य करणारी भक्कम लहान बँक नको, असें म्हणणें मूर्खपणाचें होईल. मोठी बँक निर्माण कशी व्हावयाची, एवढाच प्रश्न फारतर वादग्रस्त होऊं शकेल. अनेक मोठ्या बँका हव्या असतांना एक मोठी बँकहि स्थापन होणें कठीण आहे. अशा परिस्थितींत, निदान शक्य तेवढी मोठी बँक बनविण्याचा विचार करता, सुचलेली योजना मी पुढें मांडली होती व आहे. या लेखांतहि कुठल्याहि संस्था वा व्यक्ती यांचा नामनिर्देश न करतां, किंवा ज्या आठ बँका घेतल्या होत्या त्यांचा उल्लेखहि फक्त या विषयाचा परामर्श घेण्यापुरताच केला आहे. त्यांत दुसरा कांहींहि हेतु नाहीं.

## सांगली अर्बन को. बँकेची नवी इमारत



दि. २६ जानेवारी, १९५३ रोजीं अर्बन को. बँक लि., सांगलीच्या इमारतीचा उद्घाटन समारंभ मुंबई येथील सिडनहॅम कॉलेजचे प्रिन्सिपॉल श्री. एस. के. मुरंजन ह्यांच्या हस्तें झाला व बँकेचें कामकाज बँकेच्या स्वतःच्या इमारतींत सुरू झालें.

## संबंधित आठ बँकांचा १९५१ व १९५२ चा तुलनात्मक ताळेबंद

( ०० वगळून हे आंकडे शेकड्यापर्यंत रु. चे आहेत )

| | १९५१ | १९५२ | | १९५१ | १९५२ |
|---|---|---|---|---|---|
| जमा भांडवल | ६९,२९७ | ६९,४१७ | रोकड व बँकेंत | १,५६,७७२ | १,७०,८८३ |
| गंगाजळी | २१,८६५ | २४,०७३ | गुंतवणूक | ३,२०,३८४ | ३,५३,५९५ |
| ठेवी | ८,२१,२०५ | ८,३२,०४९ | कर्जें | ४,६६,८७९ | ४,२५,५०४ |
| बिल्स पेएबल इ. | १,२०,८२६ | ९८,१०७ | इमारती, फर्निचर इ. | १८,९६६ | २१,८०४ |
| नफा (मागील वर्षाचा ओढलेला धरून) | ७,०६९ | ७,१३५ | इतर येणीं | ७७,२६१ | ५८,९९५ |
| एकूण खेळतें भांडवल | १०,४०,२६२ | १०,३०,७८१ | | १०,४०,२६२ | १०,३०,७८१ |

## १९५० व १९५२ चे महाराष्ट्रांतील बँकांचे तुलनात्मक आंकडे

( आंकडे हजारांत रु. चे आहेत )

| | जमा भांडवल | | गंगाजळी | | ठेवी | |
|---|---|---|---|---|---|---|
| | १९५० | १९५२ | १९५० | १९५२ | १९५० | १९५२ |
| बँक ऑफ महाराष्ट्र | १,६०० | १,६०० | ४७१ | ५६५ | २३,०७४ | २७,०८२ |
| बँक ऑफ नागपूर | ९९८ | १,००० | ५० | ५० | ६,३६६ | ५,२४६ |
| बँक ऑफ पूना | १,२५० | १,२५० | ५ | १७ | २,४७८ | २,१९६ |
| बेळगांव बँक | ६०० | ६०० | १४२ | १७६ | ५,८९८ | ७,५८५ |
| लक्ष्मी बँक | २,५०० | २,५०० | १९३ | २३० | ९८५ | १,०९८ |
| मिरज स्टेट बँक | ६०० | ६०० | ५५८ | ६२५ | ३,८७९ | ३,९८६ |
| प्रेसिडेन्सी इं. बँक | ७२० | ७१३ | १३५ | १७६ | ६,३५८ | ६,१७४ |
| सांगली बँक | ३०० | ४५० | ३३० | ४३९ | ७,६५८ | ८,५२५ |
| न्यू सिटिझन बँक ऑफ इंडिया | १,००६ | १,००६ | १४५ | २३३ | २१,८२४ | १९,८४७ |
| युनायटेड वेस्टर्न बँक | ५६० | ६५० | १५१ | १७९ | ७,५४४ | ६,६९९ |
| बँक ऑफ औरंगाबाद | ५३२ | ६२२ | — | १२ | २१८ | ४२५ |
| बँक ऑफ कोल्हापूर | १,०१३ | १,०१३ | १,१६४ | ८९४ | ९,६८९ | ५,७४५ |
| बँक ऑफ कोंकण | ५०३ | ५१४ | १५ | २४ | २,२०८ | १,७११ |
| बँक ऑफ रूरल इंडिआ | ५०० | — | ३४ | — | ८३७ | — |
| बांठिया बँक | ४७८ | ४९३ | ४८ | ५ | २,९५६ | १,८५५ |
| रत्नाकर बँक | ५०३ | ५०३ | ६५ | ८६ | ३,४८३ | ४,१६५ |
| सेफ बँक | ६८५ | १,०५१ | ३ | ६ | ३,०२६ | ३,७६८ |
| बँक ऑफ औंध | १६२ | १६८ | ७१ | ५६ | १,०९१ | ९६७ |
| बँक ऑफ सिटिझन्स | ३५० | ३७० | १०२ | ११५ | २,५६९ | २,५९१ |
| बँक ऑफ कराड | २१८ | २१८ | ३२ | ३९ | १,७७४ | १,८०५ |
| भारत इंडस्ट्रियल बँक | ३९९ | ४०० | ५१ | ७६ | ५,३७२ | ४,६७१ |
| भोर स्टेट बँक | २५० | २५० | ७० | ७३ | ९९२ | १,१२३ |
| बुधगांव बँक | १०० | १०० | ११५ | ११३ | ८४३ | ८४० |
| कमार्शिअल बँक | १८८ | १८८ | १६६ | १६८ | २,७३५ | १,५०९ |
| गणेश बँक | ३८ | ३८ | ९१ | १०१ | ४४१ | ५१९ |
| युनियन बँक ऑफ सोलापूर | १३२ | १५८ | ८२ | ९२ | २,२६४ | २,२४९ |
| इंडस्ट्रिअल बँक | १३९ | २७५ | ६ | १६ | ३६५ | ३९८ |
| जंजिरा बँक | ३०० | ४२२ | ७९ | १०२ | २७९ | १७६ |
| न्यु ओरिएंटल बँक | १०० | — | २ | — | १७७ | — |
| सिंध नॅशनल बँक | — | २६२ | — | ७ | — | १६१ |
| सराफ बँक ऑफ कोल्हापूर | २५० | २५० | २ | ७ | २१९ | १४३ |
| सातारा स्वदेशी कम. बँक | २३६ | २३९ | १०४ | १५८ | ४,३४८ | ४,०१५ |
| सुप्रीम बँक ऑफ इंडिया | २५० | — | ५७ | — | १,७०६ | — |
| युनियन बँक ऑफ कोल्हापूर | १६३ | १७१ | ७९ | १०९ | २,२८८ | २,०९२ |
| बँक ऑफ बार्शी | ६८ | ७० | ९ | ८ | ३४६ | १३९ |
| डेक्कन इंडस्ट्रियल बँक | ६३ | ६३ | १० | १२ | ३३३ | ३९७ |
| गुडविल बँक | ६१ | — | ८ | — | ३१ | — |
| फलटण बँक | ४४ | ४८ | २६ | २६ | ८२ | १०५ |
| पूना इन्व्हेस्टर्स बँक | ६५ | ६५ | ९ | १० | १,१०२ | १,३२४ |

# महाराष्ट्रांतील गेल्या दुष्काळापासून बोध

## सरकारी धोरणांत इष्ट बदलासाठी जागरूक लोकमताची आवश्यकता

( डॉ. र. गो. काकडे, एम्. ए., एल्एल्. बी., पीएच्. डी., चिटणीस, महाराष्ट्र मध्यवर्ती दुष्काळ-निवारण समिति )

चालू सालीं सबंध महाराष्ट्रांत सर्वसाधारणपणें चांगला पाऊस झाल्यानें गतसालचा दुष्काळ आतां जवळजवळ संपला आहे. त्यामुळें दुष्काळासंबंधींच्या घटनांकडे वस्तुनिष्ठदृष्ट्या पहाणें आतां शक्य झालें आहे. तेव्हां, त्याबाबतचे कांहीं वैयक्तिक विचार व अनुभव, पुढें पडणाऱ्या दुष्काळांत उपयुक्त ठरतील या कल्पनेनें मांडण्याचें योजिलें आहे.

### तीस वर्षांतील सर्वांत वाईट दुष्काळ

महाराष्ट्रापैकीं आठ जिल्ह्यांतील ४४०० गांवांतील सुमारें ४२ लाख माणसें व सुमारें १० लाख जनावरें यांना गतसालच्या दुष्काळाची कमी–जास्त प्रमाणांत झळ लागली. विशेष म्हणजे, दुष्काळमुक्त म्हणून समजले जाणारे खानदेश जिल्हेहि त्यांत सांपडले ! १९१८ सालानंतर महाराष्ट्रांत एवढ्या विस्तृत प्रमाणावर दुष्काळ पडला नव्हता !! कांहीं भागांत तर गतसालचा दुष्काळ हा लागोपाठ तिसऱ्यांदा अगर चौथ्यांदा पडल्यामुळें तेथील दुष्काळाची तीव्रता विशेष होती. त्यांतील कांहीं गांवें–शहरें पिण्याच्या पाण्याच्या टंचाईमुळें उठतील किंवा काय अशी सबळ भीति निर्माण झाली होती. जनावरांच्या चाऱ्याच्या बाबतींतहि अत्यंत काळजीची परिस्थिति होती व हजारों जनावरें प्रत्यक्ष मृत्युमुखीं पडलींहि. यामुळेंच हिंदुस्थान सरकारच्या दुष्काळ कमिशनचे अध्यक्ष श्री. एस. व्ही. राममूर्ति यांनीं गतसालच्या दुष्काळाचें '३० वर्षांतील सर्वांत वाईट दुष्काळ' म्हणून वर्णन केलें होतें.

### गांभीर्य नाकारण्याची अनिष्ट प्रवृत्ति

प्रत्यक्ष दुष्काळी परिस्थिति वरीलप्रमाणें भयानक असतांना महाराष्ट्रांत खरोखरीच दुष्काळ पडला आहे, कीं वर्तमानपत्रांतून एकसारखी ओरड चालू ठेवून दुष्काळाचा नसता बभ्रा करण्यांत येत आहे, अशी शंका अनेक जाणत्या लोकांकडून व्यक्तविली जात होती ! जास्तींत जास्त दुष्काळी कामें काढली जाऊन आपल्या भागाचा फायदा व्हावा या हेतूनें दुष्काळी परिस्थितीचें भडक चित्र मुद्दाम रेखाटलें जात असावें, अशी एक समजूत तीस कारणीभूत होती. सरकारला व सर्वसाधारण जनतेला दुष्काळाचें वास्तव दर्शन घडवून दिल्यास, पीडितांना योग्य त्या प्रकारची मदत पुरेशा प्रमाणावर नि वेळेवर मिळेल या भावनेनें केलेल्या निवेदनामागें कांहींना प्रांतीय स्वार्थ साधण्याचा हेतु दिसे ! तर कांहींना त्यांत सरकारविरोधी प्रचाराचा वास येई !! दुष्काळ व भूकबळी यांचेमधील पूर्वींचें साहचर्य ज्यांच्या मनांत अद्याप ठाण मांडून आहे त्यांनीं महाराष्ट्रांतील गतसालच्या दुष्काळास दुष्काळ म्हणून संबोधण्याचें नाकारल्यास आश्चर्य नाहीं. तसेंच १८९८ ते १९०० मधील दुष्काळांशीं तुलना करून गतसालची परिस्थिति ही दुष्काळीच नव्हती, असें कांहीं जबाबदार लोक अट्टाहासानें म्हणतांना आढळत. कारण काय, तर त्या वेळच्या मानानें गतसालीं दुष्काळी कामांवरील मजुरांची संख्या मोठी नव्हती. हीं तुलना अनेक दृष्टीनें चुकीची ठरेल. कारण, गतसालीं सरकारकडून सोयीच्या ठिकाणीं पुरेशीं दुष्काळी कामें काढण्यांत आलीं होतीं; एवढेंच नव्हे तर बाहेरच्या मानानें दुष्काळी कामावरील वेतनाचे दर वगैरे समाधानकारक होते असें तींत गृहीत धरलें आहे. तसेंच सरकारनें काढलेल्या कामाशिवाय, इतरत्र रोजगार धंदा मिळण्यास १९०० व १९५२ सालीं सारखाच वाव असल्यामुळें प्रत्येक पीडित मनुष्य दुष्काळी कामावरच जाईल, असेंहि त्यांत गृहीत धरलें आहे. तसेंच, ग्रामीण भागांत शेतीच्या हंगामाशिवाय इतर वेळीं आढळणारी नित्याची बेकारी व दुष्काळजन्य अशी मोठ्या प्रमाणावरील बेकारी, असे हे दोन्ही बेकारीचे प्रकार सारखेच लेखण्याचा प्रयत्न दिसून देई ! हें सर्व इतक्या विस्तारानें लिहिण्याचा हेतु असा कीं, एकूण परिस्थितीकडे वास्तवतेनें पाहून तिचें अचूक मूल्यमापन करून, तिच्याबाबत योग्य ती उपाययोजना करण्याचा विचार न होतां, वस्तुस्थितीचें गांभीर्य जाणून-बुजून अगर अजाणता नाकारण्याची किंवा कमी लेखण्याची अनिष्ट प्रवृत्ति गतसालचे दुष्काळाबाबत कांहीं जबाबदार व जाणत्या लोकांत प्रथमच दिसून आली.

### लोकशाही सरकारची उपाययोजना

प्रातिनिधिक लोकशाही सरकार अधिकारावर असल्यामुळें १९५२ सालच्या अवर्षणामुळें निर्माण होणाऱ्या परिस्थितीकडे त्याचें पहिल्यापासून बारकाईनें लक्ष होतें. कांहीं जिल्ह्यांत पूर्वींच्या वर्षी जाहीर केलेली दुर्भिक्ष्याची परिस्थिति चालू आहे, असें समजून दुष्काळी कामेंही चालू ठेवण्यांत आलीं व कांहीं नवीन सुरू केलीं गेलीं. दुष्काळांत काढलेलीं कामें हीं दुष्काळानंतर अर्धवट सोडून देण्यांत येत. हें पूर्वीपासून चालत आलेलें चुकीचें धोरण बदलून, दुष्काळी कामें पूर्ण करण्याचें नवीन धोरण सरकारनें जाहीर केलें व त्या धोरणाप्रमाणें हातीं घेतलेलीं पाणी–पुरवठ्याचीं कामें पुरीं करण्यासाठी हिंदुस्थान सरकारकडून १·१७कोटी रु.चें कर्जहि मिळविलें. खडी फोडणें किंवा रस्ते करणें वगैरेसारखीं तात्कालिक कामें हातांत न घेतां पाणी–पुरवठ्याच्या लहान व मध्यम योजनांना व कॉंटूर बंडिंगसारख्या फलदायी कामांना दुष्काळांत प्राधान्य देण्याचें ठरविलें. तसेंच, दुष्काळी कामावरील मजुरांना राहण्याची, पिण्याचे पाण्याची, औषधोपचाराची वगैरे व्यवस्था पूर्वींच्या दुष्काळापेक्षा गतसालच्या दुष्काळांत सरकारकडून चांगली करण्यांत आली होती, हेंहि कबूल करावें लागेल.

### सरकारनें न केलेल्या कांहीं बाबी

याउलट, सरकारनें करावयास पाहिजे होत्या पण ज्या प्रत्यक्षांत केल्या गेल्या नाहींत अशा कांहीं बाबींचा येथें निर्देश करणें जरूर वाटतें. कांहीं भागांत ( उदाहरणार्थ, उत्तर साताऱ्यांतील खटाव तालुका, खंडाळा पेटा व फलटण तालुक्यांतील कांहीं गांवें ) गतसालच्या अवर्षणामुळें पिकांचें नुकसान होऊन निमदुष्काळी परिस्थिति निर्माण झाल्याचें कबूल करूनहि तेथें तशी परिस्थिति असल्याची सरकारी घोषणा शेवटपर्यंत करण्यांत आल्याचें कोणास माहीत नाहीं ! जबाबदारी अंगाबाहेर टाकण्यासाठींच कीं काय "दुर्भिक्षाच्या छायेंत" अशा सारखे नवीन नवीन शब्दप्रयोग प्रथमच योजण्यास सरकारनें सुरुवात केली ! गतसालची

# बांठीया बँक लिमिटेड

( स्थापना १९४१ )

हेड ऑफिस— पनवेल ( कुलाबा )

—शाखा—

मुंबई, पुणें, अहमदनगर, कल्याण, भिवंडी, श्रीरामपूर

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | | रु. |
| ( १५००० भागांत विभागलेलें ) | ... | १५,००,००० |
| विक्रीस काढलेलें भांडवल | ... | ७,५०,००० |
| खपलेलें व वसूल केलेलें भांडवल | | |
| ( राखीव निधीसह ) | ... | ५,४९,१५४ |
| खेळतें भांडवल ( ता. ३०-६-५३ ) | ... | २८,२५,३०० |

—संचालक मंडळ—

श्री. केशरचंद आनंदराम बांठीया, श्री. रतनचंद भिकमदास बांठीया ( चेअरमन ), श्री. सिवराज आनंदराम बांठीया, श्री. विरदीचंद भूरचंद बांठीया, श्री. सोराबजी रुस्तमजी घासवाला, श्री. गंगाधर विष्णु पुराणिक, श्री. केशव गोविंद लिमये, B. A. LL. B., श्री. जयनारायण शिवनारायण कासट, B. Com. श्री. चुनीलाल जसरुप मुणोत, श्री. रावजी भिमजी रंगपरिया, ( ऑ. मॅजिस्ट्रे. )

**व्याजाचे आकर्षक दर**

रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांचे परवानगीनें नवीन शेअर-विक्री चालूं केली आहे. प्रत्येक शेअर १०० रुपयांचा आहे. अर्जासोबत रु. ५० द्यावयाचे आहेत. अर्जाचा नमुना बँकेचे कोणतेही ऑफिसांत मिळेल.

श्री. रतनचंद भिकमदास बांठीया
चेअरमन

आमचे हितचिंतकांना ही दिवाळी भाग्याची जावो !

# धी बँक ऑफ सिटिझन्स लिमिटेड

मुख्य कचेरी—१५१४ मारुती गल्ली, बेळगांव

( स्थापना १९३७ )

*सुरक्षितपणा, सचोटी व सेवा या त्रयींवर अधिष्ठित असलेली*

**बेळगांव, धारवाड, कारवार आणि विजापूर या जिल्ह्यांतील प्रमुख शहरीं बँकेच्या शाखा असून सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार करणारी मुंबई कर्नाटकांतील एकमेव बँक.**

**मुंबई व इतर ठिकाणांहून रेल्वे रिसिटस वसुलीसाठीं पाठविणेची सोय आहे.**

जी. डी. सराफ
चेअरमन

# कॉसमॉस को-ऑपरेटिव्ह अर्बन बँक लि. पुणें

—स्थापना दि. १८ जानेवारी, १९०६—

कामाची वेळ:— सकाळीं ९ ते ११-३० व सायंकाळीं ५-३० ते ७

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | .... | रु. २,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल | .... | रु. १,१६,२२० |
| गंगाजळी व इतर निधि | .... | रु. १,६६,४५० |

हप्तेबंद ( रिकरिंग ) व कायम ठेवीवरील व्याजाचा दर एक वर्ष २ टक्के, २ वर्षे २॥ टक्के व ३ वर्षे ३ टक्के

बँक आपल्या सभासदांनाच दोन जामीन, घर, सरकारी कर्जरोखे, कायम ठेव, सोनें, पोस्टल पॉलिसी अगर बँकेनें पसंत केलेल्या विमा कंपन्यांच्या पॉलिसी, वगैरे तारणांवर कर्ज देतें. **सोन्याच्या तारणांवर व्याजाचा दर ५॥ टक्केप्रमाणें आहे.** तसेंच माफक व्याजाच्या दरानें सभासदांना ओव्हरड्राफ्ट देण्यांत येतात. सरकारी नोकरांचा पगार, पेन्शन, बिलेंवसुली इत्यादि बँकिंगचे व्यवहार बँक करिते. तसेंच सभासदांस नियमितपणा, काटकसर व शिल्लक ठेवणेची संवय लागावी या हेतूनें बँकेनें नवीन हप्तेबंद ठेव घेणेस सुरुवात केली आहे.

**बँकेनें सुरक्षिततेसाठीं, सेफ कस्टडी खातेंहि सुरू केलें आहे.**

नियमांसंबंधीं कचेरींत चौकशी करावी.

य. श्री. शाळिग्राम, कार्यवाह.  
वि. ना. दातये, बी. ए., कार्याध्यक्ष.

# अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि. सांगली.

हरभट रोड, सांगली. ( जिल्हा—दक्षिण सातारा. )

स्थापना सन १९३१ —— फोन नंबर ५३

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | ५ ००,००० |
| वसूल झालेलें भांडवल | रु. | १,८७,२०० |
| रिझर्व्ह फंड | रु. | ८१,६४४-११-० |
| इतर फंड | रु. | १,०६,८६१-१-० |
| ठेवी | रु. | २१,२६,८६१-१४-८ |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | २६,७५,५३६-१४-९ |

—: डायरेक्टर्स :—

श्री. महादेव हरी गोडबोले, B. A., LL. B., (M. L. C.) चेअरमन  
श्री. वासुदेव हरी गोसावी, B. A.,  
श्री. लक्ष्मण दत्तात्रय भिडे  
श्री. वामन विष्णु वाटवे, B. A., LL. B.,  
श्री. गणेश काशिनाथ दांडेकर, D. M. E., कारखानदार  
श्री. रामचंद्र लक्ष्मण कुलकर्णी, उदगांवकर, जमीनदार.  
श्री. केशव विनायक तथा दादूकाका भिडे, व्यापारी.  
श्री. विष्णु हरी माईणकर, B. Sc., LL. B.  
श्री. गंगाधर गोविंद विनीवाले

सेफ डिपॉझिट व्हॉल्टची व्यवस्था आहे.

पिग्मी डिपॉझिट चालू केले आहे.

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

एल. वाय. लागू, B. A., LL. B., मॅनेजर.

परिस्थिति वास्तविक दुष्काळाची असतांना, कायद्याप्रमाणें येणाऱ्या जबाबदाऱ्या व त्यासाठीं होणारा खर्च टाळण्यासाठीं, सरकारनें महाराष्ट्रांत शेवटपर्यंत कोठेंहि दुष्काळ जाहीर न करतां, नुसती टंचाई अगर दुर्भिक्ष्याची परिस्थिति लोकांच्या मागणीस न जुमानतां, कायम टिकविली ! जनावरांना वैरण पुरविण्याच्या बाबतींत तर सरकारी धोरण पहिल्यापासून चुकीचें आंखलें गेलें व त्यामुळें हजारों जनावरें वैरणीच्या अभावीं मृत्युमुखीं पडलीं. शेतीसाठीं आवश्यक अशा जनावरांसाठीच वैरणीचा पुरवठा करण्याची जबाबदारी सरकारनें आपल्या शिरावर घेतली होती. म्हणजे सरकारच्या दृष्टीनें अनावश्यक असलेल्या हजारों जनावरांसाठी वैरण दिली जात नसल्यामुळें तीं वैरणीवांचून मेलीं हें निराळें सांगण्याचें कारण नाहीं. बरें, उपयुक्त जनावरांसाठी तरी वैरणीचा भरपूर पुरवठा वेळेवर होत होता काय ? तर तेंहि कोठल्याहि जिल्ह्यांतील आंकड्यावरून दाखवून देतां येणार नाहीं. अशी प्रत्यक्ष परिस्थिति असतांना, सरकारकडून दिल्या गेलेल्या जनावरांच्या मृत्यूच्या आंकड्यावर कोणाही माहितगार माणसाचा विश्वास कसा बसेल ? शेतीसाठीं जनावरांची अत्यंत आवश्यकता असतांना व जनावरांची हानि लवकर भरून न येणारी असल्यामुळें पूर्वीचे अनुभव लक्षांत घेऊन, नुसत्या नफा–नुकसानीवर लक्ष न ठेवतां जास्त विचारानें, सरकारनें वैरणीच्या पुरवठ्याबाबतचें आपलें धोरण आंखावयास पाहिजे होतें असेंच कोणीहि म्हणेल.

### महाराष्ट्रांतील दुष्काळावर झालेला खर्च

महाराष्ट्रांतील दुष्काळावर होणाऱ्या खर्चाचे बाबतींत मुंबई सरकारचा हात सुरुवातीपासूनच आंखडता होता अशी समजूत सरकारी कारभाराचें सूक्ष्म निरीक्षण करणाऱ्या कोणाही माणसाची झाल्याशिवाय रहात नसे. महाराष्ट्रांतील कांहीं भागांत जून महिन्यांत पाऊस झाल्याच्या बातम्या आल्याबरोबर ज्या घिसाडघाईनें सरकारनें सर्व भागांतील दुष्काळी कामें १ जुलै पासून बंद करण्याचा आणि गरीब शेतकऱ्यांच्या जनावरांना मोफत वाटण्यांत येणारी वैरण व पेंडहि त्याच तारखेपासून बंद करण्याचा निर्णय घेतला, त्यावरून ती समजूत अनेकांच्या मनांत दृढ झाली असल्यास नवल नाहीं. जरूर नसतांना सरकारनें विनाकारण सार्वजनिक पैशाची उधळपट्टी करावी असें कोणीच म्हणणार नाहीं. पण रब्बी भागांतील दुष्काळ हटला नसतांना व कायद्याप्रमाणें तेथील मदतकार्य चालूं ठेवावें लागत असतांना सरकारनें पावसाळ्याबाबतच्या धोरणाची अम्मलबजावणी जरा सावकाशीनें करावयास पाहिजे होती. सरकारनें याबाबतचें आपलें धोरण नंतर बदलून पूर्वीचा निर्णय जरा घाईत घेतला गेल्याची अप्रत्यक्षपणें कबुलीच दिली.

### भूतदयेसाठी सर्वपक्षीय सहकार्य

१९५२–५३ सालांतील महाराष्ट्रांतील दुष्काळनिवारणाच्या बिनसरकारी प्रयत्नांचा विचार करतां एक गोष्ट प्रामुख्यानें उठून दिसते. ती म्हणजे दुष्काळनिवारणाचें भूतदयेचें काम करण्यासाठीं स्थापन करण्यांत आलेली सर्वसंग्राहक समिति ही होय. ह्या समितींत अधिकारावर असलेल्या काँग्रेस पक्षापासून कम्युनिस्टापर्यंत निरनिराळ्या प्रमुख राजकीय पक्षांच्या व इतर भिन्नमतांच्या लोकांनीं भाग घेतला. राजकीय पक्षभेदामुळें परस्पर सहकार्य दिवसेंदिवस कठीण होत असतांना व परमताबद्दलची असहिष्णुता वाढत असतांना, निरनिराळ्या राजकीय पक्षांनीं एका समितींत येण्याचें कबूल केलें ही घटना पुष्कळांना अत्यंत आशादायक व स्वागतार्ह वाटली. दुष्काळाचे निमित्तानें घडून आलेली ही घटना महाराष्ट्रांतील अलीकडील इतिहासांत अगदींच नाविन्यपूर्ण होती यांत शंका नाहीं. प्रत्यक्ष दुष्काळनिवारणाचें कार्य करतांना कांहीं राजकीय पक्ष आपलें स्वतंत्र अस्तित्व विसरूं शकले नाहींत व यावयास पाहिजे तितकें सहकार्य ते सर्वपक्षीय समितीस देऊं शकले नाहींत ही खेदाची गोष्ट होय. दुष्काळाच्या स्वरूपांत जनसेवेची संधि चालून आली असतां आपल्या पक्षातर्फे स्वतंत्ररीत्या तिचा फायदा न घेतां, सर्वपक्षीय समितींत विलीन होऊन तिच्यामार्फत दुष्काळपीडितांना शक्य ती मदत करावी ही कल्पना कांहींना न झेपण्याइतकी नवीन होती. पण अशा तऱ्हेच्या किरकोळ पण अटळ गोष्टी बाद केल्यास, सर्वसंग्राहक समितीच्या कामाचा हा पहिलाच प्रयत्न यशस्वी झाला असें म्हणावयास कांहींच हरकत नाहीं.

दुष्काळनिवारणाच्या बिनसरकारी प्रयत्नाबाबत सर्वसाधारण जनतेंत उत्साह दिसून आला. महाराष्ट्र मध्यवर्ती सर्वपक्षीय समितीच्या शैक्षणिक स्वरूपाच्या प्रचाराचा तो परिणाम होता असें म्हटल्यास तें वावगें होणार नाहीं. पीडितांबद्दलचें आपलें कर्तव्य पार पाडण्यासाठीं गरीब, मजूर व मध्यमवर्गीय लोकांनीं दुष्काळनिधीस शक्य ती मदत केल्याचें आढळून आलें. महाराष्ट्रांतील व्यापारी, कारखानदार वगैरे धनिक लोकांत दुष्काळनिधीला मदत करण्याची आतुरता दिसून आली नाहीं, असें मोठ्या खेदानें म्हणावें लागतें. प्रत्यक्ष दुष्काळनिवारणाच्या कार्याबाबतही कांहीं जिल्ह्यांत बरीच अनास्था आढळून आली. त्यास कारणें कांहींहि असलीं तरी ती वस्तुस्थिति कोणालाहि समाधानकारक वाटणार नाहीं.

### दीर्घकालीन उपाय योजना : मोठ्या धरणांची आवश्यकता

दर तीन-चार वर्षांनीं महाराष्ट्रांत कोठें ना कोठें तरी दुर्भिक्ष्य अगर दुष्काळ हा पडतोच असा गेल्या १००–१५० वर्षांचा अनुभव आहे. दुष्काळनिवारणासाठी सरकारला प्रत्येक वेळीं लक्षावधि रुपयांचा खर्च करावा लागतो. पण त्याहीपेक्षां महत्त्वाची गोष्ट म्हणजे वारंवार पडणाऱ्या दुष्काळामुळें असंख्य शेतकऱ्यांचीं कुटुंबें, कोट्यवधि रुपयांचें नुकसान होऊन, दारिद्र्यांत व कर्जबाजारींत कायम खिचपत पडतात ही होय. महाराष्ट्रांतील शेतकऱ्यांना दुष्काळमुक्त केल्याशिवाय त्यांना तरणोपाय नाहीं, असें म्हटल्यास तें बिलकूल अतिशयोक्तीचें होणार नाहीं.

दुष्काळाची तीव्रता कमी करण्याचे किंवा त्यास आळा घालण्याचे दृष्टीनें सरकारचे धोरणांत इष्ट असा फरक होत आहे, ही आनंदाची गोष्ट आहे. लहान व मध्यम स्वरूपाच्या पाणी–पुरवठ्याच्या योजनांना प्राधान्य देऊन, त्या दुष्काळ पडला नसतांनाही हातीं घेऊन पार पाडण्याचें धोरण सरकारकडून जाहीर झालें आहे. हें धोरण योग्य असलें तरी अपुरें आहे. पाऊसमान कमी झाल्यास, लहान व मध्यम स्वरूपाच्या पाणी–पुरवठ्याच्या योजनांचा कितपत उपयोग होईल याबद्दल जाणत्या लोकांकडून तीव्र शंका व्यक्त करण्यांत येते. दुष्काळी भागांतील तलावांची दुष्काळाच्या दिवसांत काय अवस्था होते, हें नगर जिल्ह्यांतील विसापूरच्या तलावावरून स्पष्ट झालें आहे. पाऊस चांगला झाल्यास दुष्काळी भागांतील तलाव भरतात, पण त्या वेळीं शेतकऱ्यांकडून पाण्याची मागणी येत नाहीं. पाऊस न झाला तर तलावांत पाणी सांठत नाहीं; अशा वेळीं पाण्याची गरज व मागणी मात्र साहजिकपणें वाढते असा याबाबतचा अनुभव दिसतो. तेव्हां शेतकऱ्यांना लागेल त्या वेळीं पाणी देतां येईल अशा बारमाही पाणी-

पुरवठ्याच्या योजना व्हावयास पाहिजेत. घाटांत धरणें बांधूनच त्या पुऱ्या करावयास हव्यात. अशा मोठ्या योजनांची जागा लहान व मध्यम स्वरूपाच्या पाणी-पुरवठ्याच्या योजना कदापिही घेऊं शकणार नाहींत, असें तज्ज्ञ मंडळींचें मत आहे. पण दुर्दैवानें मुंबई सरकार आज मोठ्या धोरणापेक्षां लहान व मध्यम स्वरूपाच्या योजनेवरच मुख्य भर देत असल्याचें दिसतें. या बाबतींत सरकारी धोरणांत महाराष्ट्रांतील गतसालच्या दुष्काळानें इष्ट तो फरक होईल, अशी अनेकांना वाटणारी आशा फोल ठरू पहात आहे. तेव्हां, दुष्काळनिवारणाचे बाबतींत ज्याप्रमाणें निरनिराळ्या पक्षांच्या व मतांच्या लोकांनीं एकत्र येण्याचें ठरविलें, त्याप्रमाणें या मोठ्या धरणांच्या योजनेंबाबतहि एकमुखी मागणी करण्यासाठीं एकत्र जमून विचारविनिमय करणें जरूर आहे. कारण, दुष्काळनिवारणाइतकाच दुष्काळप्रतिबंध हाहि अविवाद्य व सर्वांना समान महत्त्वाचा असा महाराष्ट्रापुढील तांतडीचा प्रश्न आहे.

---

### भारतामधील सिगारेटचे कारखाने

भारतीय सरकारच्या मजूर-खात्यानें देशांतील सिगारेटच्या कारखान्यांसंबंधीं आंकडेवार माहिती गोळा केली आहे. सध्यां भारतांत सिगारेट तयार करणारे ११ मोठे कारखाने असून त्या सर्वांत मिळून १२,२७३ कामगार काम करतात. ह्या कामगारांपैकीं ९८ टक्के कामगार कायमच्या यादीवर आहेत. सर्वांत मोठा कारखाना बिहारमध्यें मोंघीर ह्या ठिकाणीं आहे. ह्या कारखान्यांत २,७३९ मजूर कामावर आहेत. बिहारखेरीज म्हैसूर, हैद्राबाद, उत्तर प्रदेश, प. बंगाल व मुंबई ह्या राज्यांतूनहि सिगारेटचे कारखाने आहेत. सिगारेटच्या कारखान्यांतून मुलांना काम करण्याची परवानगी दिसत नाहीं. पण कामगारवर्गांत १५ टक्के स्त्री-कामगार मात्र आढळून येतात. वेतन बहुधा वेळावर ठरविण्यांत आलेलें आहे. कामगारांच्या प्राप्तीची मासिक सरासरी ८० रुपयांपेक्षा थोडी अधिक आहे. दररोज मिळूं शकणाऱ्या किमान व कमाल वेतनाचीं दोन टोकें १५ आणे व ४ रु. ७ आणे अशीं आहेत. ही मर्यादा उत्पादनाच्या खात्यांतील आहे. एंजिनिअरिंग खात्याकडील वेतनाची किमान व कमाल दैनिक मर्यादा १ रु. आणि ६ रु. १ आणा अशी आहे. महागाई भत्त्याचें प्रमाण २६ रुपयांपासून ६० रुपयांपर्यंत आढळलें. त्याशिवाय मोफत सिगारेटस्, गणवेष, स्वस्त अन्नधान्य, इत्यादि कांहीं सवलतीहि कामगारांना दिल्या जातात. प्रत्येक कामगाराच्या मूळ कमाईच्या १/१२ इतक्या प्रमाणांत वार्षिक बोनस देण्याची बहुतेक कारखान्यांची प्रथा आहे. त्याशिवाय मूळ कमाईच्या १/१२ रकमेइतका बोनस देणगी म्हणून देण्यांत येतो. कामगारांना प्रॉव्हिडंट फंडाचाहि फायदा मिळतो. १९५२ च्या एतद्विषयक कायद्याप्रमाणें त्यासंबंधी तरतूद करण्यांत आली आहे.

---

### प्रकाशमय वनस्पति

वनस्पतीपासून क्षेपित होणाऱ्या प्रकाशकिरणांचा अभ्यास सोव्हिएट रशिआंतील वनस्पतिशास्त्रज्ञांनीं चालविला आहे. अशा कांहीं प्रकाशमय वनस्पति पामीर पर्वतावर आहेत. त्यांच्यापासून निघणारे किरण कॉकेशसच्या पायथ्याशीं सांपडणाऱ्या अशा वनस्पतींच्या किरणांहून अधिक प्रभावी असतात. गुरु ह्या ग्रहावरील वनस्पतींचा अभ्यास करण्याच्या कामीं ह्या प्रयोगांचा फार उपयोग होईल.


यंदाची दिवाळी सर्वांस सुखाची जावो!

# दि कोल्हापूर मराठा को-ऑप. बँक लि.

**कोल्हापूर.**

(स्थापना १९३३)

| | | |
|---|---|---|
| शेअर भांडवल उभारलेली | रु. | २,००,००० |
| शेअर भांडवल वसूल | रु. | १,०२,६०० |
| रिझर्व्ह व इतर फंडस् | रु. | ८३,५०० |
| खेळतें भांडवल | रु. | ६,१०,००० |

बँकिंगचे सर्व प्रकारचे व्यवहार केले जातात.

सूचना:--डिव्हिडंड वाटणी सुरू आहे.

भा. सा. पाटील,
प्रेसिडेंट.

व्ही. एन. यादव, मॅनेजर.
जे. डी. भोसले, ऑ. सेक्रेटरी

# दि बँक ऑफ कराड लि., कराड.

स्थापना-१२-३-१९४६

हेड ऑफिस, कराड. शाखा-भवानी पेठ, सातारा.

| | | |
|---|---|---|
| शेअर वसूल भांडवल | रु. | २,१८,०८० |
| खेळतें भांडवल | रु. | २१ लाख |

— बोर्ड ऑफ डायरेक्टर्स —

श्री. लक्ष्मण महादेव देशपांडे, चेअरमन.

श्री. वि. रा. वेलणकर, श्री. शं. म. ओगले, मेजर सरदार बी. एन्. पाटणकर, श्री. वि. ह. शिराळकर, डॉ. व्ही. जी. देशपांडे, श्री. रा. अ. अराणके, श्री. म. रा. देशपांडे, श्री. ना. बा. बुधकर.

**मुदत-ठेवी खालील दरानें स्वीकारल्या जातात.**

| | | |
|---|---|---|
| मुदत महिने ६ | ... | १½% |
| मुदत वर्षे एक | ... | २½% |
| मुदत वर्षें दोन | ... | ३½% |
| मुदत वर्षें तीन | ... | ३¾% |
| मुदत वर्षें चार | ... | ४% |

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

विशेष माहितीसाठीं भेटा अगर लिहा.

कराड, ता. २०-१०-५३

म. वि. खंडकर,
मॅनेजर.

# प्रो. र. धों. कर्वे

## लोकसंख्येच्या प्रश्नाचा द्रष्टा, प्रभावी लेखक व लोकशिक्षक

(डॉ. र. पु. परांजपे)

गेल्या महिन्याच्या १४ व्या तारखेस रक्तदाबाच्या विकारानें संततिनियमन व बुद्धिप्रामाण्यवादाचे कट्टे पुरस्कर्ते रघुनाथ धोंडो कर्वे हे मुंबई येथें निधन पावले, हें नमूद करण्यास आम्हांस अत्यंत दुःख होत आहे.

### बाणेदार, निश्चयी व स्वार्थत्यागी

कै. रघुनाथराव हे महर्षि धोंडो केशव कर्वे यांचे ज्येष्ठ पुत्र. मरणसमयीं त्यांचें वय ७२ वर्षांचें होतें. वडिलांकडून त्यांना लोकापवादास न जुमानतां सार्वजनिक कार्य करण्याची दीक्षा मिळाली, व ती शेवटपर्यंत मोठ्या धडाडीनें त्यांनीं पाळली. त्यांची बुद्धि व विद्वत्ता उच्च दर्जाची होती. मॅट्रिक परीक्षेंत त्यांचा पहिला नंबर आलेला असून कॉलेजच्या परीक्षांतही त्यांना उत्तम यश मिळालें होतें व ते गणित विषय घेऊन एम्. ए. झाले होते. मग त्यांना शिक्षणखात्यांत नोकरी मिळाली व गुजराथ, एल्फिन्स्टन्, कर्नाटक या कालेजांत निरनिराळ्या वेळीं ते गणिताचे प्रोफेसर होते त्या वेळींच दोन वर्षांची रजा घेऊन पॅरिसमध्यें अभ्यासाकरितां गेले व तेथें गणितशास्त्राचा डिप्लोमा मिळविला. तेथेंच त्यांचें लक्ष संततिनियमन, लोकसंख्येचा प्रश्न, बुद्धिवाद या विषयांकडे विशेष ओढलें गेलें, व या विषयांची आमूलाग्र चर्चा करण्यांत व लोकमत बनविण्यांत त्यांनीं आपलें सर्व आयुष्य खर्च केलें. पॅरिसमध्यें असतांना शिक्षणखात्यानें त्यांच्या जागेवर दुसरा एक गृहस्थ नेमून बढती मिळण्याऐवजीं त्यांना खालच्या जागेवर घातलें, व हा अन्याय सहन न होऊन त्यांनीं आपल्या जागेचा राजीनामा दिला. त्यांना फ्रेंच भाषा उत्तम येत असून ती खासगी रीतीनें ते शिकवीत असत व कांहीं दिवस ते विल्सन कॉलेजांत प्रोफेसर होते. त्यांची संततिनियमनाची मोहीम चालूच होती, पण ती मिशनरी कॉलेजच्या चालकांना पसंत नसल्यामुळें त्यांना ती जागा सोडावी लागली. त्यापुढें ते कधीं गणित व फ्रेंचच्या शिकवण्या करून व मुख्यत्वेंकरून संततिनियमनाचीं साधनें व पुस्तकें विकून आपला चरितार्थ चालवीत असत. समाजस्वास्थ्य हें मासिक त्यांनीं पंचवीस वर्षांपेक्षा जास्त काळ चालविलें, परंतु तें जरी पुष्कळ लोक चोरून वाचीत तरी ग्राहकांच्या नियमित संख्येमुळें तें मासिक नेहमीं तोट्यांतच चालवावें लागे. तथापि तें आपलें जीवनकार्य आहे अशा ठाम समजुतीनें तें त्यांनीं सतत चालविलें. लहानपणीं त्यांची प्रकृति निकोप असून ते टेनिस उत्तम खेळत असत; परंतु पुढें त्यांनीं व्यायाम सोडून दिला. अन्न आणि आरोग्य यासंबंधीं स्वतःवर ते निरनिराळे प्रयोग करीत असत म्हणून कदाचित् ती ढांसळली असेल. त्यांना रक्तदाबाचा विकार झाला व त्यांतच त्यांचा अंत झाला. त्यांना अकालीं मृत्यु आला हें त्यांच्या वडिलांकडे पाहून सापेक्ष दृष्टीनेंच म्हटलें पाहिजे. गेल्या वर्षी त्यांच्या चहात्यांनीं त्यांच्या सत्तराव्या वाढदिवसानिमित्त एक सुमारें सहा हजारांचा फंड त्यांना अर्पण केला. त्यांनीं तो आपलें कार्य चालू ठेवण्याकरितां खर्चिला. त्यांच्या मागून त्यांचें मासिक चालणें कठीण दिसतें, कारण त्यांच्यासारखा निश्चयी व स्वार्थत्यागी चालक मिळणें फार दुरापास्त आहे.

### लोकसंख्येच्या प्रश्नाचा द्रष्टा

हिंदुस्थानांत लोकसंख्या फार वाढत चालली आहे व त्यामुळें देश अवनतीच्या मार्गावर असून तात्पुरते कितीहि उपाय योजिले तरी ते अपुरे पडतील हें सत्य त्यांनीं तीस वर्षांपूर्वीपासून ओळखलें, व म्हणून संततिनियमनाकरितां कृत्रिम उपाय योजिले पाहिजेत असें त्यांचें ठाम मत झालें. त्याकरितां महात्मा गांधी व इतर पुढारी नैतिक निर्बंधांची महति गातात, परंतु हे निर्बंध अनैसर्गिक असून मानव वासनांना अशा प्रकारें लगाम घालणें अशक्य आहे असें ते समजत. त्याचप्रमाणें मनुष्याच्या जीवनावर लैंगिक बाबींचा प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष असा फार मोठा परिणाम होतो या गोष्टी आतां बऱ्याच मान्य झाल्या आहेत, परंतु त्यांनीं त्या कित्येक वर्षांपूर्वी ओळखल्या व लोकापवाद सोसूनहि आपल्या विचारांचा ते जोरानें प्रचार करीत. हें करतांना प्रचलित धर्मकल्पनांशीं त्यांना तोंड द्यावें लागे, इतकेंच नव्हे तर असल्या विषयावर लिहिणें अश्लीलतेच्या सदरांत येतें असें समजून कित्येक लोकांनीं त्यांच्यावर फौजदारी खटलेहि भरले, व एकदोनदां त्यांस शिक्षाहि भोगाव्या लागल्या. तरीहि त्यांनीं आपलें कार्य शेवटपर्यंत बाणेदारपणें चालू ठेवलें. त्यांच्या कित्येक मतांबद्दल पुरोगामी विचारांच्या लोकांमध्येंहि दुमत होणें शक्य आहे. परंतु त्यांच्या ध्येयप्रीतीबद्दल सर्व लोकांत कौतुक वाटल्याशिवाय रहात नाहीं, व भविष्यकालांत त्यांच्या कार्याचें जास्तजास्त चीज होत जाईल यांत शंका नाहीं.

### बुद्धिवादावर विश्वास

संततिनियमनाप्रमाणेंच त्यांचा बुद्धिवादावर पूर्ण विश्वास होता. कोणतीहि गोष्ट बुद्धीस पटल्याशिवाय कबूल करावयाची नाहीं असा त्यांचा बाणा असे. ईश्वराचें अस्तित्व बुद्धीस पटणारें नाहीं हें आपलें मत ते निर्भीडपणें प्रतिपादीत असत. मुंबईच्या बुद्धिवादी संस्थेचे ते एक आधारस्तंभ होते व तिनें चालविलेल्या "रीझन्" या नियतकालिकाचे ते कित्येक वर्षे संपादक होते. सामाजिक व इतर प्रश्नांचा विचार करतांना धर्मसंस्थांची व धर्मगुरूंची त्यांत लुडबूड नको असा त्यांचा कटाक्ष असे. हिंदुधर्म, ख्रिस्तीधर्म व अलीकडील थिऑसफी वगैरे नवीन पंथांवर त्यांचें शस्त्र नेहमींच उगारलेलें असे.

त्यांची लेखनशैली अगदीं सडेतोड असून आपल्या विचारांस मुरड घालण्यास ते कदापीहि तयार नसत. परंतु त्यांचें लिखाण परिणामकारक होतें यांत शंका नाहीं. त्यांनीं आपल्या मतांचा एखादा संप्रदाय तयार केला नाहीं; किंबहुना असा संप्रदाय तयार करणें म्हणजे शुद्ध बुद्धिवादावर विर्जण घालणें, असें त्यांचें मत असावें असें वाटतें. निरीश्वरवादी गौतमबुद्धाच्या मतांचा त्याच्या मागून एक संप्रदायच झाला, व त्याची गतहि इतर धर्मांप्रमाणेंच झाली, ही घटना त्यांच्या डोळ्यांसमोर होती. तरीहि त्यांच्या मतांचा फैलाव जास्त जास्त होत जाणार यांत संदेह वाटत नाहीं. रघुनाथरावांसारखा एक प्रभावी लेखक व लोकशिक्षक आपणांमधून गेला याबद्दल सर्व सुज्ञ लोकांस हळहळ वाटणें सहाजिक आहे. त्यांच्या वृद्ध पित्यास तर हा मोठाच धक्का बसला आहे. गेल्या वर्षी मुंबईतील त्यांच्या सत्तरीच्या समारंभाचे वेळीं ती अण्णांनीं "पुत्रादिच्छेत् पराभवं" असें म्हटलें तें त्या दोघांच्या मोठेपणास साजेसें आहे.

आमच्या खातेदारांस, ठेवीदारांस व भागीदारांस
दिपवाळी व नवीन वर्ष भरभराटीचें जावो.

*************** ********************

# दि सुप्रीम बँक ऑफ इंडिया लि.

## गणपतगल्ली, बेळगांव

हेड ऑफिस : गणपतगल्ली बेळगांव.

शाखा : लक्ष्मीपुरी कोल्हापूर, अरोंद्रा (जि. रत्नागिरी)

अध्यक्ष
श्री. एस्. जी. पंतबाळेकुंद्री, बी. ए., एलएल् बी.

— भांडवल —

| | | |
|---|---|---|
| अधिकृत, काढलेलें व खपलेलें | रु. | २,५०,०७० |
| एकुण रिझर्व | रु. | ५८,१९० |
| ठेवी व इतर | रु. | १६,२०,००० |
| नफा | रु. | २८,७२५ |

आर. पी. जोशी
B. A., CERT. A. I. B.
मॅनेजर.

एस्. के. सामंत
मॅनेजिंग डायरेक्टर



# डेक्कन मर्चंट्स् को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

(स्थापना १९१७)

हेड ऑफिस : २१७, चर्नीरोड, गिरगांव, मुंबई.

सब ऑफिस : वेस्टर्न रेल्वे स्टेशनसमोर दादर, मुंबई.

## मुदतीच्या ठेवींचे आकर्षक दर

थोड्या अगर जास्त मुदतीच्या ठेवीवरील वाढते व सवलतीचे दर समजन घेणें आपल्या हिताचें आहे.

समक्ष भेटा.

व्यापारी वर्गाची यशस्वी बँक



महाराष्ट्रांतील सर्व सहकारी अर्बन बँकांत
अग्रस्थानीं असलेली

# दि नगर डिस्ट्रिक्ट अर्बन सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि.

अहमदनगर
स्थापना : सन १९१०
हेड ऑफिस–अहमदनगर शहर
शाखा:–१ संगमनेर (जि. नगर) २ बेलापूर रोड–श्रीरामपूर (जिल्हा नगर) ३ वांबोरी (जि. नगर.)

| | | |
|---|---|---|
| (१) अधिकृत व काढलेलें भांडवल | रु. | ५,००,००० |
| (२) वसूल भांडवल | रु. | ३,६८,२७० |
| (३) रिझर्व्ह फंड | रु. | २,६४,९७१ |
| (४) इतर फंड | रु. | ३,१५,३६८ |
| (५) चालू ठेवी | रु. | १०,७३,०८३ |
| (६) सेव्हिंग्ज ठेवी | रु. | ८,७९,३८६ |
| (७) मुदत ठेवी | रु. | १७,३४,४१० |
| (८) खेळतें भांडवल | रु. | ६७,०१,६११ |

या बँकेंत मुदतीच्या, सेव्हिंग्ज व चालू ठेवी स्वीकारल्या जात असून सर्व प्रकारचे तारणांवर कर्जें दिलीं जातात तसेंच चेक, हुंड्या, सरकारी रोख्यांची खरेदी-विक्री, वगैरे सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

दागदागिने, मौल्यवान् वस्तू व कागदपत्रें सुरक्षित ठेवणेसाठी सेफ डिपॉझिट व्हॉल्टची व्यवस्था या बँकेंत आहे. तरी गरजूंनीं फायदा घ्यावा.

जास्त माहितीकरितां हेड ऑफिस अगर शाखा-कचेऱ्यांकडे लिहा.

तारीख ५-१०-१९५३.

मो. कुं. फिरोदिया,
चेअरमन.



रजिस्टर नंबर ७२९८ स्थापना १९३५

# सातारा जिल्हा को-ऑपरेटिव्ह लँड मॉर्गेज बँक लि.

******** ********

## शेतकरी बांधवांच्या कर्जांची खास सोय !

शेतकरी लोकांना कर्जांतून मोकळे होणेची, जमीन सुधारणेची, विहीर दुरुस्त करणेची, अगर नवीन विहीर काढणेची, इंजिनादि यंत्रसामुग्री खरेदी करणेची अगर जमीन खरेदी करणेची आलेली अमूल्य संधि !

हेड ऑफिस, कराड ★ ★ ★ ब्रँच ऑफिस, सांगली

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | १,००,००० |
| खपलेलें भांडवल | रु. | ८०,५०० |
| खेळतें भांडवल | रु. | १०,७४,२०० |
| वांटलेलें कर्ज | रु. | १४,६५,००० |

म. सि. पुटाणी,
मॅनेजर.

नीलकंठ आणाप्पा कल्याणी,
चेअरमन.

# मध्यमवर्गाला आवाहन

## आजच्या अवस्थेंतूनहि उज्ज्वल भवितव्य शक्य आहे

( शंकर ज. जोशी, बी. कॉम्., अलवाये. )

मध्यंतरांत कांहीं इष्ट घटना घडतील अशा आशेवर मनुष्य कांहीं वेळा पत्राचें उत्तर लिहिण्याचें पुढें ढकलतो. या अनुत्तरित पत्राप्रमाणें मध्यमवर्गाचे प्रश्न अवघड आणि नाजूक आहेत.

### मध्यम वर्गीय कोण ?

काटेकोर व्याख्या करणें कठीण असलें तरी व्यवहारांत प्रसंगाप्रसंगानें मध्यम वर्गीयांचा उल्लेख व त्यांच्या प्रश्नांची चर्चा होत असतेच. कधीं कधीं वरचा आणि खालचा मध्यम वर्ग, असे दोन भाग उल्लेखिले जातात. आणखीहि कांहीं भाग पाडतां येतील. दोघेही वकील खरे; पण हायकोर्टांत काम करणारा बॅरिस्टर–वकील तालुका कोर्टातील वकीलाला आपली मुलगी देण्यास सहसा तयार नसतो. एकाच कचेरींत काम करणारा अधिकारी हाताखालच्या इतरांबरोबर हिंडताफिरतांना साधारणतः दिसणार नाहीं. कांच–कामगार आणि गिरणी–कामगार यांचे प्रश्न किती निराळे ! परंतु, कामगार म्हणून दोघे एकत्र येतात. तसेच, जमीनदार आणि कोट्याधीश उद्योगपति यांचीं क्षेत्रें किती वेगळी ! पण तेही एकाच दिशेनें विचार करतांना आढळतात. मध्यमवर्गांत पोट–भाग असले तरी त्यांच्या विचारांत, दृष्टिकोनांत एकतेचा सूर असतो. सूत्ररूपानें म्हणावयाचें झालें तर असें म्हणतां येईल कीं, जो स्वतःला मध्यमवर्गीय म्हणतो व ज्याला इतर मंडळी मध्यमवर्गीय म्हणून ओळखतात त्याला मध्यमवर्गीय समजावें.

मध्यमवर्गाला इतिहास आहे, संस्कार आहेत, परंपरा आहे, शिक्षण आहे, बोलण्याचालण्याच्या पद्धति आहेत, विशिष्ट आचारविचार आहेत, नैतिक मूल्यें आहेत. स्वराज्याच्या चळवळींत मध्यमवर्गीयांचा वांटा फार मोठा होता. बहुसंख्य राजकारणी, समाजसुधारक, कामगार पुढारी, साहित्यिक, पत्रकार, सरकारी व खाजगी नोकर, वकील, डॉक्टर, शिक्षक, शास्त्रज्ञ, यंत्रज्ञ, तंत्रज्ञ, व्यवस्थापक, व्यापारी आणि इतर व्यवसायी मंडळी, महाराष्ट्रीय कारखानदार, मध्यम वर्गांतच मोडतात.

साधी राहणी, उच्च विचारसरणी, जोडीला शिक्षण, स्वच्छता, टापटीप, सततोद्योग, काटकसर—या गुणांचा जणूं कांहीं आदर्शच मध्यम वर्ग समाजापुढें ठेवतो. समाजजीवन नदीसारखें आहे. नवीन प्रवाह येऊन मिळत असतात. खालचा वर येत असतो; वरचा खालीं जात असतो. लहान मोठ्या व्यवसायांतील किती तरी मंडळी वर येत असतात. त्यांचीं मुलें शिकतात, लग्नकार्य करतात, कालांतरानें नवीन समाजांत प्रतिष्ठा पावतात. उदा., दूध विकणाऱ्या, विक्रेत्याचा व्यवसाय करणाऱ्या, जाहिरातीं-करितां आपले फोटो देणाऱ्या, प्रवेशशुल्क घेऊन आपले जुने प्रसिद्ध प्रासाद दाखविणाऱ्या, राणीच्या राज्याभिषेकाचे वेळीं ठराविक उमरावी पोषाक करणें परवडत नाहीं म्हणून समारंभास गैरहजर राहणाऱ्या इंग्लिश उमरावांच्या कथा वाचावयास मिळतात. 'आपले ते वैभवाचे दिवस' आठवून सांगणारी मंडळी आपल्याकडेही वाढत्या प्रमाणावर भेटतात.

जमीनदारी गेली. जहागिऱ्या गेल्या. उत्पन्नावरील करभार वाढत आहे. जिंदगी कर आला आहे. त्याचबरोबर किमान वेतन, पगारी रजा, मोफत डॉक्टरी उपचार, प्राथमिक शिक्षण, या सारख्या सुधारणा येत आहेत. सारें राष्ट्रच मध्यमवर्गीय होण्याच्या मार्गावर आहे. एकपत्नीव्रताची कल्पना मध्यमवर्गीयच नाहीं का ? दारूबंदीची योजना मध्यमवर्गीय नाहीं तर काय ? आणि सध्याच्या कठीण दिवसांत तरी 'नको' असें म्हणणारे तरी दुसरे कोण आहेत ?

### मध्यमवर्गाचें कार्य

समाज जीवनांतील मध्यमवर्गाचें स्थान आणि कार्य वरील विरोधाभासांत सुस्पष्ट होतें. पैसा, बुद्धि, बहुजनहित, सहिष्णुता, यांचा समन्वय लावण्याचें कार्य मध्यम वर्ग सतत करीत असतो. बुद्धिजीवि खरा, पण त्याबरोबरच राष्ट्रीय जीवन टिकविण्याची सदैव खटपट करणारा तो समाजांतील प्रमुख घटक आहे. जीवन सात्विक व शुद्ध करण्याचा व तें टिकविण्याच्या प्रयत्न तो करीत असतो. मध्यमवर्गांत नोकर आहेत, तसेंच नोकरी देणारे आहेत. सरकारांत त्याचें वजन असलें तरी सरकारविरोधी आघाडीहि तो उघडतो. राज्यकर्त्या–सरकारी यंत्रणेला तो मानतो कारण समाजजीवनाला त्याची आवश्यकता आहे याची त्याला जाणीव असते. परंतु तो व्यक्तिस्वातंत्र्याचा पुरस्कर्ता आणि समाजहितैषी असल्यानें जरूर तर सरकारशीं लढा द्यावयासहि तयार असतो. सरकारी यंत्रणेकरितां लागणारा पैसा व मनुष्यबळ तो मोठ्या प्रमाणावर पुरवतो. बहुसंख्य मंडळी खाजगी व्यवसाय, नोकरी करतात त्याकरितां लागणारें भांडवल, बुद्धि आणि युक्ति मध्यमवर्गच आतांपर्यंत पुरवित आला आहे.

त्याबरोबरच, सांस्कृतिक जीवन समृद्ध करण्याचा प्रयत्न त्याचेकडून मोठ्या प्रमाणावर होत असतो. काव्य, शास्त्र, विनोद, कला, धर्म यांची जोपासना आणि वाढ तोच करीत असतो. तसेंच समाजोपयोगी दवाखाने, वाचनालयें, लोकशिक्षण, अपंग-असहाय्यांना मदत, नाट्य, सिनेमा यांसारख्या क्षेत्रांतहि त्याचें कार्य अविरत चालूं असतें. नवनवीन विचारप्रणालींचा अभ्यास आणि आचार प्रथम तोच करतांना नाहीं का आढळत ? आफ्रिका, सीलोन, मलाया, इराण यांसारख्या देशांत मध्यमवर्गीय मोठ्या प्रमाणावर गेले असून तिकडील संपत्ति स्वदेशीं आणीत आहेत.

### सरकारी नोकर

समाजांत सरकारी नोकरांना विशेष महत्त्व आहे. लग्नाच्या बाजारांत सरकारी नोकरींतील तरुणांना विशेष भाव असतो. कायम नोकरी, निश्चित बढती, त्याबरोबरच समाजांत प्रतिष्ठा अधिक. स्वराज्याच्या काळांत सरकारी नोकरीचें क्षेत्र वाढतच आहे. पूर्वीच्या गोऱ्या साहेबांच्या जागा आतां आपल्या मंडळींनीं भरल्या आहेत. लोककल्याणकारी राज्ययंत्रणेंत अधिक सरकारी नोकरांची भरती क्रमप्राप्तच आहे. शिवाय, सरकार नवीन उद्योगधंदे घेत असून, कांहीं नव्यानें सुरू करीत असल्यानें औद्योगिक व्यवस्थापक, तंत्रज्ञ, यंत्रज्ञ यांचा भरणा सरकारी नोकर म्हणून वाढत्या प्रमाणावर होत आहे.

बदलत्या काळानुसार सरकारी यंत्रणा कशी असावी याचें मार्मिक विवेचन श्री. गोरवाला यांनीं केलें आहे. "राज्यघटनेंत

उल्लेख केल्यानें कांहीं लोककल्याणकारी राज्य निर्माण होत नाहीं. लोकांचें कल्याण आर्थिक स्वास्थ्य लाभल्याखेरीज होणार कसें? देशसंरक्षणाला अग्रस्थान दिल्यानंतर मग त्याचें खालोखाल महत्त्वाची बाब म्हणजे लोकांचें आर्थिक स्वास्थ्य.

"पुष्कळ गोष्टी एकदम करावयास घेण्याऐवजीं प्रथम कोणत्या, मागाहून कोणत्या ह्यांचा क्रम लावून थोड्याच पण महत्त्वाच्या, निकडीच्या गोष्टी प्रथम हातीं घेणें बरें.

"राष्ट्रोन्नतीचें अधिष्ठान नैतिक मूल्यें, श्रद्धा आणि शिस्त. कार्यक्रम-योजना पद्धतीनें, शिस्तशीरपणें पार पाडावयाचा तर ध्येयवादाला आवाहन देऊन प्रत्येक व्यक्ति कार्यान्वित होईल असें वातावरण निर्माण केलें पाहिजे.

"लोकशाही यशस्वी व्हावयाची तर मंत्री, विधिमंडळांतील सभासद, सरकारी अधिकारी यांचा कारभार, वागणूक व व्यवहार तत्त्वनिष्ठ असले पाहिजेत व ते तसे असतात असें सर्वसामान्य जनतेला वाटलें पाहिजे. लोकापवादाची पर्वा स्वतःला न वाटली तरी सरकारबाबत बरें-वाईट लोकमत होण्यास ते कारणीभूत होऊं शकतात, हें विसरून चालणार नाहीं. क्षेत्र वेगळें असलें तरी प्रत्येकाचें कार्य एकमेकांच्या कार्याला पूरकच असल्यानें त्यांच्यांत परस्पर आदरभाव, दुसऱ्याच्या अडचणींची जाणीव व त्याच्या मताला योग्य मान देण्याची मनोरचना हवी.

"प्रत्यक्ष सरकारी काम करणारी मंडळी व अधिकारी यांच्या मतांचा मंत्र्यांनीं सहानुभूतीनें विचार करावा; तसेंच आपलें बुद्धिप्रदर्शन व वरिष्ठांबाबत आपलें मतप्रदर्शन समाजांत न करण्याचा संयम अधिकाऱ्यांनीं दाखवावा हें बरें."

लोकशाही ही सरकारी नोकरांनाहि नवीनच आहे. राज्यकर्ते नवीन, राज्यपद्धति नवीन, राजकीय हक्कांची नव्यानें जाणीव झालेली जनता. नवें वातावरण. नवे प्रश्न.

सरकारी काम वाढलें; सरकारी नोकऱ्या वाढल्या; पण पूर्वीचे आकर्षक पगार राहिले नाहींत. बहुतेक सरकारी अधिकाऱ्यांना मानानें राहणें कठीण जात आहे; इतर नोकरवर्गाला जमाखर्चाची दोन्ही तोंडें मिळतीं करणें अशक्यप्राय झालें आहे.

### उद्योगधंद्यांतील मंडळी

भारतांत उद्योगधंदे निघाले, वाढले स्वदेशीच्या मंत्रावर आणि पोसले युद्धकाळांत. भांडवल पुरवलें मुख्यतः मध्यमवर्गीयांनीं. ही स्थिति आतां पालटत आहे. केवळ स्वदेशी म्हणून कोडकौतुक होण्याचे दिवस संपले; उत्पादन-क्षमता, मालाची किंमत आणि गुण, नोकरांचा रोजगार, त्यांना देण्यांत येणारें वेतन व सुखसोयी या गोष्टींना आतां महत्त्व आलें आहे. भांडवल क्षेत्र सटोडियांनीं काबीज करीत आणलें आहे. महागाईच्या या काळांत मध्यमवर्गाच्या शिल्लक रकमा खलास होत आहेत; चालू उत्पन्नांतून कांहींहि शिल्लक ठेवणें शक्य होत नाहीं असें असल्यानें त्याचेकडून पूर्वीसारखा भांडवलपुरवठा होत नाहीं. अशा स्थितींत नवे उद्योग निघणार कसे? शिवाय, लहान प्रमाणावर कारखाना सुरू करणें आतां विलक्षण कठीण झालें आहे. सरकारी नियंत्रणेंहि आतां इतकीं आणि विविध झालीं आहेत कीं मुंबई-दिल्लीच्या वाऱ्या करण्यांत कितीतरी वेळ जातो आणि जीव थकून जातो. कांहीं कंपन्यांनीं त्या ठिकाणीं आपलें कायम प्रतिनिधिच नेमले आहेत! काम, वेतन, निष्ठा यावाबतच्या बदलत्या कल्पनांची


## विमा आणि व्यापार

(स्थापना १९४७)



विमाविषयक एकमेव मराठी मासिक.
वार्षिक वर्गणी रुपये पांच फक्त.
दरमहा १५ तारखेस प्रसिद्ध होतें.

**दीपावलि अंक १९५३**
प्रसिद्ध झाला.

★

१। आणे म. ऑ. नें पाठविणारास घरपोंच

विमा आणि व्यापार, लिमयेवाडी, पुणें २

ही दिवाळी व नवें वर्ष बँकेच्या सर्व खातेदारांस, भागीदारांस व इतर संबंधीयांस सुखाचें व भरभराटीचें जावो.

## दी बँक ऑफ औंध लि.

(स्थापना : १९३८)

हेड ऑफिसः—१११-११२, सदाशिव पेठ, सातारा.
शाखाः—औंध, भवानीनगर व ओगलेवाडी.

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... ... | रु. ५०,०,०० |
| खपलेलें भांडवल | ... ... | रु. ३,३७,०६० |
| वसूल भांडवल | ... ... | रु. १,६८,५३० |
| रिझर्व्हस् | ... ... | रु. ८७,००० चे वर |

—: संचालक मंडळ :—

श्री. नरहर गंगाधर जोशी, बी. ए., एलएल. बी., वकील, सातारा. (चेअरमन)
श्री. बाळकृष्ण गणेश चांदोरकर, बी. ए., एलएल. बी., वकील, सातारा.
डॉ. माधव दत्तात्रय बोकील, एल. सी. पी. अँड एस. डी. ओ. एम. एस. (बॉंबे), सातारा.
श्री. रघुनाथ दिनकर माजगांवकर-व्यापारी, सातारा.
श्री. बाळकृष्ण रामचंद्र वर्तक-व्यापारी व कमिशन एजंट, पुणें.

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.
बँकेच्या शेअर्सची विक्री सुरू आहे.
—मुदत ठेवी आकर्षक दरानें स्वीकारल्या जातात—
१ वर्ष-३ टक्के, ३ वर्षें-३॥ टक्के, ५ वर्षें-४ टक्के, व १० वर्षें-५ टक्के

मध्यमवर्गीयांकरितां बँकेनें अल्पसंचय योजना नवीन सुरू केली आहे व त्याकरितां संचय पेट्या दिल्या जातात.
विशेष माहितीसाठी लिहा अगर समक्ष भेटा.

बा. वा. घमंडे, C. A. I. I. B. मॅनेजर.
न. गं. जोशी, B. A., LL. B. चेअरमन.

जाणीव नव्या कारखान्याच्या चालकांना, जुन्या कारखानदारांच्या बरोबरीनें, किंबहुना अधिक असणें अत्यंत आवश्यक आहे.

नफ्यांतील कांहीं भाग परत धंद्यांत गुंतवून चालू धंद्याची वाढ करावयाची पद्धत सर्वमान्य आहे. पण वस्तुस्थिति अशी आहे कीं, टाटांसारख्यांनाहि कारखाना सुस्थित ठेवण्यासाठीं सरकार-कडून कर्ज घ्यावें लागत आहे.

एक गोष्ट खरी. कारखानदारी मान्यता पावत आहे. सरकारी नोकऱ्या ठराविक. त्या मानानें कारखान्यांतील नोकऱ्या वाढत्या प्रमाणावर म्हणून असेल; त्यांत सरकारी नोकरीपेक्षा कांहीं ठिकाणीं जास्त पगार आणि सवलती मिळत असतील; बढत्या लवकर होत असतील; पूर्वीच्या मानानें नोकरींत आतां शाश्वति अधिक वाटत असेल; देशाला उपयुक्त कार्य कारखाने करतात याची जाणीव होत असेल. या उत्पादन-व्यवसायांतील मंडळींना आतां समाजांत अधिक प्रतिष्ठा मिळूं लागली आहे हें निश्चित. देशीपेक्षा परदेशी कंपन्यांतील नोकरी अधिक स्वास्थ्याची, शाश्वतीची, पगाराची असें मात्र अजूनहि मानलें जातें.

कारखानदारी हें एकेकट्याचें कार्य नव्हे; अनेकांचें सहकार्य, सांघिक कार्य हा त्याचा गाभा आहे. कारखानदारींतील मंडळी आपल्या स्वतःबद्दल, स्वतःच्या कार्याबद्दल सहसा बोलत नाहींत. त्यांचें कार्य हाच त्यांचा गौरव अशी कांहींशीं त्यांची मनो-धारणा असते. कामाला सुरुवात करावी, पडतील तीं कामें करावीत, कारखान्याच्या यशाबरोबर मोठेपण येत असतें. पिढीजात कार-खानदार हा कारखानदारींतील एक विशेष आहे. वाढत्या व्यापारी चढाओढींत यंत्रज्ञ, तंत्रज्ञ, संघटक यांची गरज वाढत्या प्रमाणावर भासूं लागते आणि टाटासारखे प्रागतिक उद्योगपती इतर मंडळींनाही जवळ करतांना आढळतात.

आज कारखान्यांत कागदावरील लिखापढी विलक्षण वाढली आहे. कारखान्याचे व्यवहार जवळजवळ सरकारी पद्धतींनें चालवावे लागतात. प्रत्यक्ष उत्पादन आणि विक्री या दुय्यम बाबी झाल्या आहेत! सरकारकडे वेळोवेळ इतक्या प्रकारची माहिती पुरवावी लागत आहे; निवेदनें, स्मरणपत्रें, अहवाल, तारा, प्रत्यक्ष भेटी, प्रवास सत्र फार झालें आहे; दुसरीकडे, धंद्यांत लक्ष नसलेले सटोडिया किंवा दूर ठिकाणीं चैनींत राहणाऱ्या मालकांना कागदपत्र, व्यवहार समजावून सांगण्यांत, त्यांची मर्जी संभाळतांना; तिसरीकडून, स्वतःच्या हक्कांची जाणीव असलेल्या, पण कर्तव्याची—कामाची समज नसलेल्या कामगारांशीं आणि राजकीय आकांक्षा मनांत बाळगून कार्य करणाऱ्या त्यांच्या पुढाऱ्यांशीं वाटाघाटी करतां करतां आजचा व्यवस्थापक थकलेला, विटलेला, कंटाळलेला दिसतो. "कारखान्यांत नासाडी चाललेली मला दिसते, धंदा कसा वाढवावा याबद्दल माझ्या कांहीं योजना आहेत, पण कांहींही करता येत नाहीं. हातपाय बांधल्यासारखें झालें आहे. सरकारलाच ठरवूं दे कसें काय, केव्हां करावयाचें तें; सारी माहिती दिलेली आहे वेळोवेळी." "उद्यां मंदी आली म्हणजे मालक कारखान्यांत आणि कामगार कामांत लक्ष घालतील. तोंपर्यंत हें असेंच चालायचें. मी तरी कुठवर काळजी करूं?" चालकाच्या मनाची ही विफलावस्था भयावह आहे.

### व्यावसायिक मंडळी

वकील, डॉक्टर, शास्त्रज्ञ, शिक्षक, समाजसेवक, राजकीय कार्यकर्ते, दुकानदार, व्यापारी, पत्रकार, लेखक, नट, चित्रकार, शिल्पकार, इंजीनिअर, अकाउंटंट, बँकर, विमा एजंट, स्टॉक ब्रोकर, कामगार पुढारी व कार्यकर्ते अशी अनेक मंडळी आपापला व्यवसाय करण्यांत गुंतलेली आहेत.

समाजजीवनांत शिक्षणाला महत्त्वाचें स्थान आहे. पण आज शिक्षणक्षेत्रांत जेवढें अराजक माजलें आहे तेवढें इतरत्र क्वचित् असावें! वरपासून खालपर्यंत सारेजण सध्याच्या शिक्षणावर तोंडसुख घेत आहेत.

अशा वातावरणांत शिक्षकांनीं शिकवावयाचें कसें: अन् शिकणाऱ्यांनीं उमेद धरावयाची कशी? बरें, इतकें करून शिक्ष-काला मिळणारें वेतन अशिक्षित गिरणी कामगारापेक्षांहि कमी अशी स्थिति. समाजांत पूर्वीचा मानही नाहीं. विद्यार्थी आणि पालक यांना शिक्षण किती विलक्षण खर्चाचें झालें आहे? बरें, शिक्षण पुरें झाल्यावर पुढें काय? या अशा वातावरणांत वैचारिक वैफल्य निर्माण न झालें तरच नवल!

लोकशिक्षण व लोकरंजन हें वृत्तपत्रांचें मुख्य कार्य. त्या क्षेत्रांत आज मालकशाही, श्रमजीवि व्यवसायी मंडळी, कामाचा मोबदला, मतस्वातंत्र्य असे कितीतरी प्रश्न उपस्थित झाले आहेत. प्रेस कमिशन याबाबत उपयुक्त सूचना करील अशी आशा आहे.

बँकांमध्येंहि बुद्धिजीवि श्रमिकांचा प्रश्न असून त्यांनीं ट्रेड युनिअन पद्धतीनें तो सोडविण्यास घेतला आहे.

—वकिलीच्या धंद्यांत आतां पैसा नाहीं, मानहि नाहीं अशी स्थिति आली आहे. "२४ तासाला ४८ कायदे" या गतीनें नवीन कायदे होत आहेत! या साऱ्या कायद्यांचा सर्वसाधारण रोख 'दिलं घेतलं विसरून जा' असा असल्यानें कोर्टकचेऱ्या करून पक्षकारालाच जिथें कांहीं विशेष मिळण्यासारखें नसतें, तेथें वकिलांना काय मिळणार?

डॉक्टरी व्यवसाय तरी चलतीचा कोठें आहे? देशाची आरोग्य आघाडी झपाट्यानें ढांसळत आहे. रस्त्यावर उभे असतांना समोरच्या जनसमूहाकडे पाहिलें असतां आरोग्याची तोंडावर टवटवी, बांधेसूद शरीर असलेली किती मंडळी दिसतात? धक्का बसावा, डोकें सुन्न व्हावें अशी स्थिति आहे. ओढलेलीं, पाण्याचीं पिंपें असलेली, बेडौल, थकलेलीं माणसें पाहून देशाच्या भवितव्याबद्दल काळजी वाटूं लागते. वॅार क्वालिटी तरुण-पिढीची स्थिति तर अधिकच शोचनीय वाटते. त्यांचें वजन, त्यांची छाती, त्यांचा दम, चहा—सिगरेट—सिनेमा—चवीढवींचें खाणें, या साऱ्या सवयी अस्वस्थ करणाऱ्या आहेत. पालकांच्या बरोबरीनें डॉक्टरवर्गाची याबाबत जबाबदारी नाहीं का? कीं वाटल्या भरणें एवढेंच त्यांचें कार्य? बरें नसणें ही एक फॅशन होत आहे. वाढत्या महागाईंत डॉक्टरकडे नाइलाज झाल्याखेरीज न जाण्याचा संकल्प बऱ्याच जणांनीं केल्याचेंहि पाहण्यांत येतें.

श्रीमंत हौशी मंडळी यांचा आश्रय कमी होत असून बऱ्याच व्यवसायी व कलावन्त मंडळींना सरकारवर अधिकाधिक अव-लंबून रहावें लागत आहे. सिनेमा धंद्यांचें मानहि कमी येत आहे.

दुकानदारी—व्यापारी व्यवसायांत कितीतरी मंडळी गुंतलेली आहेत. युद्धकाळांत व नंतर वस्तूंचा पुरवठा अपुरा असल्या-कारणानें त्यांना दिवस फार छान गेले. युद्धकार्यांत गुंतलेली मंडळी, तशीच इतर व्यवसायांत नोकरी असलेली मंडळी परत येत आहेत. आतां उद्योग नाहीं म्हणून असले—नसलेले सारे पैसे उभे करून ही मंडळी दुकानदारींत येऊ राहणार. दिवसभर उद्योग व स्वतंत्र व्यवसाय म्हणून हें सर्व ठीक आहे. परंतु हल्लीं उधार—उसनवार

देत घेत, वाढत्या व्यापारी स्पर्धेत किती मंडळी टिकून राहतील हें पहावयाचें. पैशांचें पाठबळ असलेल्या मोठ्या पेढ्या थोडा नफा घेऊन धंदा करूं शकतील व बाजारांत स्थिर राहतील; पण लहान भांडवलावर धंदा करणाऱ्यांना अनेक कारणांनीं दिवस कठीण जातील असें दिसतें.

### शेतकरी

केवळ दूर खेड्यांत रहात असल्याकारणानें शहरी मध्यमवर्गीयांहून शेतकरी निराळा वाटतो. अन्नधान्याच्या विलक्षण तुटवड्यामुळें गेलीं कांहीं वर्षें शेतकी विषयाकडे सर्वांचें लक्ष केंद्रित झालें आहे. कसेल त्याची जमीन, अधिक धान्य पिकवा, कूळ कायदा, जमिनदारी नाहींशी करण्याचा कायदा, आधुनिक पद्धतीची शेती, पाटबंधारे, भूदान, अशा किती तरी सुधारणा तांतडीनें करण्यांत येत आहेत. नवभारताबद्दल बाळगलेल्या भव्य कल्पना साकार करण्याचा प्रयत्न सरकार करीत आहे. आज शेतकऱ्याचा उल्लेख आदरानें केला जातो. बहुसंख्य शेतकी व्यवसायी मतदारांच्या सक्रिय पाठिंब्याखेरीज राज्यशकट मोडून पडेल याची जाणीव राज्यकर्त्यांना आहे !

इतर देशी धंद्यांप्रमाणें शेतीलाही युद्धकाळांतच बरे दिवस दिसले. परंतु, म्हणून शहर सोडून कोणी खेड्यांत राहावयास गेलेले नाहीं. उलट, खेडीं ओस पडत असून शहरवस्ती विलक्षण वाढली आहे !

आणि शहरवासीयांचें शेतकऱ्यांबद्दल सर्वसाधारण मत काय असतें ? पुराणमतवादी, जुनाट, अशिक्षित, आपलें तेंच खरें असें धरून बसणारा, आळशी, नवीन गोष्टी न शिकणारा, वगैरे वगैरे. साऱ्यांचे प्रयत्न आतां त्याला आधुनिक, अद्यावत् करण्याचा, शिकवण्याचा आहे.

पण शेतकरी धूर्त असतो. पिढ्यान् पिढ्या तो हाच धंदा करीत आलेला आहे आणि त्याचे कांहीं आडाखेहि ठरलेले असतात. अनुभवांचें शहाणपण त्याचेजवळ पुष्कळ आहे.

परदेशांतील धान्य महाग म्हणून सरकार त्याची मोठ्या प्रमाणावर खरेदी करण्याचें नाकारीत आहे. जागतिक धान्य-किंमती आतां उतरूं लागल्या आहेत. त्या पुरेशा उतरल्या म्हणजे देशांतील शेतकऱ्याकडे कोण किती लक्ष देतो तें पाहावयाचें. कागदी योजना शेतकऱ्याला भुरळ पाडीत नाहींत. तज्ज्ञांचा सल्ला तो अव्हेरीत नाहीं. पण कोण कोण त्याच्याकरितां प्रत्यक्ष काय काय करतात याकडे त्याचें लक्ष असतें आणि त्यानुसारच तो आपला कार्यक्रम आंखतो.

### जमा-खर्च

युद्धकाळांत व नंतरच्या सहा वर्षांच्या काळांत कांहींनीं नवीन व्यवसाय सुरू केले, कांहींनीं मोठमोठ्या नोकऱ्या मिळविल्या, कांहींची बढती झाली आणि त्यांना आपल्या मनाप्रमाणें राहतां आलें, खर्च करतां आला. पण, ठराविक रक्कम मिळणारे पेन्शनर्स व मर्यादित पगार मिळवणारे बहुसंख्य मध्यमवर्गीय यांची आर्थिक स्थिति वाढत्या महागाईंत विलक्षण कठीण झाली आहे. त्यांतच आतां बेकारीची भर पडत आहे. परिस्थिति गंभीर आहे.

· शब्द कोड्यांतील बौद्धिक कौशल्य केव्हांच संपल्याचें सर्वांना समजत आहे; पण वाढत्या दारिद्र्यांतून सुटण्याचा एक मार्ग या दृष्टीनें त्याकडे पाहण्याची मनाची धारणा असल्यामुळें त्यांचा प्रचार समाजाच्या प्रत्येक थरांत झाला आहे. वाढत्या मानसिक दौर्बल्याचा, विफलतेचा, असहाय्यतेचा दुसरा पुरावा हवा कां ?"



धूतपापेश्वर
मलेरिया मिक्श्चर
सर्व प्रकारच्या हिंवतापावर गुणकारी
धूतपापेश्वर इंडस्ट्रीज् लि.
★
पनवेल—मुंबई.

डोकेदुखी व मेंदूच्या सर्व विकारांवर खात्रीचा इलाज



रामतीर्थ
ब्राम्ही तेल
[ स्पेशल नं. १ ]
( मेडिकेटेड )
पांढरे केस काळे होतात, स्मरणशक्ति वाढते, टक्कलावर केस उगवतात, शांत झोंप येते, केस वाढतात, दृष्टीही सुधारते.
मोठी बाटली रु. ३-८-०
लहान बाटली रु. १-८-०
टपालानें मागविणारांनीं अनुक्रमें ५ रु. ५ आ. व ३ रु. ७ आ. ची मनिऑर्डर करावी. व्ही. पी. केली जाणार नाहीं.
श्री रामतीर्थ योगाश्रम
"उमेशधाम," १७, विन्सेंट स्क्वेअर स्ट्रीट, नं. १ दादर ( जी. आय. पी. ) रेल्वे स्टेशनजवळ, मुंबई १४.

किंमती चढतात आणि उतरतात. ह्या दोन्हीही काळांत मध्यमवर्ग भरडला जातो. उत्पादनकार्यांत त्याचें कार्य महत्त्वाचें असलें तरी तो प्रत्यक्ष उत्पादन कार्यात गुंतलेला असतोच असें नाहीं. शिवाय तो कांहींसा विस्कळित असतो. संघटना हा आजचा युगधर्म आहे.

डॉ. बी. नटराजन् यांनीं मद्रासमधील रु. १०० ते रु. ६०० पर्यंत पगार मिळवणाऱ्या मध्यमवर्गीय कुटुंबांच्या आर्थिक स्थितीचा अभ्यास केला. त्यांत त्यांना असें दिसून आलें कीं ६१ टक्के कुटुंबांचा खर्च जमेपेक्षा अधिक आहे !

कुटुंबांत एकानें मिळवायचें, इतरांनीं बसून खायचे दिवस संपले मुलांबरोबर मुलीहि अर्थार्जन करीत असून तो आतां कौतुकाचा विशेष राहिलेला नाहीं. शें-सव्वाशें रुपये मिळवणाऱ्या पदवीधर तरुणालाहि मिळवत्या पत्नीशिवाय संसार थाटणें कठीण वाटतें.

"मुलीला शिकवायची कां ? तर तिनें पायावर उभें रहावें म्हणून. पण तशी ती स्वतःच्या पायावर उभी राहण्याची खात्री आहे काय ? मग मुलीला ना धड नोकरी ना धड तिचें लग्न. म्हणजे आईबापांनीं काय करावयाचें ? मग तिला किती शिकवायचें ? ती केव्हांहि विसरून जाऊं शकेल, इतकेंच ? नाहीं तर मग तिच्या शिक्षणासाठीं करावा लागलेला खर्च आणि शिवाय हुंडा कुठून आणायचा ? कमी शिकवावी तर लग्न होत नाहीं, जास्त शिकवावी तरी लग्न होत नाहीं. शिकून मुलीला नोकरी लागली तर तिला आवडीनिवडी उत्पन्न होऊन मनासारखें स्थळ मिळत नाहीं. मुलगी रूपानें बेताची असली तर लग्न कसें व्हायचें ? सामान्य रूप म्हणून सामान्य स्थळ मिळालें तर दोघेहि गरिबीमुळें संसारांतून उखडायची पाळी केव्हां येईल याचा नियम नाहीं. विवाहाच्या बाजारांत हिंडणाऱ्या बहुतेक आईबापांचीं नि मुलांचीं मनें हबकून गेलेलीं असतात." विवाहप्रश्नाचें सौ. मालतीबाई बेडेकर यांनीं केलेलें हें विश्लेषण जितकें वस्तुस्थितिनिष्ठ तितकेंच विदारक आहे. लग्नाचें वय झालें असूनहि लग्न न झालेली स्त्री-पुरुष मंडळींची संख्या वाढत आहे. अशा गंभीर स्थितींत आर्थिक सुरक्षिततेच्या काळांतील नीतिनियमाचें निकष जुनेपुराणे होत चालले आहेत. आर्थिक स्वास्थ्याचा मंत्र सर्वत्र सतत उच्चारला जात असतांना वाढत्या असुरक्षिततेची भावना किती दाहक आहे !

इतरांच्या कामाचे तास कमी होत आहेत तर मध्यमवर्गीयांना दिवस पुरेनासा झाला आहे. रेशनिंग, प्रत्येक ठिकाणीं ओळींत उभे राहणें, रेशन-दूध आणणें, बस-गाड्या यांची वाट पाहण्यांत कितीतरी वेळ जातो. त्यांतच गडीमाणूस टिकत नाहीं, ठेवणें परवडत नाहीं म्हणून कामाचा वाढता रगाडा. दुय्यम व्यवसाय, शिकवण्या, हिशेब लिहिणें, दूध घालणें, शिवण टिपण करणें, कसें तरी करून जमाखर्चाची तोंडमिळवणी करण्याची धडपड सतत चालूं असते.

बदलती परिस्थिति आणि मुलांना वाढवण्याबाबतच्या जबाबदाऱ्या नि कल्पना यामुळें मुलांची संख्या मर्यादित ठेवण्याचे प्रयत्न वाढत्या प्रमाणावर होत आहेत; डझन, अर्धा डझन ऐवजीं एक, दोन, तीन म्हणजे फार झालीं. कुटुंब मर्यादित ठेवणें संततीनियमनामुळें शक्य होत आहे.

पूर्वींची विचारसरणी अशी कीं आज थोडी बचत करून उद्यां त्यांतून कांहीं नवीन आवडीची वस्तु घ्यावी; किंवा विशेष प्रसंगाकरितां थोडं थोडं करून रक्कम राखून ठेवावी. हल्लीं विवंचना असते आजचा खर्च भागवायचा कसा याची. भागवायचें म्हणजे कायकाय नसलें तरी चालेल हेंच ठरवायचें ! आज जी कांहीं बचत होते ती विम्याच्या निमित्तानें. गेल्या चार-दोन वर्षांत विमाहप्ताहि भरणें शक्य होत नाहीं, म्हणून विमापत्रकें रद्द करण्याचे प्रसंग वाढत आहेत; विमापत्रकांवर कर्ज घेणाऱ्यांचें प्रमाण पुष्कळच वाढलें आहे.

उतार वयांतील मंडळींजवळील शिल्लक रक्कम अपेक्षेपेक्षा खूपच लवकर संपत आहे; उतारवयाकडे जाणाऱ्या वयस्कर मंडळींजवळ शिल्लकच नाहीं अशी कांहींची स्थिति आहे. वाढती बेकारी आणि आटलेली शिल्लक या कात्रींत उतारवयाच्या मंडळींचा प्रश्न बिकट होत आहे. "वय झालेल्यांना कामावरून दूर करा," "म्हातारा नि खायला काळ" स्वरूपाची विचारसरणी परिस्थितीपोटीं चेतावली तर नवल नाहीं.

### भवितव्य

समाजपुरुषाचा मेंदू आणि पाठीचा कणा, असें मध्यम वर्गाचें वर्णन करण्यांत येतें. मेंदू बुद्धीचें उगमस्थान; त्याबरोबरच शरीराचा आणि त्याच्या व्यवहाराचा नियंत्रक. शरीराची सारी उभारणी कण्यावर. मध्यम वर्गाचें कार्य मौलिक आहे. समाजधारणा, समाजस्वास्थ्य, समाजकल्याण, समाजसुधारणा हें त्याचें कार्य. समाजाकरितां आपण जेवढे करतो त्या प्रमाणांतच त्याचेकडून घेण्याचा संयम—आदर्श मध्यमवर्गानें इतरांपुढें ठेवावयाचा आहे. एकूण उत्पादनशीलता आणि उत्पन्न यांतूनच प्रत्येकाचा वांटा त्याला मिळत असतो. एकूण उत्पन्न वाढलें तरच घटकांचा वांटा वाढणार हें उघड आहे. निरनिराळ्या वर्गांच्या—गटांच्या झगड्यानें एवढेंच होतें कीं ह्याचा कांहीं भाग त्याला मिळतो. असें असल्यानें एकूण उत्पन्न वाढावयाचें तर झगडे कमी, प्रयत्न जास्ती, असें ओघानेंच येतें. मध्यमवर्गाच्या कार्याची दिशा यावरून सुस्पष्ट होण्यासारखी आहे. अर्थात् त्याला जरूर तें स्वास्थ्य व उत्तेजन मिळालें पाहिजे हें क्रमप्राप्तच आहे. समता, संघटना साऱ्यांना वरच्या वरच्या पातळीवर नेण्याच्या प्रयत्नांत गुणी, कष्टाळू, अनुभवी, कामाबद्दल आपुलकी बाळगणाऱ्या मंडळींच्या गुणाचें चीज अपेक्षेप्रमाणें होत नाहीं आणि मग ती खट्टू होतात. कसबी कामगार आणि सामान्य कामगार यांच्या वेतनांतील तफावत इतकी कमी होत आहे की कसबी कामगार होऊन वाढती जबाबदारी कशाला घ्या ? अशा तऱ्हेची विचारसरणी वाढीला लागली तर आश्चर्य नाहीं. असे अनुभव इतर देशांतहि येत आहेत.

असें असलें तरी मध्यमवर्गाच्या चांगल्या प्रवृत्ती, विचार, गुण कायम टिकवित असाच आग्रह राहील. तथापि, मध्यमवर्गीयांच्या स्वतःच्या मोठेपणाबद्दलच्या विशिष्ट कल्पनांमुळें आणि संकुचित मनोवृत्तीमुळें त्यांच्या गुणांचें चीज व्हावें तसें होत नाहीं. समाजांत इतक्या प्रकारचें दारिद्र्य आहे, बेकारी आहे, निरनिराळ्या समस्या आहेत कीं त्यांचा विचार सहानुभूतीनें आणि तोंतडीनें करावयास हवा. आपल्याप्रमाणेंच, किंबहुना आपल्यापेक्षांहि अधिक अडचणी इतरांना आहेत, गरजा आहेत, अपेक्षा आहेत याची जाणीव त्यांनीं सतत बाळगली पाहिजे. मनुष्यस्वभावाची मोठी गंमत आहे. मला काय मिळतें ह्यापेक्षा मला इतरांपेक्षा अधिक किती मिळतें ह्यांत तो सुख मानीत असतो. तसेंच, दुसऱ्यांपेक्षा मला किती कमी मिळतें या जाणिवेनें तो असुखी होत असतो.

सुख सापेक्ष आहे. असुखाच्या पोटीं असंतोष निर्माण होतो. त्यांत वाढत्या विषमतेची भर पडली, परिस्थितीचा काच वाढला, संघटकांची जोड मिळाली कीं असंतोषाचा वणवा पेटायला किती वेळ ? आज देशांत असंतोष कांहीं कमी नाहीं. तो वाढविण्याचे दिवस संपले आहेत.

"कठोर किंमत दिल्याखेरीज आर्थिक प्रगति जलदीनें होणें अशक्य आहे. जुनाट कल्पनांना मूठमाती थायला पाहिजे; जुनें सामाजिक संकेत विसरले पाहिजेत; वंश, जाति आणि बंधनें तोडून–मोडून टाकलीं पाहिजेत; नव्या घडींत न बसणाऱ्यांची सुखाचीं स्वप्नें विरतील. जलद आर्थिक प्रगतीची ही पुरी किंमत देण्यास फार थोडी मंडळी तयार असतात.

"आर्थिक अभिवृद्धि दोन गोष्टींवर अवलंबून असते. लायक लोकनेते आणि जनतेची प्रगति व्हावी अशी इच्छा, हीं दोन असल्यावर आर्थिक अभिवृद्धीचे सारे प्रश्न सोपे आहेत. जनता राज्यकर्त्यांकडे, पुढाऱ्यांकडे पहात असते. पुढारी बुरसटलेले, स्वार्थी, लांचखाऊ असले तर जनता नाउमेद होते; धडाडी, उत्साह नसल्यासारखी दिसते. पण पुढाऱ्यांनीं जनतेचा विश्वास संपादन केला आणि देशांतील विषमता, मक्तेदारी नाहींशी करण्याचा त्यांचा निर्धार दिसला कीं, साऱ्या हालअपेष्टा, हेवेदावे विसरून जाऊन प्रचंड उत्साहानें जनता कार्याला लागलेली आढळेल आणि त्या उत्साहापुढें साऱ्या अडचणी वितळून जातील." आर्थिक अभिवृद्धीकरितां अप्रगत राष्ट्रांनीं करावयाच्या त्यागाचें, कष्टाचें, व्रताचें, दिग्दर्शन "यूनो"च्या तज्ज्ञांनीं वरील अर्थाच्या शब्दांत केलें आहे.

राजकारणांत मध्यमवर्गाला स्वतंत्र असें स्थान नाहीं. तथापि निरनिराळ्या पक्षांत त्यांतील मंडळी प्रामुख्यानें आढळतात. राजकीय स्वातंत्र्यानंतर आतां आर्थिक स्वातंत्र्य मिळवायचें आहे. मध्यमवर्गीयांनीं सामान्य जनतेंत मिळूनमिसळून कार्य करण्याची वेळ आलेली आहे. कार्य जनताभिमुख पाहिजे. व्यक्तीच्या स्वार्थापेक्षां राष्ट्राचा स्वार्थ मोठा आहे याची जाणीव सतत ठेवली पाहिजे. व्यक्तिस्वातंत्र्याबरोबरच देशांत शांतता व शिस्त असणें आवश्यक आहे. अनेक कार्यक्रमांकरितां भांडवल पाहिजे आहे. त्याबरोबरच कार्याबद्दल कळकळ, आत्मीयता, तत्परता, कार्यक्षमता हवी आहे. विफलतेंतून मार्ग काढावयाचा आहे. आपला इतिहास स्फूर्तिदायक आहे. आपला आध्यात्मिक ठेवा अपरंपार आहे. मनुष्यबळ अफाट आहे. त्यांच्या बळावर संघटनाचातुर्याची शिकस्त करून, भारताला बलशाली आणि वैभवशाली बनविण्याचें कठीण पण महत्त्वाचें कार्य मध्यमवर्गापुढें असून तें राजकर्त्यांकडून त्यानें करून घ्यावयाचें आहे. त्याच्या बुद्धीला, प्रज्ञेला, त्यागाला, काळाचें आवाहनच आहे.

### चंबळा धरण–योजनेची प्रगति

भारतीय सरकारच्या माहिती खात्याचे मंत्री श्री. केसकर ह्यांनीं चंबळा धरण योजनेचें कामकाज पाहून समाधान व्यक्त केलें. धरणाच्या पहिल्या अवस्थेंत गांधी–धरण, राणा–प्रताप सागर, कोटा धरण व कालवा हीं कामें पुरीं करण्यांत येतील व त्यासाठीं ३५,७५,००,००० रुपये खर्च येईल. ही अवस्था १९५७ अखेर पुरी होईल.


दी डेक्कन इण्डस्ट्रिअल बँक लि.
डेक्कन इण्डस्ट्रिअल बँक बिल्डिंग,
९७४ ब, लक्ष्मी रोड, पुणें २
अल्प मुदतीच्याहि ठेवी स्वीकारल्या जातात. बँकिंगचे सर्व तऱ्हेचे व्यवहार केले जातात. रिकरिंग डिपॉझिट, स्पेशल सेव्हिंग्ज आदि खास योजनांसाठी समक्ष चौकशी करा. स्त्री–खातेदारांस सेव्हिंग्जवर व्याजाचा दर २ टक्के. कायम ठेवींवरील व्याजाचे दरः—मुदत वर्ष १, २ टक्के; वर्षें २, २॥ टक्के; वर्षें ३, ३॥ टक्के; वर्षें ४, ४॥ टक्के; वर्षें ५ व पुढें ५ टक्के.
डी. डी. देशपांडे, मॅनेजिंग डायरेक्टर.

जनता सहकारी बँक, लिमिटेड.
८६६ सदाशिव पेठ, फुले मार्केट रस्ता, पुणें २
अल्पावधींत जनतेच्या विश्वासाचें ठिकाण
★ प्रमुख शहरीं हुंड्या व बिलस कलेक्शनची योजना
★ अल्प मुदतीच्या ठेवींवर आकर्षक व्याजाचे दर
★ नाममात्र सभासदत्वाची योजना
★ काटकसरीसाठीं बचत योजना
★ कार्यक्षम व्यवस्थापकांची देखरेख
बँकिंगच्या सर्व व्यवहारासाठीं भेटा.
द. शं. जमदग्नि
मॅ. डायरेक्टर

( स्थापना १९२१ )
गरगट्टी अँड सन्स
शहापूर–बेळगांव

धोबी, फॅमिली व शिंपी
पेटंट इस्त्रीचे कारखानदार
**********************************************
– आमचे ग्राहकांस हें वर्ष सुखाचें जावो. –

# पंचवार्षिक योजनेचें कार्य व महाराष्ट्रांतील ग्रामीण जनता

( भास्कर महादेव काळे, एम्. ए., बी. टी. )

पंचवार्षिक योजनेचा कार्यक्रम सुरू होऊन आतां जवळ जवळ अडीच वर्षें होत आलीं आहेत. कार्यक्रमाच्या अंमलबजावणीच्या दृष्टीनें व परिणामाच्या दृष्टीनेंहि पुढील अडीच वर्षांचा काळ जास्त महत्त्वाचा आहे. या राहिलेल्या अडीच वर्षांच्या काळांत योजनेवर खर्चहि पहिल्या अडीच वर्षांच्या मानानें ५० टक्के जास्त प्रमाणांत होणार आहे. कारण, पहिल्या अडीच वर्षांत एकूण अंदाजाच्या ४० टक्के खर्च झाला तर आतां उरलेल्या अडीच वर्षांत बाकीचा ६० टक्के खर्च होणार आहे. योजनेच्या कार्यक्रमालाहि १९५२ च्या डिसेंबरमध्यें दुरुस्त आराखड्याच्या प्रसिद्धीमुळें निश्चित स्वरूप आलें आहे. सरकार व जनता या दोघांनाहि आपापल्या जबाबदारीची स्पष्ट कल्पना आली आहे. आपल्या देशांत नियोजनाचा कार्यक्रम अगदींच नवीन असल्यामुळें पंचवार्षिक योजनेच्या सुरवातीचा वर्ष दीड वर्षांचा काळ हा कार्यक्रम निश्चित करणें व कार्यक्रमासाठीं प्रचार-कार्य करणें व व्यवस्था करणें अशा गोष्टींत गेल्यामुळें, साहजीकच सुरवातीच्या दीड-दोन वर्षांत प्रगति अगदीं मंद झाली.

## फायदा करून घेतला पाहिजे

प्रस्तुत लेखांत विशेषतः महाराष्ट्रांतील ग्रामीण जनतेच्या हितसंबंधांच्या व भवितव्याच्या दृष्टीनें पंचवार्षिक योजनेच्या कार्यक्रमाचा विचार करावयाचा आहे. महाराष्ट्राची कल्पनाहि मुंबई प्रांतांत समाविष्ट होणाऱ्या मराठी जिल्ह्यांपुरतीच मर्यादित मानिली आहे. पंचवार्षिक योजनेच्या कार्यक्रमाचा कांहीं भाग अशा स्वरूपाचा आहे कीं, त्या भागाचा जास्तींत जास्त उपयोग करून घेणें हें जनतेच्या हातामध्यें आहे. पंचवार्षिक योजनेच्या यशासाठी जनतेचा उत्साह व आपुलकी यांची विशेष गरज आहे असें वारंवार सांगितलें जातें त्याचें रहस्य हेंच आहे. सरकारनें खर्चाच्या कांहीं बाबी मंजूर केल्या आहेत परंतु त्याचा जास्तींत जास्त फायदा करून घेणें हें केव्हांहि जनतेच्या सहकार्यावरच व आपुलकीवरच अवलंबून आहे. रेल्वे किंवा पोस्ट खातें यांच्या मार्फत "सौजन्याचा आठवडा" पाळला जाण्याची हल्लीं प्रथा सुरू झाली आहे. परंतु केवळ "सौजन्याचा आठवडा" पाळून सौजन्य निर्माण होत नसतें, तर त्या दृष्टीनें ज्याचा ज्याचा म्हणून संबंध येईल त्या प्रत्येकानें सौजन्यवृत्ति आपल्या ठिकाणीं बिंबवण्याचा प्रयत्न केला पाहिजे. शेतकी खात्यानें कांहीं ठिकाणीं प्रात्यक्षिकांची व्यवस्था केली तरी त्यांचा फायदा घेणें हें लोकांच्या सहकार्यावरच अवलंबून असतें. एखाद्या गांवांत मोफत वाचनालय सुरू केलें तरी त्याचा भरपूर फायदा करून घेणें लोकांच्याच हातांत असतें. पंचवार्षिक योजनेच्या कार्यक्रमांत अशा कांहीं गोष्टी ठेवण्यांत आल्या आहेत व त्यांचा फायदा घेणें हें ठिकठिकाणच्या स्थानिक जनतेच्या रुचीवर अवलंबून आहे.

## महाराष्ट्राची आर्थिक परिस्थिति

प्रथम महाराष्ट्राच्या आर्थिक परिस्थितीच्या दृष्टीनें कांहीं गोष्टी लक्षांत घेतल्या पाहिजेत. महाराष्ट्राच्या जिल्ह्यांतून लोकवस्तीचें प्रमाण सामान्यपणें दर चौरस मैलाला २७५ इतकें आहे. रत्नागिरीसारख्या जिल्ह्यांत हें प्रमाण दर चौरस मैलाला ३२८ इतकें आहे. हवामानाच्या दृष्टीनें महाराष्ट्राचा सर्व भाग मनुष्यवस्तीस योग्य असाच आहे. फक्त सह्याद्रीच्या उतारावरील डोंगराळ भाग मनुष्यवस्तीस योग्य नाहीं. शेती हाच महाराष्ट्राचा मुख्य धंदा आहे. परंतु शेतीच्या बाबतींत रत्नागिरी जिल्ह्याचें उत्पादन सर्वांत अपुरें आहे. कारण रत्नागिरी जिल्ह्यांतील पीक तेथील लोकांना फार तर दोन महिने पुरूं शकतें. ठाणें, कुलाबा व रत्नागिरी या जिल्ह्यांच्या किनारपट्टीवर मच्छीमारीचा धंदा चालतो व कांहीं लोक जलवाहतुकीचा धंदा करितात. जलवाहतूक करणारांना पावसाळ्यांत निदान तीन महिने आपला धंदा बंद ठेवावा लागतो. तांदूळ, जोंधळा, बाजरी व थोड्या प्रमाणांत गहूं हीं महाराष्ट्रांतील मुख्य पिकें आहेत. व्यापारी पिकांपैकीं कापूस, थोडासा तंबाखू व कांहीं ठिकाणीं गळिताचीं धान्यें हीं मुख्य पिकें आहेत खानदेशांत दोन-तीन कापडाच्या गिरण्या व बरेच सरकी काढून कापसाचे गठ्ठे बांधणारे जिन्स व प्रेस असे लहान स्वरूपाचे कारखाने आहेत. नगर जिल्ह्यांत पाटबंधाऱ्याचें पाणी मिळूं लागल्यापासून उसाची लागवड होऊन कांहीं साखरेचे कारखाने चांगल्या स्थितींत चालतात. कोल्हापूर, सांगली, ओगलेवाडी व किर्लोस्करवाडी हा सर्व भाग लहान लहान कारखान्यांसाठी व कांहींसा तेलाच्या गिरण्यांसाठीं प्रसिद्ध आहे. सांगलीला प्रसिद्ध कापडाची गिरणीहि आहे. नाशिक व सोलापूर जिल्ह्यांत विणकर लोकांचा धंदा कांहीं ठिकाणीं मोठ्या प्रमाणांत चालतो. सोलापूर व पुणें हीं कांहींशीं कारखानी शहरें आहेत. बागाईत-शेती व तत्सम लागवड या दृष्टीनें विचार करतां रत्नागिरी व ठाणें हे जिल्हे हापूस आंब्याविषयीं प्रसिद्ध आहेत कुलाबा, नाशिक, पुणें या जिल्ह्यांत कांहीं ठिकाणीं भाजीपाल्याची लागवड चांगली होते, ठाणें जिल्हा केळीं व विड्याचीं पानें याविषयीं प्रसिद्ध आहे, नाशिक जिल्हा द्राक्षांच्या मळ्यांविषयीं प्रसिद्ध आहे, कुलाबा व रत्नागिरी हे जिल्हे सुपारीच्या उत्पन्नाबद्दल प्रसिद्ध आहेत, व नाशिक आणि पुणें हे जिल्हे कांहीं फळांविषयीं ( पेरू, मुसुंबी, अंजीर इ. ) प्रसिद्ध आहेत. सोलापूर, जळगांव, धुळें, पुणें, कोल्हापूर, किर्लोस्करवाडी हीं औद्योगिक केंद्रें वगळल्यास नाशिक व पंढरपूर हीं धार्मिक दृष्ट्या महत्त्वाचीं शहरें आहेत. महाबळेश्वर, माथेरान, लोणावळा हीं शहरें हवा खाण्याविषयीं प्रसिद्ध आहेत. ठाणें, कुलाबा, रत्नागिरी या पश्चिम किनारपट्टीवरील जिल्ह्यांत पाऊस भरपूर पडला म्हणजे पाणीपुरवठा वर्षभर समाधानकारक असतो. नगर, सोलापूर हे जिल्हे अपुऱ्या पावसासाठी प्रसिद्ध आहेत. बाकीच्या महाराष्ट्राच्या जिल्ह्यांत बेताचा पाऊस पडतो व तो साधारणपणें निश्चित असतो. रत्नागिरी जिल्ह्यांतील निदान २० टक्के लोक तरी मुंबई सारख्या शहरांत नोकऱ्या करूनच आपल्या कुटुंबांचा चरितार्थ चालवितात. कुलाबा व ठाणें या जिल्ह्यांतीलहि कांहीं

लोक रत्नागिरीच्या खालोखाल मुंबईत नोकऱ्या करतात. पुणें जिल्ह्यांतून विशेषतः फळें व भाजीपाला यांचा व्यापार करण्यासाठीं पुष्कळ लोक मुंबईत येतात. नाशिक व नगर जिल्ह्यांतील लोक मुंबईस कल्हई लावण्याचा धंदा करतात. महाराष्ट्रांतील बरेचसे लोक धंद्यासाठीं किंवा नोकऱ्यांसाठीं मुंबईवर अवलंबून असतात. गिरण्यांतील मजूर, गोदींतील हमाल, फळें व भाजीपाला यांचे व्यापारी, कारकून, शिक्षक व घरगडी इत्यादि सर्व व्यवसाय करणारे लोक महाराष्ट्राच्या जिल्ह्यांतूनच विशेषतः मुंबईत येतात. सोलापूर, धुळें, जळगांव इ. ठिकाणच्या कांहीं कापडाच्या गिरण्या, नगर जिल्ह्यांतील साखरेचे कारखाने, व कोल्हापूर, किर्लोस्करवाडी, ओगले-वाडी, पुणें, सांगली या इतरांतील कांहीं कारखाने वगळले तर महाराष्ट्रांत म्हणण्यासारखी कारखानदारी नाहीं, व म्हणून महाराष्ट्रांत मोठा श्रीमंत वर्ग नाहीं. व्यापाराच्या निमित्तानें मारवाडी व गुजराथी लोकांनीं आपला व्याप अनेक लहानलहान शहरांतून सुरू केला आहे, व यामुळें महाराष्ट्रांतून थोडीशी अदृश्य निर्गतहि होते. रत्नागिरी जिल्ह्याच्या दक्षिण भागांत काजूबियांचा धंदा महत्त्वाचा आहे. याशिवाय आंबेपोळी व फणस-पोळी तयार करणें, कोकम: सालें बनविणें, साणगे तयार करणें, मध गोळा करणें, लोणी, तूप तयार करणें, हे किरकोळ धंदे कांहीं ठिकाणीं चालतात. विटा पाडणें, बुरूडकाम करणें, घाणीवर तेल गाळणें, शेळयामेंढ्या पाळणें, कातडीं कमाविणें, आयुर्वेदिक औषधें तयार करणें, तांब्यापितळेचीं भांडीं करणें, कौलें तयार करणें, इ. धंदेहि कांहीं ठिकाणीं बैठ्या उद्योगधंद्यांच्या स्वरूपांत चालतात. शिक्षणाच्या प्रसारामुळें हल्लीं लहान लहान छापखानेहि पुष्कळ ठिकाणीं निघाले आहेत, व विशेषतः कोल्हापूरच्या बाजूला छपाईचें काम चांगलें केलें जातें. स्वतंत्र रीतीनें नांवारूपास आलेले धंदे म्हणजे पनवेल येथील आयुर्वेदिक औषधांचा कारखाना व अलिकडचा खोपवली येथील पुठ्ठ्यांचा कारखाना. परंतु पांचसहा प्रसिद्ध अपवाद वगळल्यास महाराष्ट्रांत मोठ्या प्रमाणांत कारखानदारी नाहीं. महाराष्ट्रीय लोक व्यापारा-साठीं देशाच्या इतर भागांत फारसें जात नाहींत. निदान १५ टक्के महाराष्ट्रीय जनतेचे हितसंबंध आर्थिक दृष्ट्या मुंबई शहरावर अवलंबून आहेत. हवामान साधारणपणें समाधानकारक असलेला, निसर्गाच्या कृपेवर पाणीपुरवठ्यासाठीं अवलंबून असलेला, शेती व कांहींशीं बागाईत शेती करणारा व इतर किरकोळ बैठे उद्योगधंदे करणारा व यामुळें आर्थिक दृष्ट्या अगदीं सामान्य परिस्थितींत असलेला महाराष्ट्र हा भाग आहे.

### महाराष्ट्राची आर्थिक प्रगति कशी होईल

महाराष्ट्रांत कॉमर्स व इंजिनियरिंग हीं कॉलेजें जास्त प्रमाणांत निघत आहेत हें प्रगतीचें लक्षण समजलें पाहिजे. महाराष्ट्राची आर्थिक प्रगति कोणकोणत्या बाबतींत होऊं शकेल याचा आतां थोडक्यांत उल्लेख करूं. प्रथम किनाऱ्यावरील मच्छीमारीचें उत्पन्न फार थोड्या श्रमांनीं व खर्चानें वाढवितां येण्यासारखें आहे. मालवण–वेंगुर्लें, रत्नागिरी व रेवदंडा या नजिकचा किनारा मच्छीमारीचें उत्पादन वाढविण्याच्या दृष्टीनें विशेष अनुकूल आहे. मासे पकडण्यासाठीं स्टीम लॉंचेसचा उपयोग, मासे पकडण्यासाठीं सुधारलेलीं जाळीं वापरणें, मासे टिकविण्यासाठीं बर्फाचा उपयोग, जलद वाहातुकीची व्यवस्था व विक्री करणारांच्या सहकार संस्था या मार्गांनीं मच्छीमारीच्या धंद्यांत फार मोठी सुधारणा होऊं शकेल. मच्छिमारी करणारा वर्ग हा अतिशय कार्यक्षम आहे परंतु त्याला धंद्याची आधुनिक पद्धतीनें उभारणी करण्याला

'अर्थ' ग्रन्थमाला.
१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार




गंधर्व नाटक मंडळीचा
मखमलीचा पडदा
डाळिंबी रंगाचा (१७ × २६ चे) २ तुकडे
योग्य किंमत आल्यास विकणेचे आहेत गरजूंनीं
प्रो. महाराष्ट्र भुवन, बेळगांव
येथें चौकशी करावी.

फो. नं. ४२४८४ [ तार : माधवाश्रम, बॉम्बे
माधवाश्रम लि.
भोजनाची व रहाण्याची उत्कृष्ट सोय
तसेंच ★ उपाहाराची खुल्या बगीच्यांत व्यवस्था.
★ विवाह-कार्याची थोड्या खर्चांत सर्व प्रकारची उत्तम सोय.
★ कुटुंबासह रहाणारांसाठीं स्वतंत्र खोल्या.
—माधवाश्रम लि., गिरगांव मुंबई ४—



तज्ज्ञांची व भांडवलाची आवश्यकता आहे. सरकारचें अलिकडे या गोष्टींकडे थोडेसें लक्ष गेलें आहे. सह्याद्रीच्या उतारावर हरतऱ्हेची जंगलसंपत्ती आहे. त्या संपत्तीचा उपयोग करून आयुर्वेदिक औषधें तयार करण्याचा धंदा ठाणें, रत्नागिरी व कुलाबा या जिल्ह्यांत सहज वाढवितां येण्यासारखा आहे. आयुर्वेदिक औषधांना अंतर्गत बाजारपेठेंत मागणी आहेच, व हीं औषधें नजिकच्या परदेशांत निर्गतहि होऊं शकतील. पश्चिम किनारपट्टीवरील जुन्या पद्धतीनें मालाची वाहातूक करणारा देशी गलबतांचा धंदाहि वाढवितां येण्यासारखा आहे. यासाठी गलबतें बांधण्याच्या धंद्याचीहि वाढ सहजरीतीनें करतां येण्यासारखी आहे. कित्येक बैठे उद्योगधंदे अशा स्वरूपाचे आहेत कीं, थोड्याशा चालचलाऊ भांडवलाचा पुरवठा व मालाची विक्री करण्याची व्यवस्था या दोन सोयी करतां आल्या तर या धंद्यांची परिस्थिति सुधारूं शकेल प्रस्तुत लेखकानें १९३८ सालीं मुंबई सरकारनें नेमलेल्या मुंबई आर्थिक व औद्योगिक चौकशी कमिटीवर रत्नागिरी व कुलाबा जिल्हा व मुंबई शहर येथें संशोधन म्हणून काम केलें होतें. त्यावेळीं कांहीं बैठ्या धंद्यांच्या बाबतींत अशा स्वरूपाचा अनुभव अगदीं स्पष्टपणें आला. विजयदुर्ग येथील बटणें तयार करण्याचा धंदा, मालवण येथील चाकू तयार करण्याचा धंदा, शिरोडें येथील एक प्रकारच्या लाकडापासून फुलें इ. तयार करण्याचा धंदा, मालवण–वेंगुर्लें भागांतील काजूचा धंदा, अलिबाग तालुक्यांतील तोंडलीं पिकविणाऱ्या बागाईत शेतीचा धंदा हे सर्व किरकोळ धंदे असे आहेत कीं, धंद्यासाठीं थोडेसें चालचलाऊ भांडवल व मालाच्या विक्रीची व्यवस्था या दोन गोष्टींची कांहीं सोय झाल्यास या धंद्यांतील लोकांची परिस्थिति निश्चित सुधारूं शकेल. मुंबई शहरांत तोंडल्यांचा भाव तीन आणे रत्तल असला तर अलिबाग तालुक्यांतील तोंडली पिकविणाराला प्रत्यक्ष पाऊण आणा रत्तल इतका कमी भाव हातांत येतो. मालवण–वेंगुर्लें या भागांत जुन्या व नवीन पद्धतीनें काजूबिया फोडण्याचें काम फार चांगलें चालतें. परंतु या धंद्यांतील लोकांना निम्मेपेक्षां जास्त कच्च्या काजूबिया आफ्रिकेंतून आणाव्या लागतात. यासाठीं भांडवलाची आवश्यकता असते. हें भांडवल हल्लीं एक अमेरिकन कंपनी पुरवीत असल्यामुळें या धंद्यांत मिळणारा फार मोठा फायदा रत्नागिरी जिल्ह्यांतील लोकांना मिळूं शकत नाहीं. काजू–बियांच्या धंद्यांत त्वरित सुधारणा करणें आवश्यक आहे. याशिवाय रत्नागिरी जिल्ह्याच्या वरकस जमिनींत काजूच्या झाडांची लागवड सहज करतां येण्यासारखी आहे. रत्नागिरी जिल्ह्यांत लागवड केली तर आफ्रिकेंतून कच्च्या काजू–बियांची आयात करावी लागणार नाहीं. सध्यां अमेरिकेंत काजू–बिया मोठ्या प्रमाणांत विकल्या जातात. तेव्हां डॉलर मिळवून देणारा धंदा म्हणूनहि या धंद्याला महत्त्व आहे. रत्नागिरी जिल्ह्यांतून मुंबईशीं चालणारा कलमी आंब्यांचा व्यापार हा मुळींच संघटित नाहीं. विशेषतः मुंबईत आंब्यांची विक्री करण्यासाठीं सहकारी संस्था स्थापन केल्यास, आंबे निर्गत करणारांच्या हातांत जास्त पैसा येऊं शकेल. यासाठीं प्रथम रत्नागिरी, मालवण, वेंगुर्लें या निर्गत करणाऱ्या शहरांत आंब्यांचे मध्यवर्ती मार्केट स्थापन झालें पाहिजे, लहान लहान बागाइतदारांनीं आपला माल या मध्यवर्ती मार्केटमध्यें विकला पाहिजे व नंतर या मध्यवर्ती मार्केटमार्फत हा माल मुंबईस विक्रीसाठीं निर्गत झाला पाहिजे. अशा प्रकारची कांहीं व्यवस्था झाल्याशिवाय आंब्यांच्या बागा असणारांच्या हातीं योग्य तो पैसा येणार नाहीं. जूनपासून बोटींची वाहातूक बंद झाल्यावर आंब्याची वाहातूक करण्यासाठीं मोटारींची सोय झाली पाहिजे. नाहींतर माल तेथेंच पडून राहून त्याला फार कमी किंमत येते. रत्नागिरी जिल्ह्यांतील विणकर लोकांत सहकारी तत्त्वाची संघटना नाहीं. ती सुरू केली पाहिजे, तरच विणकरांची स्थिति थोडीशी सुधारूं शकेल. बैठे उद्योगधंदे करणारे किरकोळ लोक हे नेहमींच पैशाच्या अडचणींत असतात, व त्यांना येईल त्या किंमतींत आपला माल विकल्याशिवाय दुसरा मार्ग नसतो. अशा किरकोळ स्वरूपाच्या धंद्यांना पैशाची मदत मिळण्याची सोय झाली पाहिजे व मालाच्या विक्रीची व्यवस्था झाली पाहिजे. मुंबईत गेलीं तीस वर्षें आंबे पोळी, फणस-पोळी व कोकम सालें या वस्तूंची विक्री व्यवस्थित रीतीनें होण्याची सोय झाल्यामुळें या मालाचें उत्पादन करणाऱ्या लोकांच्या हातांत थोडा नियमित पैसा येतो. याच पद्धतीवर कुलाबा जिल्ह्यांत पोह्यांचें पापड तयार करून ते मुंबईत विकण्याचा धंदा सध्यां थोडासा चालतो. त्यापेक्षा किती तरी जास्त प्रमाणांत तो चालू शकेल. येथें बैठ्या उद्योगधंद्यासंबंधीं केलेल्या ह्या सूचना महाराष्ट्रांतील इतर कोणत्याहि बैठ्या उद्योगधंद्याला लागू पडतील.

### विशेष सुधारणेच्या कांहीं बाबी

आतां महाराष्ट्राच्या आर्थिक परिस्थितींत विशेष रीतीनें सुधारणा करूं शकतील अशा कांहीं गोष्टी पाहूं. कोयना योजनेचा विजेच्या उत्पादनाचा भाग पूर्ण झाला तर त्यामुळें दक्षिण महाराष्ट्रांत प्रत्येक खेड्यांत वीज–पुरवठा होऊं शकून जपानप्रमाणें बैठे उद्योगधंदे विजेच्या उपयोगानें फार मोठ्या प्रमाणांत चालवितां येतील. यामुळें ग्रामीण जनतेची आर्थिक परिस्थिति तर सुधारेलच, व त्याचबरोबर दळणवळण व व्यापार यांना चालना मिळून सर्वसाधारण आर्थिक वातावरण सुधारावयास मदत होईल. उद्योगधंद्यांची व व्यापाराची कांहीं नवीन लहान लहान शहरें स्थापन होऊं शकतील. अशा शहरांतून सहकारी तत्त्वावर लहान लहान धंदे उभारणें फार सोपें जाईल. इतर ठिकाणच्या मोठ्या व छोट्या पाटबंधाऱ्यांच्या योजना पूर्ण झाल्या म्हणजे शेतीचें उत्पादन वाढावयास फार मोठी मदत होईल. महाराष्ट्रांतील ऊस संयुक्त प्रांत व बिहार येथील उसापेक्षां चांगला असल्यामुळें त्या प्रांतांतील कांहीं साखर कारखाने महाराष्ट्रांत आणले जावे अशी एक विचारसरणी आहे. ही गोष्ट खरोखरच घडून आल्यास महाराष्ट्राची आर्थिक परिस्थिती सुधारण्यास फार मोठी मदत होईल. अनेक मजुरांना कामें मिळतील व याशिवाय वाहातूक, व्यापार, बँकिंग याहि धंद्यांची थोडीशी वाढ होऊं शकेल. दळणवळणाचे मार्ग विशेषतः रत्नागिरी व ठाणें जिल्ह्यांत अपुरे आहेत, त्यांचीहि वाढ झाली पाहिजे. विजेचें उत्पादन, वाहातुकीच्या रस्त्यांत वाढ, पाटबंधाऱ्यांच्या मोठ्या व लहान योजनांमुळें शेतीच्या उत्पादनांत वाढ व उत्तरेकडील साखरेचे कांहीं कारखाने महाराष्ट्रांत आणले जाणें या गोष्टी पुढील पांच ते दहा वर्षांत साध्य झाल्यास आजचा कृषिप्रधान महाराष्ट्र हा कारखानदारी व व्यापार या बाबतींत स्पृहणीय प्रगति करूं शकेल, व अशा रीतीनें एकंदर पार्श्वभूमि बदलत गेली म्हणजे इतर अनेक नवीन कारखाने महाराष्ट्रांत निघूं शकतील. जमीन व मनुष्यबळ व बुद्धिमत्ता यांची महाराष्ट्रांत अनुकूलता आहे. धंद्यांचें विकेंद्रीकरण झालें पाहिजे. या दृष्टीनें महाराष्ट्रांतील वातावरण यंत्रशक्तीनें चालणारे अनेक लहान लहान किंवा मध्यम दर्जाचे धंदे स्थापन करावयास अनुकूल आहे अशा प्रकारें सुधारणा झाल्यास बँकिंगच्या धंद्याचाहि व्याप वाढेल व ग्रामीण जनतेंत आयुर्विमा यशस्वी करण्याची जोरदार मोहीम महाराष्ट्राला हातीं घेतां येईल.

# बँक ऑफ पूना लि.

(शेड्यूल्ड बँक)

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल : | ५०,००,००० |
| विक्रीस काढलेलें व खपलेलें : | २५,००,००० |
| वसूल भांडवल : | १२,५०,००० |

## –संचालक मंडळ–

१ श्री. मुरलीधर चतुर्भुज लोया, चेअरमन

२ श्री. दत्तात्रय रामचंद्र नाईक, जे. पी.

३. डॉ. नारायण भिकाजी परुळेकर M. A. Ph. D. संपादक, सकाळ, पुणें.

४ श्री. फ्रामजी पी. पोचा, बियांचे व्यापारी.

५ श्री. नारायणदास श्रीराम सोमाणी

६ श्री. गणपतराव काळूराम नाईक, B. Sc., B. E., LL. B.

शाखा—(१) भवानी पेठ, पुणें. (२) सदाशिव पेठ, पुणें. (३) सोलापूर (४) सांगली.

व्याजाचे दर–चालू ठेव १/२ टक्का. सेव्हिंग्ज १॥ टक्का.

मुदत ठेवः—बँक १ ते ३ वर्षें मुदतीच्या ठेवी स्वीकारते. व्याजाबद्दल चौकशी करावी.

एक वर्षापेक्षा कमी मुदतीच्या ठेवींवर आकर्षक व्याज.

मुख्य ऑफिस व सांगली शाखेंत लॉकर्सची सोय.

मुख्य ऑफिस : ४५५ रविवार, पुणें २.

गो. गं. साठे, मॅनेजर.



# पुणें जिल्हा सहकारी खरेदी-विक्री संघ लि.

११५।११६ भवानी पेठ, गूळ आळी, पुणें २.

तारेचा पत्ताः—सॅनको सोप. टेलिफोन नं. ३११५

(जिल्ह्यांतील शेतकरी व नागरी जनतेस दैनंदिन गरजेच्या वस्तु पुरविणें व शेतकऱ्यांचा माल किफायतशीर विकून देणें, या उद्देशानें स्थापन झालेली जिल्ह्यांतील मध्यवर्ती संस्था)

## संस्थेकडे खालीलसाठी लिहा अगर समक्ष भेटा.

★शेतीचीं सर्व प्रकारचीं अवजारें, ऊंस गाळण्याचे घरक, सल्फेट व इतर खतें, पिकांच्या रोगांवरील औषधें, पेंड.

★शेतकी खात्यामार्फत जिल्ह्यांत होणारें पेंड, खतें व मिक्श्चर यांचें वांटप या संस्थेमार्फतच करण्यांत येतें.

★पुणें जिल्हा ग्रामसुधारणा मंडळाच्या विद्यमानें चालु असलेल्या नियंत्रित लोखंड, सिमेंट वांटप योजनेंतील–गाड्यांचे आंस, धावपट्ट्या, नळीचे पत्रे, प्लेन पत्रे, वगैरे व सिमेंट.

★ग्राहक सहकारी संस्थांना लागणारा माल संघाच्या अडत दुकानामार्फत पुरविला जातो.

★शेतकऱ्यांचा शेतीचा माल संस्थेच्या अडत दुकानामार्फत पुणें येथील बाजारपेठेंत किफायतशीर रीतीनें विकून दिला जातो.

★जिल्ह्याबाहेरील शेतकरी व सहकारी संस्था यांचा माल पुणें बाजारपेठेंत किफायतशीर रीतीनें विकून दिला जाईल.



# भोर स्टेट बँक लि.

[स्थापना : १९४४]

## मुख्य कचेरीः–भोर, जि. पुणें.

शाखाः–पुणें, पाली व शिरवळ.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | रु. ५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. २,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् | रु. ७१,६०० |

## बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

श्री. म. व्यं. शिंगरे, अध्यक्ष.

न. भू. ना. पां. थोपटे, उपाध्यक्ष.

रावसाहेब य. द. खोले.

श्री. चं. रा. राठी.

श्री. के. वि. केळकर, एम्. ए., एलएल्. बी.

श्री. बा. ग. धंदुके.

सरकारी रोखे खरेदी–विक्री, व्याजवसुली, पेन्शन कलेक्शन व इतर बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

बँक १ ते ४ वर्षें मुदतीसाठी कायम ठेवी स्वीकारते. दराबाबत समक्ष चौकशी करावी.

पुणें कचेरीः–बुधवार घ. नं. ३६१–६२, पासोड्या विठोबाजवळ. फोन नं. २५७६.

अधिक माहितीसाठी लिहा.

वाय. एस. जोशी, अ. मॅनेजर.

एन. व्ही. पांडव, मॅनेजर



# दि रत्नाकर बँक, लि.

(कोल्हापूर येथें नोंदलेली व भागीदारांची जबाबदारी मर्यादित असलेली)

स्थापना : १९४३

मुख्य कचेरीः माऊसिंगजी रोड, कोल्हापूर

शाखा—सांगली, शाहूपुरी, मिरज, जयसिंगपूर.

| | | रु. |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | २०,११,००० |
| विक्री केलेलें शेअर भांडवल | ... | १०,०६,६०० |
| रोख वसूल शेअर भांडवल | ... | ५,०३,३०० |
| रिझर्व्ह व इतर फंड | ... | १,०८,४०० |
| खेळतें भांडवल (अंदाजें) | ... | ४७,६६,००० |

—अद्यावत् बँकिंग व्यवहार केले जातात—

श्री. बी. बी. पाटील, B. A., LL. B., वकील, सांगली, चेअरमन

श्री. गंगाराम सिद्दाप्पा चौगुले, कोल्हापूर, व्हा. चेअरमन

एल्. एन्. शहा, B. Com., C. A. I. I. B. मॅनेजर

### पंचवार्षिक योजनेचा उपयोग कसा करतां येईल?

महाराष्ट्रीय जनता ही विशेषतः ग्रामीण जनता असल्यामुळें कर्जत, कोल्हापूर इ. ठिकाणीं गेल्या वर्षी सुरू झालेल्या ग्रामीण विकास योजनांचा जास्तींत जास्त फायदा महाराष्ट्रीय जनतेनें करून घेतला पाहिजे. याच स्वरूपाच्या योजना आणखी कांहीं ठिकाणीं २ ऑक्टोबर १९५२ पासून सुरू झाल्या आहेत. या सर्व योजनांचा आपुलकीच्या दृष्टीनें महाराष्ट्रीय जनतेनें जास्तींत जास्त उपयोग करून घेतला पाहिजे. ग्रामीण जीवनाची आर्थिक पार्श्वभूमि बदलणें हा या योजनांचा मुख्य हेतु आहे. हा हेतु साध्य होण्यासाठी जनतेनें संपूर्ण सहकार्य दिलें पाहिजे.

मच्छीमारीच्या विकासासाठी पंचवार्षिक योजनेंत रु. ५ कोटी ८० लक्ष रकमेची तरतूद आहे. या खर्चाचा फायदा पश्चिम किनाऱ्यावरील महाराष्ट्रीय जनतेला मिळण्यासारखा आहे. मुंबई किनाऱ्यावर १०० होड्या यांत्रिक पद्धतीनें सुरू करण्यांत येतील, पांच लक्ष रुपये मच्छीमारी करणारांना यांत्रिक होड्या चालविण्याचें शिक्षण देण्यासाठी खर्चिले जाणार आहेत. रु. ६० लक्ष खर्च मच्छीमारी लोकांत सहकारी तत्त्वाचा प्रसार करण्यासाठी व आवश्यक साहित्याचा पुरवठा करण्यासाठी केला जाणार आहे. या सर्व व्यवस्थेचा महाराष्ट्राच्या पश्चिम किनाऱ्यावर मच्छीमारी करणाऱ्या लोकांनीं फायदा घेतला पाहिजे. निरनिराळ्या ग्रामोद्योगांच्या विकासासाठीं पंचवार्षिक योजनेंत रु. १५ कोटी खर्चाची तरतूद आहे. तेल गाळणें, साबण करणें, ग्राम गूळ करणें, खांडसरी साखर करणें, कातडीं कमाविणें, लोकरीच्या घोंगड्या बनविणें, कागद तयार करणें, मधमाशा पाळणें, खादी, काथ्यावर अवलंबून असणारे धंदे इ. ग्रामोद्योग वरील खर्चांत येतात. महाराष्ट्राच्या दृष्टीनें काथ्यावर अवलंबून असणारे धंदे, कागद करणें, तेल गाळणें, कातडीं कमाविणें, मधमाशा पाळणे, हे धंदे महत्त्वाचे आहेत. प्रत्येक धंद्यासाठीं कार्यक्षेत्र स्वतंत्र रीतीनें खुलें ठेवलें जाईल, व संशोधन आणि शिक्षण या गोष्टींकडेहि लक्ष दिलें जाईल. उत्पादन करणारांचे सहकारी संघ स्थापन झाल्यास सरकार त्यांना पैशाच्या रूपानें मदत करील. या रु. १५ कोटी खर्चाचा जास्तींत जास्त फायदा महाराष्ट्रीय जनतेनें करून घेतला पाहिजे.

पाटबंधाऱ्यांच्या योजनांचा कांहीं भाग ग्रामीण जनतेच्या सहकार्यानें व श्रमशक्तीनें पूर्ण केला जाईल. ग्रामीण जनतेनें कांहीं ठिकाणीं श्रमशक्तीच्या रूपानें मदत केल्यास पाणीपुरवठ्याचीं कामें जास्त वेगानें होऊं शकतील व त्यांचा फायदा शेतकरी वर्गाला मिळेल.

### पैसा मिळविण्याच्या प्रयत्नाचे मार्ग

रु. १ कोटी १० लक्ष खर्च मरीन इंजिनिअरिंग व व्यापारी जहाजांवर काम करणारे लोक यांच्या शिक्षणासाठीं केला जाईल. या खर्चाचा जास्तींत जास्त फायदा विशेषतः पश्चिम किनाऱ्यावरील महाराष्ट्रीय तरुणांना घेतां येण्यासारखा आहे. विशेषतः खेडेगांवांतील रस्ते ग्रामीण जनतेच्या सहकार्यानें सुधारण्याच्या कामासाठीं रु. १५ लक्ष दिले जातील. या रकमेचा कांहीं भाग महाराष्ट्रांतील जनतेनें खेडेगांवांतील रस्त्यांसाठीं मिळविण्याचा प्रयत्न करावा. ४ कोटी रु. जलवाहतूक कंपन्यांना कर्जाऊ मिळण्याची योजना आहे. या रकमेचा लहानसा भाग पश्चिम किनाऱ्यावर वाहतूक करणाऱ्या एखाद्या जलवाहतूक कंपनीला मिळूं शकेल. आयुर्वेदाच्या शिक्षणासाठी रु. ९५ लक्ष व रुग्णालयाच्या स्थापनेसाठी रु. १ कोटी ६ हजार रकमेची तरतूद केली आहे. यांपैकीं कांहीं भाग महाराष्ट्रीय जनतेला मिळूं शकण्यासारखा आहे. कुटुंब नियोजनासाठी रु. ६५ लक्षांची तरतूद आहे. या रकमेंतून कांहीं रक्कम मिळवून तिचा योग्य उपयोग करणें जरूर आहे. प्राथमिक शिक्षणासाठी होणाऱ्या रु. २० कोटी खर्चाचा कांहीं भाग महाराष्ट्राच्या दृष्टीनें उपयुक्त ठरेल. सामाजिक प्रश्नांच्या संशोधनासाठी रु. ५० लक्ष खर्च व्हावयाचा आहे. योग्यप्रकारें संशोधन करून कांहीं पैसा मिळवितां येण्यासारखा आहे. मागासलेल्या जातींच्या कल्याणासाठी एकूण १४ कोटी खर्च व्हावयाचा आहे. या खर्चाचा कांहीं भाग महाराष्ट्राला मिळूं शकेल. बेकारी नष्ट करण्यासाठी सुशिक्षित लोक रु. ५०० ते रु. ५,००० इतकें भांडवल लागणारा धंदा स्थापन करूं शकतील तर सरकार भांडवलाच्या रूपानें व धंद्याचे शिक्षण घेण्यासाठी पैसा देऊं शकेल. या योजनेचा ज्यास्तींतजास्त फायदा महाराष्ट्रीय जनतेनें मिळविला पाहिजे. घरें बांधण्याच्या कामासाठी रु. ३८ कोटी खर्च केला जाईल. गलिच्छ वस्तीचे भाग सुधारण्यासाठींहि या रकमेंतून मदत दिली जाईल. महाराष्ट्रांतील शहरांनीं या पैशांतून घरें बांधणें व गलिच्छ भाग सुधारणें या कामांसाठी पैसा मिळविण्याचा प्रयत्न करावा.

### सारांश व भावी आशा

या लेखाच्या सुरवातीच्या भागांत स्पष्ट केल्याप्रमाणें पंचवार्षिक योजनेनें खर्चाचे कांहीं कार्यक्रम जनतेसाठी खुले केले आहेत. कोणकोणत्या बाबतींत हे कार्यक्रम आहेत याचा मागील परिच्छेदांत उल्लेख केला आहे. सरकार देऊं करीत असलेली मदत पदरांत पाडून घेऊन तिचा सदुपयोग करणें हें जनतेचें काम आहे. या बाबतींत सरकारकडून कशी मदत मिळवावी याबद्दल मार्गदर्शन कायदेमंडळांत निवडून आलेले लोकांचे प्रतिनिधी, स्थानिक पुढारी व वृत्तपत्रकार, नगरपालिका, जिल्हाबोर्डें व ग्रामपंचायती, उद्योगधंद्यांतील तज्ज्ञ, व्यापारी व इतर माहीतगार लोक व विशेषतः स्थानिक प्रश्नांशी समरस झालेले गांवांतील पुढारी व अर्थशास्त्रज्ञ इत्यादि करूं शकतील. अशा प्रकारें पद्धतशीर प्रयत्न केल्यास महाराष्ट्राची व विशेषतः महाराष्ट्रांतील ग्रामीण जनतेची आर्थिक परिस्थिती सुधारण्यास थोडीशी मदत होईल असा विश्वास वाटतो.

---

### ब्रिटनपासून बोटींची खरेदी

व्यापारी वहातुकीसाठी लागणाऱ्या १,००,००,००० पौंड किंमतीच्या बोटी पुरविण्यासाठी रशिआ ब्रिटिश कारखानदारांकडे मागणी नोंदविणार आहे, असें समजतें. बोटी पुरविण्यापूर्वी ब्रिटिश बोर्ड ऑफ ट्रेडची परवानगी घ्यावी लागेल. ती दिली गेल्यास गेल्या कित्येक वर्षांत बोटींना आलेली ही फार मोठी मागणी आहे, असें ठरेल.

### कँगॅरूच्या पित्तापासून कॉर्टिसॉन

सध्यां अमेरिकेंत तयार करण्यांत येत असलेलें कॉर्टिसॉन हें औषध बैलाच्या पित्तापासून तयार करण्यांत येतें. पण तेंच औषध कँगॅरूच्या पित्तापासून अधिक सुलभतेनें तयार करतां येईल, असा शोध ऑस्ट्रेलिअन शास्त्रज्ञांनीं लावला आहे. एका कँगॅरूपासून एक दशांश औंस कॉर्टिसॉन तयार होतें.

### वृत्तपत्रांच्या मालकाची मालमत्ता

अनेक अमेरिकन वृत्तपत्रांचे मालक, मि. विल्यम रँडॉल्फ हर्स्ट, हे ऑगस्ट, १९५१ मध्यें मरण पावले. त्यांच्या मालमत्तेची मोजदाद करण्यांत आली तेव्हां ती सुमारें ६,००,००,००० डॉलर्स किंमतीची आहे, असें आढळून आलें.

## श्रीलक्ष्मी सेंट्रल
## को-ऑपरेटिव्ह बँक लि., फलटण

फलटण जि. उत्तर सातारा ( मुंबई राज्य )

( स्थापना १९२६ )

| | | | |
|---|---|---|---|
| भांडवल : | अधिकृत | रु. | २,००,००० |
| | खपलेलें | रु. | १,१८,००० |
| | वसूल | रु. | १,११,००० |
| फंड : | रिझर्व्ह फंड | रु. | ९४,००० |
| | इमारत फंड | रु. | ५८,००० |
| | इतर फंड | रु. | १,०५,००० |
| ठेवी : | | रु. | ११,६०,००० |

चालू, सेव्हिंग्ज व मुदतीच्या ठेवी स्वीकारण्यांत येतात. सध्याचे ठेवींचे दर चालू ठेवीवर ½% सेव्हिंग्ज ठेवीवर १½%.
मुदत ठेवीवर–१ ते ५ वर्षांस–२½ ते ४%

व्यवहार : मुख्यतः सहकारी पेढ्यांना कर्जाऊ रकमा पुरविल्या जातात. बँकांचे इतरही सर्व प्रकारचे व्यवहार होतात.

*सर्व माहिती समक्ष अगर पत्रद्वारें पुरवली जाते.*

श्री. ह. तळवलकर, A. C. R. A., व्यवस्थापक.

वि. शं. झिरपे, B. A., LL. B., चेअरमन.



## दि व्हल्कन इन्शुअरन्स कं. लि.

—पुणें शाखा—

१७९, कर्वे बिल्डिंग, लक्ष्मी रोड.

आग, मोटार, अपघात व वर्कमेन्स कॉंपेन्सेशन ह्यांचे विमे स्वीकारणारी प्रमुख स्वदेशी कंपनी.

एजन्सी व इतर माहितीसाठी चौकशी करा :

ब्रँच सेक्रेटरी.



व्यापारी-कारखानदारांचें आवडतें मासिक

# संपदा

मराठा चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीज्, पुणें या संस्थेतर्फे

हें आर्थिक–औद्योगिक विषयांस वाहिलेलें मासिक प्रसिद्ध होतें.

वार्षिक वर्गणी रु. ३ फक्त मनीऑर्डरनें पाठवून आजच वर्गणीदार व्हा.

व्यवस्थापक, "संपदा" पुणें २.



## दि सांगली बँक लि.

( स्थापना १९१६ ) ( शेड्यूल्ड बँक )

[ सांगली येथें हिज हायनेस दि राजासाहेब ऑफ सांगली ह्यांच्या सरकारच्या आश्रयाखालीं निघालेली. भागदारांची जबाबदारी मर्यादित ]

मुख्य कचेरी : सांगली

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | १०,००,००० रु. |
| खपलेलें व वसूल | ४,५०,००० रु. |
| रिझर्व्ह व इतर फंड | ४,९०,००० रु. |
| खेळतें भांडवल | १ कोटी रुपये |

: शाखा :

मुंबई, शहापूर, तेरदळ, शिरहट्टी, मंगळवेढें, कराड, रबकवी, उगार, कवठें, विलिंग्डन कॉलेज, इचलकरंजी.

सर्व तऱ्हेचा बँकिंगचा व्यवहार केला जातो.

*मुख्य कचेरींत सेफ डिपॉझिट व्हॉल्टसची व्यवस्था.*

: बोर्ड ऑफ डायरेक्टर्स :

श्री. आर. व्ही. देशमुख, बी. ए., बी. लिट् ( ऑक्सन ) [ चेअरमन ] कलेक्टर, द. सातारा.

श्री. एन. आर. शहा, श्री. बी. ए. आरवाडे,
श्री. पी. जी. कोठारी, श्री. एम. आर. जाधव,
श्री. टी. एस. आरवाडे,

श्री. एम. के. गुत्ते, एम. ए., सी. ए. आय. आय. बी., मॅनेजर.

# स्थानिक व्यापारी बँका

## सुव्यवस्थित संस्थांचें उज्ज्वल भवितव्य

( गोविंद विठ्ठल सराफ, बी. ए., एलएल्. बी., डायरेक्टर, दि, बेळगांव बँक लिमिटेड )

पुणें येथें नुकत्याच पार पडलेल्या हिंदी बँकांच्या दुसऱ्या संमेलनांतील चर्चेच्या वेळीं संमेलनाध्यक्ष श्री. बी. टी. ठाकूर यांची बँकिंग संबंधींच्या कांहीं प्रचलित प्रश्नांवर मतें विचारण्यांत आलीं. त्यापैकीं एक प्रश्न बँकिंगच्या आंखणींत लहान बँकांना स्थान असावें किंवा नाहीं ? त्या उपयुक्त कार्य करीत आहेत किंवा कसें ? असा विचारण्यांत आला होता. या प्रश्नास त्यांनीं दिलेलें उत्तर फार मार्मिक व या विषयाच्या त्यांच्या खोल अभ्यासास व व्यापक अनुभवास साजेसें असेंच आहे. श्री. ठाकूर प्रश्नास उत्तर देतांना म्हणाले कीं, "हा प्रश्न थोड्या निराळ्या स्वरूपांत विचारला असता तर जास्त बरें झालें असतें. लहान बँका व मोठ्या बँका असा भेद करणें मला इष्ट वाटत नाहीं. त्या ऐवजीं, सुव्यवस्थित बँका व गैरव्यवस्थित बँका असा भेद करणें बँकिंगच्या प्रगतीच्या दृष्टीनें उचित ठरेल. स्थानिक बँका ह्या आकारानें लहान असल्या तरी त्या जेथें व्यवस्थित रीतीनें चालविल्या जातील तेथें त्यांची देशाला उपयुक्तता व जरूरी आहेच. गैर रीतीनें चालविल्या गेलेल्या मोठ्या आकाराच्या कांहीं बँकांनाहि आपला कारभार गुंडाळण्याची पाळी येऊन ठेवीदारांचें व भागीदारांचें मोठ्या प्रमाणांत नुकसान झालेलें आहे."

### स्थानिक बँकांचें महत्त्वाचें प्राथमिक कार्य

श्री. बी. टी. ठाकूर हे आपल्या देशांतील एका बड्या बँकेचे जनरल मॅनेजर असल्यानें, त्यांनीं प्रदर्शित केलेल्या वरील मतास बरेंच महत्त्व प्राप्त होणें साहजिकच आहे. आपल्या येथील बँकांच्या स्थापनेचा व वाढीच्या इतिहास लक्षांत घेतां, स्थानिक बँका त्या त्या ठिकाणच्या स्वाभाविक गरजा भागविण्यासाठींच अस्तित्वांत आल्या असून जनतेच्या विश्वासास पात्र ठरलेल्या व योग्य धोरणानुसार चालविलेल्या पैकीं कांहीं चांगल्याच वाढीस लागल्या आहेत. वास्तविक बड्या बँका या मानानें पूर्वीच्या बँका होत. परंतु त्यांनीं आपला शाखा विस्तार देशांत सर्व लहानमोठ्या ठिकाणीं करण्याचें धोरण अवलंबिल्याचें दिसून येत नाहीं. उद्योगधंद्याची वाढ झालेल्या मोठ्या लोकवस्तीच्या बंदरीं व इतर शहरांतच त्यांनीं आपला विस्तार केल्याचें दिसून येतें. जनतेमध्यें बँकिंगची आवड व प्रचार होण्यासाठी त्यांनीं आपला शाखा–विस्तार इतर ठिकाणींहि व्यापक प्रमाणांत करण्याचा उपक्रम केला असता तर या बँकांच्या वडिलपणामुळें तें योग्यच ठरून, आज कदाचित् इंग्लंडप्रमाणें बड्या बँकांची पद्धतच आमच्या देशांत पूर्णपणें अंमलांत आली असती. परंतु त्यांनीं केवळ जेथें मोठ्या प्रमाणांत ठेवी व व्यवहार मिळूं शकतील अशाच ठिकाणीं शाखा उघडण्याचें धोरण ठेवल्यामुळें इतर ठिकाणच्या गरजू लोकांना स्थानिक बँकांची स्थापना करून बँकिंगची सोय उपलब्ध करून घ्यावी लागली. या परिस्थितींत, अशा ठिकाणच्या बँकिंगचें क्षेत्र निर्माण करण्याचें श्रेय या बँकांचें असतें. मात्र कांहीं ठिकाणीं असा अनुभव येतो कीं अशा रीतीनें स्थानिक बँकांनीं चांगलें क्षेत्र निर्माण केल्यावर बड्या बँका आपली शाखा तेथें उघडतात व तेथील बँकांशीं चढाओढ करूं लागतात. अलिकडे, शास्त्री निवाड्यामध्यें ठिकाणवार पगाराचें स्केल कमी ठरविण्यांत आल्यावर लहान बँकांना यामुळें खर्चाच्या दृष्टीनें सवलत मिळून मोठ्या बँकांना तेथें शाखा उघडणें शक्य होणार नाहीं अशी टीका या बड्या बँकांकडून करण्यांत आलीच. यावरूनच लहान बँकांविषयींचा त्यांचा सापत्नभाव स्पष्ट दिसून येतो. रिझर्व्ह बँकेनें नवीन शाखा उघडण्यास परवानगी देण्याचे अधिकार आपल्याकडे ठेऊन घेतले असले तरी अशा ठिकाणीं बड्या बँकांच्या शाखा उघडूं दिल्यामुळें येथील ठेवींवरील व कर्जांवरील व्याजाचे दरास आळा बसून चांगल्या पद्धतींचें बँकिंग अमलांत येऊं शकेल अशी तिची अपेक्षा असते.

### लहान बँकांचें विशिष्ट कार्यक्षेत्र

या बाबतींत हें लक्षांत आणणें जरूर आहे कीं, व्याजाचे दर हे सर्व ठिकाणीं व सर्व प्रकारच्या व्यवहारांस सारखे असूं शकत नाहींत. त्यामध्यें गरज, सोय व सुरक्षितता या तीन गोष्टींचा प्रामुख्यानें विचार होत असतो. सोयीच्या दृष्टीनें, व्यापारीवर्गास थोड्या जास्त दरानें व्याज खुषीनें देणें परवडतें. तसेंच लहान ठेवीदारांना व्याज थोडें जास्त मिळत असल्यास तेथें जाणें इष्ट वाटतें. मद्रास येथील इंडियन बँक ही हंगामाचे दिवसांत सहा महिने मुदतीच्या लहान लहान ठेवीसुद्धां जास्त व्याजाच्या दरानें आज कित्येक वर्षें स्वीकारीत असते व अशा लहान ठेवीमुळें सुद्धां जरूर त्या रकमा तिला मिळूं शकतात. या बँकेची इतरांपेक्षा थोडें जास्त व्याज देण्याची योजना मध्यमवर्गीयांना फायदेशीर वाटते. तसेंच हंगामाचे दिवसांत कर्जांवरील थोडें जास्त व्याज सहज मिळूं शकतें. इंग्लंडमध्यें गेल्या वर्षांत व्याजाचे दर वाढल्यामुळें येथील परदेशीय बँकांच्या शाखामध्यें जास्त दरानें ठेवी स्वीकारण्यांत आल्याच होत्या. पण याचा अर्थ असा मात्र नव्हे कीं, बँकांनीं आपले व्याजाचे दर कसेहि वाढविणें योग्य आहे. सुव्यवस्थित व सावधगिरीच्या धोरणानें चालविलेल्या बँकांत व्याजाच्या दरांत थोडा फरक स्थानिक परिस्थितीनुसार असणें स्वाभाविक, अतएव क्षम्य आहे एवढेंच येथें सांगण्याचा हेतू आहे. त्याचप्रमाणें, मोठ्या बँकांकडून स्थानिक बँकासारखी कर्जांची सोय सर्व व्यापाऱ्यांची होईल असें म्हणतां येत नाहीं. दक्षिण महाराष्ट्र व कर्नाटकाच्या या प्रदेशांत मुख्यतः व्यापाराचे जिन्नस म्हणजे धान्यें, गूळ, तेल, शेंगा, तूप, कापूस, मिरची व काजू हे होत. यांतील कापूस हा गिरण्या खरेदी करत असल्यामुळें व शेंगा हा केव्हां केव्हां निर्यात होणारा माल असल्यामुळें बड्या बँकांकडून मोठ्या व्यापाऱ्यांची सोय होऊं शकते. तशी सोय स्थानिक बँकाकडूनहि होईलच. परंतु इतर जिनसांचा व यांचाहि व्यापार करणारे सर्वच कांहीं मोठ्या प्रमाणावर उलाढाल करूं शकत नाहींत. त्यांची सोय स्थानिक बँकाच चांगल्या रीतीनें करूं शकतात. बड्या बँकांकडून लहान शहरांत चांगल्या बँकिंगचा प्रसार करणें इष्टच वाटत असल्यास अद्याप आपल्या देशांतील बेचाळीस टक्के शहरांतून म्हणजे पांच हजारावरील लोकवस्ती असलेल्या १,००५ शहरांचे ठिकाणीं बँकिंगची सोय उपलब्ध नसल्याचें दिसून येतें. अशा ठिकाणीं या बँकांना तेथें आपल्या शाखा उघडून नवीन क्षेत्र निर्माण करणेस अद्यापि भरपूर वाव आहे. परंतु आमचा असा अनुभव आहे कीं, मध्यम-

वर्गीय ठेवीदार व व्यापारी यांच्यासाठीं स्थानिक बँका उपयुक्त कार्य करीत असल्यानें देशाच्या आर्थिक व्यवस्थेंत त्यांचें स्थान निश्चित आहे. अनेक बाबतींत स्थानिक बँका आपल्या गिऱ्हाइकांची सोय समाधानकारक रीतीनें करून, फाजील खर्चास आळा घालूं शकतात. बँकिंगचा विस्तार आम-जनतेपर्यंत नेण्याचें कार्य अशा स्थानिक बँकाच करूं शकतील असेंहि निश्चितपणें सांगता येईल. मात्र लेखाचे आरंभींच श्री. ठाकूर यांचे मतांत दर्शविल्याप्रमाणें, त्या सुव्यवस्थित असणें अत्यावश्यक आहे. किंबहुना, स्थानिक बँकांचें अस्तित्व व भवितव्यहि या सुव्यवस्थितपणावरच अवलंबून रहाणार आहे. ज्या ज्यावेळीं स्थानिक बँकांच्या उपयुक्ततेचा पुरस्कार करण्यांत येतो त्यावेळीं अशा सचोटीच्या, सावधगिरीच्या व शास्त्रशुद्ध पण व्यावहारिक पद्धतीनें चालविलेल्या स्थानिक बँकाविषयींच हा पुरस्कार असतो हें समजून घेणें जरूर आहे. कांहीं संस्थांच्या बाबतींत गैरव्यवस्थेचे बरेच प्रकार असल्याचें रिझर्व्ह बँकेस तपासणींमध्यें दिसून आलें आहे. जनतेसहि असे प्रकार दिसून येतात त्यावेळीं तिचा विश्वास; डळमळूं लागून त्या बँकांच्या प्रगतीस खिळ पडते व वेळींच सुधारणा दिसून न आल्यास कारभार गुंडाळण्याची पाळी येते.

## दोष दूर करण्याची आवश्यकता

रिझर्व्ह बँकेकडून नुकत्याच प्रसिद्ध करण्यांत आलेल्या १९५२ च्या "ट्रेंड अँड प्रोग्रेस ऑफ बँकिंग इन् इंडिया" रिपोर्टांत बँकांच्या व्यवस्थेविषयीं कांहीं दोष प्रामुख्यानें दिसून आल्याचें व ते दूर होणें आवश्यक असल्याचें नमूद करण्यांत आलें आहे. हे दोष प्रामुख्यानें बिगर शेड्यूल्ड बँकांच्या तपासणींत दिसून आले आहेत असाहि त्यांत उल्लेख करण्यांत आला आहे. असे दोष म्हणजे:—अनुभवी व लायक नोकरांचा अभाव; हिशोबांचीं पुस्तकें समाधानकारक रीतीनें ठेवलेली नसणें; डायरेक्टर्सनीं बँकेच्या कारभारांत पुरेसें लक्ष न घालणें; हेड ऑफिसची शाखांवर योग्य तपासणी व नियंत्रण नसणें; बँक अस्तित्वांत येऊन बरीच वर्षें झाली तरी पुरेसा रिझर्व्ह फंड नसणें; डिव्हिडंड तसेंच ठेवींचे दर अयोग्य रीतीनें वाढविणें; कर्जरोख्यांबाबतचा घसारा योग्यपणें काढलेला नसणें; तसेंच त्यांवर कर्जें घेऊन त्यांतील गुंतवणूक बरीच कमी करणें; कर्जांचे प्रमाण बेसुमार वाढविणें; तसेंच अंगावरील कर्जें किंवा स्थावर गहाणावरील कर्जें जास्त प्रमाणांत देणें; डायरेक्टर्संना, त्यांच्या नातेवाईकांना, इष्टमित्रांना किंवा त्यांचे हितसंबंध असलेल्या संस्थांना मोठीं कर्जें देऊन ठेवणें; अंगावर कर्जें देणाऱ्यांच्या पतीच्या पूर्व चौकशीचा अभाव; तारण मालाबाबत आगीचा विमा घेतलेला नसणें; इत्यादि.

रिझर्व बँकेकडून तपासणी झाल्यावर त्या त्या बँकांनीं हे दोष लवकर शक्यतो दूर करावे म्हणून सूचना देऊन त्यांचेकडून मुदतशीर प्रगतीचे अहवालहि मागविण्यांत येत असतात. रिझर्व बँक या बाबतींत अत्यंत दक्ष असून बँकांनीं जर या बाबतींत योग्य तें सहकार्य पुष्कळशी संधी देऊनहि दाखविलें नाहीं तर, कलकत्ता नॅशनल बँकेच्या बाबतींत लायसेन्स नाकारण्याचा उपाय अवलंबिल्याप्रमाणें, अशा दुसऱ्याहि दोषास्पद बँकांवर इलाज केल्याशिवाय राहणार नाहीं हें निश्चित आहे. स्पृहणीय पद्धतीचें बँकिंग देशांत वाढीस लावण्यासाठीं रिझर्व बँकेनें कंबर कसलेली आहे हें लक्षांत घेऊन, ज्या स्थानिक बँका आपला कारभार व्यवस्थितपणें व निर्दोष रीतीनें चालवूं लागतील त्यांचें स्थान अढळ आहे, असें म्हणण्यास कांहींच हरकत वाटत नाहीं.



भारतीय महिला
सौन्दर्यप्रसाधनांत
केशसंवर्धनाला
विशेष प्राधान्य
देतात.

सांडू ब्राह्मी तेलाचा नियमित उपयोग केल्यानें स्त्रियांचे केंस लांब–सडक, विपूल व काळेभोर होतात. तसेंच केंस गळणें व पिकणें, डोकें दुखणें, डोळ्यांची आग, निद्रानाश अपस्मार, फेंपरें वगैरे मेंदूचे विकार नाहिंसे होतात.
सांडू ब्राह्मी तेलाचा वास व रंग नैसर्गिक असून त्यांत रंग अगर इतर सुवासिक द्रव्यें मिसळलेली नाहींत.

सौन्दर्य प्रसाधना करितां
सांडू ओरिजिनल ब्राह्मी तेल
द. कृ. सांडू ब्रदर्स चेंबूर लि.
फॅक्टरी व हेड ऑफिस : चेंबूर (मुंबई)

पिआंबा
हापूस आंब्याच्या रसाचें
सुमधुर राष्ट्रीय पेय


फोना प्रॉडक्टस् मुंबई ४.
सोल डिस्ट्रिब्युटर्स
धूतपापेश्वर सेल्स कार्पोरेशन लि. मुंबई ४

# प्रायोगिक बँकेची योजना

## बँकांतील नोकरवर्ग व नागरिक ह्यांच्या शिक्षणाचा अभिनव उपक्रम

( बी. आर. केंभावी, बी. ए. ऑनर्स )

बोलायला सोपी गोष्ट, कल्पना करायला त्याहूनही सोपी असलेली " प्रायोगिक " ( "डमी" ) बँकेची योजना प्रत्यक्ष अस्तित्वांत येऊं पहात आहे, ही अभिमानाची बाब मी समजतो. ही योजना अनेक तज्ज्ञ मंडळींशीं विचारविनिमय करून विस्तृत वाचकवर्गासमोर मांडण्याचें मी धाडस करीत आहे. अखंड भारतांत पुण्यासारख्या विद्वत्ताप्रचुर वातावरणांत उद्भवलेली ही कल्पना येथेंच उगम पावते याहून उमेदीची गोष्ट कोणती ?


### समस्या

आतां ही कल्पना कशी आली व कां आली याचा थोडा ऊहापोह करणें आवश्यक वाटतें. गेल्या कांहीं दिवसांत मला असें कळलें कीं व्यापारी शिक्षण घेणाऱ्या आपल्या तरुण मंडळींत बँकिंगबद्दल अनास्था निर्माण झाली आहे. त्याचीं कारणें अशीं असूं शकतील कीं बँकांत अलीकडे नोकऱ्या मिळत नाहींत, धंदा मंदावत चालला आहे आणि बँकिंगचा विस्तार जवळ जवळ स्थगित झाला आहे. भारत एवढा मोठा प्रदेश, त्यांत बँका मोजक्या आणि त्याही विशिष्ट शहरांतच एकत्रित झालेल्या. सहकारी बँका मात्र हळूहळू अंतस्थ भागांत शिरत चाललेल्या दिसून येतात, पण त्याही अगदीं बेताबेतानें. म्हणजे, एकीकडे बँकिंगची आवश्यकता असून वाढ होत नाहीं व दुसरीकडे बँकिंग शिक्षण घेऊन तयार असलेल्यांना काम मिळत नाहीं. या दुहेरी पेचांतून आपल्या तरुण मंडळींची सुटका झाली पाहिजे. त्यांना केवळ पुस्तकी ज्ञानापलीकडे प्रत्यक्ष अनुभव देऊन मदत करणारी एका स्वतंत्र संस्थेची जरूरी आज फार आहे. विद्यालयांतून बाहेर आलेल्या पदवीधरांनीं नोकरीची मागणी केली कीं त्यांना एकच उत्तर मिळतें—' जागा नाहीं. ' त्या उलट बँकांकडे विचारणा केली कीं असें सांगण्यांत येतें कीं आम्हांस धंदा वाढवावयाचा आहे, पण अनुभविक नोकर पुरेसे मिळत नाहींत. काय गुंतागुंतीची स्थिति ही ! समजा, आपल्या प्रायोगिक बँकेंतून अनुभविक तरुण तयार झाले तर तदनुसार बँकिंगची वाढ या भागांत पुरेशी होत जाईल का नाहीं ही शंका आल्यावांचून राहात नाहीं. पण, केवळ शंकांचाच विचार करीत बसलों तर प्रगति अजिबात थांबेल. म्हणून तरुणवर्गाला तयार करण्याची जबाबदारी व बँकांना अनुभव घेतलेला नोकरवर्ग पुरविण्याची तयारी आपली प्रायोगिक बँक करूं शकेल तर मी म्हणतों पुष्कळ साधलें.

आतां ही कल्पना जरा विस्तृत करूं म्हणजे त्यांतील अनेक भाग समजून घेण्यास मदत होईल.

### प्रायोगिक बँक व नोकरवर्ग

यांत एक अंग म्हणजे प्रत्यक्ष काम करीत असलेली मंडळी व दुसरा भाग काम लगोलग हातीं घेण्यास तयार होऊं पहाणारी मंडळी. आपण आतां एकेक भागाचा विचार करूं. प्रथम कामावर असलेल्या मंडळींचा प्रश्न. कित्येक मोठ्या संस्थांत आपण पहातों कीं तीच ती मंडळी अनेक वर्षें एकाच कामांत गुंतलेलीं दिसून येतात. जणूं काय ते दुसऱ्या कामास नालायकच आहेत ! त्यांच्या पुढें जाण्याची आकांक्षा बाळगणारे आपल्या अंगांतील कसब पटवूं पाहाणारे अनेक लोक असतात, पण त्यांना अवसर मिळत नाहीं. खतावणींत मुरलेला नोकर तेथेंच राहिला तर बरा, कारण तो चुका करणार नाहीं, कामाबद्दल चिंता राहणार नाही, अशी बँक अधिकाऱ्यांची दृष्टि. नेहमी नोकरांना इकडून तिकडे हलविण्यानें कामांत शिथिलपणा येईल कीं काय म्हणून त्यांना धास्ती वाटते. त्याचा परिणाम असा होतो कीं, कित्येक हुषार मंडळींना पुरेसा वाव मिळत नाहीं आणि याहून दुर्दैवाची घटना म्हणजे निराळ्या शाखेंत नवीन घेतला जाणारा इसम सहजासहजीं वर उचलला जातो. कारण, त्यास ओघानेंच विविध कामें करावीं लागतात आणि त्याची उपयुक्तता एकाच कामावर चिकटून राहिलेल्या इसमापेक्षा अधिक महत्त्वाची भासूं लागते. तेव्हां हा जो अन्याय एका व्यक्तीस न कळत होतो तोच प्रत्येक नोकरास चौफेर कामाची संपूर्ण माहिती असल्यास बाहेरून अचानक कोणी येणार नाहीं व त्यामुळें अन्याय पण कोणास होणार नाहीं. प्रत्येक व्यक्तीस स्वतःची कुवत दाखविण्यास भरपूर वाव मिळेल आणि जो तो स्वतःच्या हिंमतीवर वरच्या जागेपर्यंत जाऊं शकतो. ही झाली परिस्थिति चालूं नोकरवर्गाची.




बँकांच्या दृष्टीनें देखील एक महत्त्वाची बाब आहे, ती अशी कीं जर सर्व नोकरवर्गास एकाच हिशेबानें पगार द्यावा लागणार तर सर्वांना पद्धतशीरपणें तयार करून घेऊन बँकांना पगाराचा भरपूर मोबदला कां न मिळावा ?

जरूर असल्यावेळीं आम्हांस तयार असलेली तरुण मंडळी मिळत नाहींत या प्रश्नास तोड एकच. नोकरीशोधार्थ जी तरुण पिढी आज हिंडत आहे, ती जर कांहीं काळ आपल्या प्रायोगिक बँकेंत काम करून बाहेर पडली तर त्यांना दीर्घ काळ

## दि पेण को-ऑपरेटिव्ह अर्बन

स्थापना ] बँक लि. [ सन १९३५

**पेण, जि. कुलाबा**

आमचेकडे सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.
"पोस्ट ऑफिस नॅशनल सेव्हिंग सर्टिफिकेटस्" करतां सरकारतर्फे या बँकेला अधिकृत एजंट म्हणून नेमलें आहे; त्याचा सर्वांनीं फायदा घ्यावा.

रा. गो. भावे, बी. एजी. — मॅनेजिंग डायरेक्टर.
ना. य. नेने — चेअरमन

## दि इसलामपूर अर्बन को. बँक लि.

इसलामपूर (जि. दक्षिण सातारा.)

स्थापना १९३५

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५०,००० |
| वसूल भांडवल | रु. २५,१०० |
| खेळतें भांडवल | रु. १,४२,५८२ |

बँकिंगचे व्यवहार केले जातात.

मॅनेजर. — के. जी. बोरकर
चेअरमन — जी. एल फडणीस बी. ए., एलएल. बी.,

## दिवाळीच्या मंगलसमयीं मंगलवार्ता !!!

गेल्या एक तपाच्या कालांत मोटार-विमा क्षेत्रांत सर्वतोमुखीं झालेली विमेदारांच्या मालकीची भारतांतील पहिलीच मोटार विमा कंपनी

दि

## मोटार ओनर्स म्युच्यूअल इन्शुअरन्स कंपनी लि.

**बेळगांव**

लौकरच आयुर्विमा क्षेत्रांत पदार्पण करणार !!!
आमच्या विमेदारांस प्रतिनिधींस आणि हितचिंतकांस ही दिवाळी सुखाची जावो !!!
—सर्वत्र प्रतिनिधी नेमणें आहेत.—

## कॉमनवेल्थ अॅशुअरन्स कंपनी लिमिटेड

हेड ऑफिसः—लक्ष्मी रोड, पुणें

**हें नूतनवर्ष व दीपावलि**

आमचे असंख्य विमेदार, भागीदार, एजंटस् व हितचिंतक यांना सुखाची जावो !!

## कॉ म न वे ल्थ

पॉलिसी घेऊन दीपावलीच्या आनंदांत भर टाका.
आयुष्य ★ आग ★ मोटारअपघात, इत्यादि सर्व प्रकारचे विमे स्वीकारले जातात.
माहिती मागवा अगर समक्ष भेटा.

श्री. म. जोशी
मॅनेजिंग डायरेक्टर

## दक्षिण सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., सांगली.

फोन नं. ३० पोष्ट बॉक्स नं. १३ (स्थापना १९२७) तारेचा पत्ता—रयतबँक

| | | | |
|---|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. १०,००,००० | गंगाजळी आणि इतर फंडस् | रु. १,७१,३०० |
| भरलेलें भांडवल | रु. २,७५,४५० | एकूण खेळतें भांडवल | रु. २४,४७,६०० |

हेड ऑफिसः—हायस्कूल रोड, सांगली. शाखा: १ जत, २ मिरज, ३ तासगांव

१ या बँकेंत चालू, सेव्हिंग्ज व कायम मुदतीच्या ठेवी स्वीकारल्या जातात.
२ शेतकी सोसायट्यांना माफक व्याजाचे दरानें कर्ज देण्यांत येतें.
३ सोनें, चांदी व शेतकी मालतारणावर कर्ज देण्यांत येतें.
४ इतर सर्व प्रकारच्या बँकिंगचा व्यवहार केला जातो.

— अधिक माहिती समक्ष अगर पत्रद्वारें —

*सरकारनियुक्त डायरेक्टर्स बोर्ड.*

१ श्री. आर. बी. आरवाडे B. A. LL. B. सांगली (चेअरमन)
२ श्री. व्ही. पी. पोवार, B.A.LL.B, M.P. मिरज (व्हा. चेअरमन)
३ श्री. एम्. एच. गोडबोले B. A. LL. B., M.L.C. सांगली.
४ श्री. के. ए. चौगुले B. A., LL. B. सांगली.
५ श्री. बी. ए. दप्तरदार B. A. सांगली.
६ श्री. हिंदुराव एम्. पाटील, सांगली.
७ श्री. सुबराव ए. पाटील, सांगली.
८ श्री. जे. व्ही. करमरकर सराफ, सांगली.
९ श्री. ए. एन्. खानविलकर, जत.
१० श्री. जी. के. मोगली, B. A. जत.
११ श्री. विठ्ठलराव बी. देशमुख, माहुली, ता. खानापूर.
१२ श्री. डी. बी. सूर्यवंशी, M.L.A. अंकलखोप ता. तासगांव.
१३ श्री. हंसाजीराव बी. पाटील, पेठ, ता. वाळवे.
१४ श्री. एम्. व्ही. चरणकर, बिळाशी, शिराळामहाल.
१५ मे. असि. रजिस्ट्रार को. सो. सांगली.

श्री. एस. पी. सुर्वे बी. ए. मॅनेजर (on Lent Services from B. S. Co-op. Bank Ltd, Bombay)

वणवण हिंडावें लागणार नाही, असा आम्हांस विश्वास वाटतो. ट्रेनिंग घेतलेला इसम कोणास नको आहे ? या ना त्या संस्थेत त्यास काम मिळाल्याशिवाय राहणार नाहीं. भरपूर वेळ कसून काम शिकून तयार झालेली मंडळी मिळूं शकतात अशी बँकांना एकदा जाणीव झाली, कीं त्यांना उदासीनता बाजूस सारून अधिकाधिक वाढ हातीं घेण्यास मोका मिळेल. दुसरा फायदा म्हणजे नवीन लागणारा इसम पडेल तें काम करूं शकणारा असतो, ही मोठी समाधानाची गोष्ट असते. कारण, त्या इसमास काम व्यवस्थितपणें करण्याची तालीम मिळालेली असते. शिरकाव झाल्यानंतर तो झपाट्यानें कामांत समरस होऊन जातो. नाहीं तर त्याला जुन्या नोकराकडून काम शिकून घ्यावें लागतें, सराव होईपर्यंत चुका होतात, वगैरे.

या दुहेरी फायद्यांचा खोलवर विचार केल्यास बँकिंगचा विस्तार होण्यास फार फार मोठी मदत होईल यांत शंका नाहीं. लायक नोकरास एका जागेवरून दुसरीकडे हलविण्यांत येईल, नवीन इसमांस मोका मिळेल, बँकांना वाव असेल तेथें नवीन कचेऱ्या उभारण्यास, किंवा नवीन छोट्या बँका स्थापण्यास केवढा मोठा रस्ता मोकळा होईल याची कल्पना वाचकवर्गाला सहज येईल.

### मंदीस तोंड देण्यास साहाय्य

याहून थोड्या विस्तारानें विचार केल्यास एक गोष्ट डाळ्यांत भरण्यासारखी आहे. ती म्हणजे व्यापारी बकांची सद्यःस्थिति व पुढें येऊं घातलेली स्थिति. सद्यःस्थितींत जी मंदा आला आहे त्यामुळें बँकांचा फायदा सालोसाल कमी होत जाणार आणि बँकांतील ठेवी पण हळूहळू बसरत जाणार कीं काय अशा धास्ती वाटते. या कारणास्तव कांहीं बँकांना नुकसानींत चाललेल्या कचेऱ्या बंद कराव्या लागणार अशी चिन्हें दिसूं लागलीं आहेत. जसें एकेकाळीं भरमसाट आशेनें बँकांनीं कचेऱ्या सुरू केल्या त्या उलट आज त्याच आवेशानें जर जरूर नसलेल्या कचेऱ्या बंद केल्या तरच कांहीं निभावण्यासारखें आहे. पण नुसत्या कचेऱ्या बंद केल्यानें भागत नाही. त्याला जोडून नवीन प्रदेशांत शिरण्यांतच शहाणपणा आहे, असें कांहींना वाटल्यावांचून रहात नाहीं. उदाहरणार्थ, पंचवार्षिक योजनेप्रमाणें ज्या अलोट रकमा आज ग्रामीण भागांत खर्ची पडतात त्या बँकांकडे परत ओढवून आणणें ही पण सुप्त जबाबदारी बँकांवर येऊन पडतेच. एखादा भाग सव दृष्टीनें समृद्ध झाल्यास बँका तेथें जातातच. पण दूरवर दृष्टि ठेवून आतांपासूनच तयारी केल्यास राष्ट्रहितास हात दिल्याच श्रेय मिळेल. करितां चालू मंदीस तोंड देण्याचा राजमार्ग म्हणजे नुकसानींत असलेल्या कचेऱ्या खुशाल बंद करणें व उगवूं पाहणाऱ्या प्रदेशांकडे पाय हलविणें. या साऱ्या हालचालींत अनुभविक तरुणवर्गाचा फार मोठा हिस्सा आहे हें डोळ्याआड करून चालणार नाहीं आणि ओघानेंच या उपक्रमांत आपल्या प्रायोगिक बँकेची आवश्यकता पण किती निकडीची आहे हें पण कळेल.

### प्रायोगिक बँकेचें स्वरूप

आतां या बँकेची घडण काय, तिच्या योजना कोणत्या, व्यवहार कसल्या प्रकारचे, तिचा विस्तार केवढा, कामाची दिशा कोणती, वगैरे गोष्टींचा थोडक्यांत विचार करूं. ही कल्पना मुळांतच शंभर टक्के स्वदेशी आहे. दुसरे ग्रंथ वाचून इतर देशांत प्रचलित असलेल्या उपक्रमाची केवळ दुसरी प्रत असें कोणी समजूं नये. म्हणून, उपक्रमास एकदां प्रारंभ केल्यानंतर त्यांत कदाचित् भर घालावी लागेल, अतिरेक झाल्यास कापाकापी करावी लागेल; तरी पण सुरुवात शास्त्रशुद्ध व तर्कशुद्ध असणें जरूर आहे. कारण, बँकेचा पसारा पुढील परिस्थितीस धरून किती मोठा करावा लागेल याचा अंदाज सुरुवातीसच करणें फार अवघड काम आहे. फक्त स्थूलमानानेंच आज या योजनेचा विचार करावा लागणार.

बँकेची घडण

| १. | २. | ३. |
|---|---|---|
| इतर बँकांतील चालू नोकरवर्ग विभाग | होतकरू नोकरवर्ग विभाग | नागरिक विभाग |

संपूर्ण चित्र रेखाटण्यापूर्वी एक बाब ध्यानांत ठेवावी कीं या बँकेत खातेदारवजा खातीं चालू राहतील. प्रत्यक्ष व्यवहारवजा व्यवहाराचा रोजचा जमाखर्च केला जाईल, रोकडवजा रोखी व्यवहार मांडण्यांत येईल. मग खातीं कशी निर्माण होणार, व्यवहार कोणत्या मार्गानें उद्भवणार, हा प्रश्न शिल्लक राहतो. याला उत्तर एवढेंच कीं, ही मांडणी जरी वरवर दिसायला केवळ काल्पनिक असली तरी त्यांत प्रत्यक्ष झालेल्या किंवा होत असलेल्या व्यवहारांच्या टांचण्यांचा समावेश केला जाईल. यांत तज्ज्ञांचा व बँक संचालकांचा वेळोवेळीं सल्ला व मदत घेतली जाईल. खात्यांचा उगम कोठून होणार याचा विचार चालू आहे आणि सर्व कांहीं आटोपशीरपणें व शास्त्रशुद्ध पद्धतीनें केलें जाईल, एवढेंच या क्षणीं सांगतां येईल. भरमसाट किंवा अवास्तव गोष्टी येऊं न देण्याची कोशीस करूं आणि या बाबतींत योग्य ती खबरदारी पण घेऊं, इतकें आश्वासन दिल्यास पुरें होईल असें वाटतें.

आतां वरील तिन्हींपैकीं एकेका विभागाचें थोडक्यांत विवेचन करूं.

### १. चालू नोकरवर्ग-विभाग

एकेक बँक फक्त एकेक इसमासच एकावेळीं शिक्षण घेण्यास पाठवूं शकेल असें समजल्यास, त्या त्या व्यक्तीस निरनिराळ्या विभागांतून निघणारीं कामें दिलीं जातील. एका शाखेंतच काम करीत राहिलेल्या व्यक्तीस इतर विभागांतली माहिती प्रत्यक्ष काम करून मिळवितां येईल. तीन-चार महिन्यांपर्यंत त्यानें अविरत श्रम केले आणि मन लावून सर्व अनुभव मिळविला तर त्याचा पूर्ण मोबदला पदरांत पडल्याशिवाय राहणार नाहीं. उदाहरणार्थ, जी व्यक्ति सुरुवातीपासून केवळ नोटा मोजण्यांतच गुंतलेली असेल तीस खतावणी ठेवणें, बिलें वसूल करणें, बाजारमाहिती मिळविणें ते थेट बोर्ड-चिटणिसाचीं कामें करण्यापर्यंत सर्व विभागांतून क्रमाक्रमानें तयार करून पाठविली जाईल.

एका जबाबदार व्यक्तीकडून मीं असें ऐकिलें कीं, अलीकडे बँकांत एका विभागांत काम करीत असलेला इसम दुसरीकडे काय काम केलें जात आहे हें नुसतें पाहाण्याचीहि कदर बाळगीत नाहीं. तेव्हां या नवीन संस्थेंत शिक्षण घेण्यास कितींची तयारी असेल याबद्दल कांहींना शंका वाटते. ही शंका खोटी ठरो व अनेक तरुण मंडळी हिरिरीनें पुढें येवोत, एवढीच तूर्त मागणी करूं. हा प्रश्न प्रत्येक व्यक्तीच्या हिताचा असतांना आणि बँकांत जीवनक्रम सुसाध्य करणारा असतांना तरुण मंडळी मुद्दाम असल्या संधीची उपेक्षा करतील असें कोणी समजूं नये. उलट, एका बँकेचे अधिकारी म्हणाले कीं, ही संस्था निघाल्यानंतर आम्हीं प्रत्येक नोकरास हें शिक्षण घेण्यास भाग पाडूं. एकूण, एकीकडे निराशा व्यक्त केली जाते, तर दुसरीकडे सबळ आशा वाटते; मग आशेवर भार कां टाकूं नये ?

### १ होतकरू नोकरवर्ग

पुण्यांत बृहन्महाराष्ट्र व्यापारी कॉलेज, डेक्कन इन्स्टिट्यूट ऑफ कॉमर्स आणि को–ऑपरेटिव्ह ट्रेनिंग कॉलेज या संस्थांतून व इतर खासगी शिक्षणकेंद्रांतून अनेक विद्यार्थी शिक्षण संपवून बाहेर येतात. त्यांना सर्वांना व्याख्यानद्वारां सर्व आवश्यक गोष्टी समजावून देण्यांत येत असल्या तरी प्रत्यक्ष व्यवहारांत तें ज्ञान अर्धवट समजलें जातें. ज्ञान संपादणें ही एक बाजू. त्या ज्ञानाचा प्राप्त परिस्थितीस अनुसरून वापर करणें ही दुसरी बाजू. वापर करण्याची हातोटी साधण्यास सरावाची आवश्यकता फार भासते. ज्ञान व अनुभव दोन्हीं मिळवून बाहेर पडल्यास काम मिळविण्यास विशेष अडचण पडूं नये. विचार केल्यास, आपली प्रायोगिक बँक पूर्ण शिक्षणक्रमाची दुसरी बाजू संभाळील अशी उमेद बाळगण्यास हरकत नाहीं.

मी ज्या वेळेस एका प्रमुख शिक्षणाधिकाऱ्याबरोबर या योजनेबाबतींत थोडा वेळ बोललों व योजनेची रूपरेषा समजावून देण्याचा प्रयत्न केला, तेव्हां त्यांनां खरोखर फार आनंद झाला व त्यांनीं मला आश्वासन दिलें कीं ही बँक सुरू करण्यास जी मदत लागेल ती आपण देण्याची कोशीस करूं. यावरून विद्यालयांतून शिक्षण घेतलेल्या तरुण मंडळीनें खात्री बाळगावी कीं प्रायोगिक बँक अस्तित्वांत येऊन त्यांतून तयारी झालेली तरुण मंडळी बाहेर पडूं लागली कीं, हल्लींच्या परिस्थितींत फरक पडत चाललेला प्रत्यक्ष दिसून येईल. होणारा फरक कोणत्या प्रकारांचा व त्या योगें होतकरू तरुणांना उपलब्ध होणारा फायदा कोणता, याचें नक्की मोजमाप या क्षणीं अजमावतां येणें शक्य नसलें, तरी एवढें मात्र खास सांगतां येईल की छोट्या बँकांना आपापल्या ऐपतीनुसार जवळपास अंतस्थ भागांत कचेऱ्या स्थापून बँकिंगचा विस्तार करतां येईल. कारण, काम करूं शकणारी नवीन मंडळी मिळत जातील. मोठ्या बँकांना नवीन नवीन कामें हातीं घेतां येतील व उत्साहानें व नेटानें आर्थिक उन्नतीच्या योजनांना भरपूर हात लावतां येईल; निदान, योग्य माणसें मिळत नाहींत म्हणून कांहीं करतां येत नाहीं ही तक्रार तरी बंद होईल. प्रामुख्यानें दिसून येणारा फरक असा कीं शिक्षण आणि अनुभव घेऊन तरुणवर्ग घडूं लागला कीं लगेच बँकांना डोकावून पाहणाऱ्या परिस्थितीस तोंड दिल्याशिवाय उपाय राहणार नाहीं.

### २. नागरिक विभाग

शेवटीं, आम्हीं योजिलेल्या नागरिक विभागाकडे वळूं. हा भाग माझ्या मतें फार महत्त्वाचा वाटतो. नागरिकवर्गास कोणत्याही चालू बँकेंत शिक्षण म्हणून मिळत नाही. उलट, नित्य व्यवहारांत नागरिकांकडून थोडेंफार इकडे तिकडे झाल्यास दमदाटी, अगर चार-दोन कडू शब्द ऐकून घेण्याचा प्रसंग मात्र त्यांचेवर वारंवार येतो. नेहमींचा अनुभव असा आहे कीं, त्याच त्या अडचणी पावलोपावलीं बँक अधिकाऱ्यांकडे नेल्यास त्यांना पण कंटाळा वाटतो आणि सहजच ते तात्पुरतें कांहींतरी सांगून खातेदारांना निरोप देतात. अधिकाऱ्यांची अशी अपेक्षा असते कीं जुन्या खातेदारांना आपापल्या व्यवहारापुरते तरी बँकिंग नियम व रूढी कळावयास पाहिजेत. हें जरी मान्य असलें तरी बँकेनें नागरिकांना मार्गदर्शन करण्यास किंवा ज्ञान देण्यास विशेष श्रम घेतले नाहींत व घेत नाहीं असें म्हणावें लागतें. इंग्लंडमध्यें प्रमुख बँका नागरिकांचे माहितीकरितां सोप्या भाषेंत लिहिलेले छोटे छोटे ग्रंथ विनामूल्य ग्राहकांना नेण्याकरितां क्रमाक्रमानें ठेवतात. आळीपाळीनें बँकिंगची अनेक अंगें नागरिकांना समजावून घेतां येतात. याचा असा परिणाम झालेला दिसून येतो कीं, तेथील नागरिक आपले व्यवहार अत्यंत आटोपशीरपणें आवरतात. बँकांत गर्दी झालेली दिसून येत नाहीं. अमुक दिवशीं अमुक खातेदार अमुक कामाकरितां बँकेंत येणार याची निश्चिति जवळ जवळ ठरलेली असते. नागरिकांना बँक अधिकाऱ्यांच्या वेळीं-अवेळीं प्रत्यक्ष गांठीभेटी घ्याव्या लागत नाहींत. असा एकही प्रकार किंवा प्रयत्न आपल्याकडे झालेला दिसून येत नाहीं.

प्रायोगिक बँकेंतून या कार्याचा प्रारंभ होईल. हें काम सुकर होण्याकरितां नागरिकांना प्रत्यक्ष आंत शिरून बँकेंत काय कामें व तीं कशी केलीं जातात हें डोळ्यानें पहातां येईल आणि समजावून घेतां येईल. या पद्धतीनें बँकिंग व्यवसायाचा, व्यवहाराचा, रूढींचा, नियमांचा अभ्यास करण्यास खातेदारांना मोका मिळेल व तदनुसार आपापले बँकिंग व्यवहार जुळवून घेतले तर बँक आणि खातेदार यांचा संबंध व्यवस्थित होईल. आमचा हा उद्योग प्रचारात्मक नसून नागरिक आणि बँका यांचा संबंध अधिकाधिक वाढत जावा असा त्यांत हेतु आहे.

शिवाय, जर कांहीं खातेदारांना त्यांचे स्वतःचे बँकेमार्फत आवश्यक सवलती मिळत नसतील तर त्या योग्य असल्यास मिळवून देऊं; योग्य नसल्यास त्या कां योग्य नाहींत हें प्रत्यक्ष समजावून देऊं. मात्र नागरिकांनीं नवीन नवीन प्रश्न आम्हांपुढें वारंवार आणावेत. म्हणजे, आम्ही एकमेकांच्या सहकार्यानें व सर्वांच्या हिताकरितां हळूहळू नित्य व्यवहारांतल्या अडचणी दूर करूं शकूं. जर आपली बँक प्रायोगिक अशी आहे, तर हीं सर्व कामें कशी केलीं जातील अशी शंका कांहींना वाटेल. बँकेच्या अधिकारी बोर्डांत नित्य व्यवसायांतील मंडळी राहतील. त्या मंडळांत प्रत्येक प्रश्नाचा साधकबाधक विचारविनिमय केला जाईल. अशा चर्चेतून ग्राह्य ठरलेला मुद्दा इतर कोणत्याही बँकेस पण ग्राह्य ठरेल असा विश्वास वाटतो. म्हणून नागरिकांनीं आम्हांस विचार करण्याकरितां हरएक समस्या आम्हांपुढें मांडाव्यात.

या बाबतींत पुणें बँकिंग असोसिएशननें व्याख्यानद्वारां, प्रदर्शनद्वारां, आपला भार उचललेला आहेच; आम्हीं आतां त्यांचे सहकार्यानें जास्त कार्य करूं पहातों, एवढेंच.

एवंच, बँकिंग धंद्यांत आज भासणाऱ्या अनेक उणिवा आपली बँक भरून काढील. चालू नोकरवर्गाला सर्व विभागांची माहिती मिळूं शकेल, होतकरू तरुण मंडळींना बँकिंग व्यवसायांत तयार करून मार्गदर्शन केलें जाईल, नागरिकांना या धंद्यांतील संबंधित अडचणी सोडवून घेतां येतील. या सर्व खटाटोपांतून बँकांचे पण अनेक प्रश्न आपोआप सुटले जातील आणि शक्य होत गेल्यास त्यांत एकसूत्रीपणा आणतां येईल. अशा एक ना शेकडों परीनें आपली बँक समाजाची सेवा करूं पाहते. शेवटीं ही संस्था रजिस्टर करावी लागेल काय, तिचें प्रातिनिधिक स्वरूप कोणत्या प्रकाराचें असावें, तिची आर्थिक घडी कशी बसवावी, या गोष्टींचा विचारविनिमय चालूं असून प्रस्तुत स्थूल मांडणीच्या दृष्टीनें त्याची चर्चा आज अनावश्यक वाटल्यानें तो भाग वगळलेला आहे, एवढा खुलासा करून लांबत चाललेला हा वृत्तांत पुरा करतो.

रिझर्व्ह बँक ऑफ इंडियानें बँकांतील वरिष्ठ अधिकाऱ्यांना तयार करण्याचें हेतूनें ट्रेनिंग सेंटर काढण्याचें जाहीर केलें आहे. पण खालील नोकरवर्ग जर बँकांचा मूळ पाया आहे, तर त्याला तयार करण्याकरितां आपल्या प्रायोगिक बँकेमार्फत भरीव प्रात्यक्षिक शिक्षण देतां आलें तर अंशतः तरी दोन्ही योजना एकमेकांना पूरक होऊं शकतील असा भरवंसा वाटतो.

# शेतकऱ्यांच्या दीर्घ मुदतीची कर्जांची गरज

## सहकारी भू-तारण संस्थांचे प्रश्न

( मल्लाप्पा सिद्दाप्पा पुट्टाणी, मॅनेजर, सातारा जिल्हा को. लँड मॉर्गेज बँक लि., कराड. )

मद्रासला ता. २८ फेब्रुवारी १९५३ रोजीं मद्रास प्रॉ. सें. को. लँड मॉर्गेज बँकेनें इलाख्यांतील सर्व लँड मॉर्गेज बँकांची कॉन्फरन्स बोलावलेली होती. सदर संमेलनाच्या उद्‍घाटनाकरतां श्री. बी. व्यंकटप्पा, आय्. सी. एस. एक्झिक्युटिव्ह डायरेक्टर, रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, यांना निमंत्रित केलेलें होतें. परिषदेचें उद्‍घाटन करून ते आपल्या विचारपरिप्लुत भाषणांत म्हणाले :-

"पंचवार्षिक योजनेंत शेतीवर विचार करण्यासारखा भर देण्यांत आलेला आहे. शेतीचा जास्तींत जास्त उपयोग होणेस व उत्पादन वाढविणेस दीर्घ मुदतीच्या कर्जाची जरूरी आहे; आणि नेमके याच गोष्टींकडे आमच्या देशांत दुर्लक्ष झालें असून शेतीस लागणाऱ्या कर्जाची हेळसांड झालेली आहे. या बाबतींत सहकारी खात्यांमार्फत थोडाबहुत राज्यांत प्रयत्न केले गेले आहेत. खरें पहातां मद्रास व म्हैसूर येथील को. लँड मॉर्गेज बँकांनीं उल्लेखनीय प्रगती केलेली असून मुंबई, मध्यप्रदेश, त्रावणकोर-कोचीन आणि इतर एक-दोन राज्यांकडून नाहीं म्हणण्यास थोडेबहुत प्रयत्न झालेले आहेत. हिंदुस्थानांतील सर्व लँडमॉर्गेज बँकांचा आढावा घेतल्यास १९५०-५१ सालीं सभासदांकडे येणें असलेली रकम ६२६·४१ लाखांची असून त्यांपैकी ४५२·६३ लाख मद्रासचे आहे; ७६·५९ लाख म्हैसूरचे आहे. बाकीच्या राज्यांत लांब मुदतीचा व्यवहार करणाऱ्या संस्था नाहींतच अगर असल्यास त्या उल्लेखनीय नाहींत."

अशा प्रकारचें त्यांचें उद्‍बोधक भाषण झालेलें आहे. त्याहीपेक्षां आमच्या दृष्टीनें कॉन्फरन्सच्या वेळीं मद्रास प्रॉ. सें. को. लँड मॉर्गेज बँकेचे अध्यक्ष श्री भोगराज व्यंकटरमण यांचें जें भाषण झालेलें आहे तें आम्हांसारख्या या चळवळींत मागें पडलेल्या कार्यकर्त्यांना फारच मार्गदर्शक होईल असे वाटतें. पाहुण्यांचें व आलेल्या सभासदांचें स्वागत करतांना केलेल्या भाषणांत त्यांनीं लँड मॉर्गेज बँकांपुढें येणाऱ्या अनेक प्रश्नांचा गेल्या सुमारें २५ वर्षांच्या अनुभवावरून विचार केला आहे. हे प्रश्न आपलेकडील लँड मॉर्गेज बँकांना १८ वर्षे होऊन गेलीं तरी सुसूत्रपणें सोडविता आलेले नाहींत. लांब मुदतीच्या कर्जाच्या योजनेच्या यशस्वीपणाबद्दल कार्यकर्ते आणि सरकार जेथें साशंक आहेत, तेथें उत्तरादाखल केलेल्या भाषणापेक्षा उपस्थित प्रश्नांचाच खल होणें उचित होईल. म्हणून अध्यक्षांचेंच भाषण त्यांच्याच शब्दांत या दिवाळी भेटीनिमित्त देण्याचें ठरविलें असून त्याचा बराचसा उपयोग होईल अशी उमेद आहे.

श्री. भोगराज व्यंकटरमण म्हणाले:—

"मद्रास प्रॉव्हिंशियल को. सेंट्रल लँड मॉर्गेज बँकेच्या कार्यकारी मंडळाच्या वतीनें आपणा सर्वांचे आभार मानण्यास मजला आनंद वाटत आहे. या प्रसंगीं रिझर्व्ह बँकेचे एक्झिक्युटिव्ह डायरेक्टर श्री. व्यंकटप्पा हे स्वतः आलेले आहेत यावरून शेतीच्या उद्योगांत वाढ व्हावी आणि त्यास भांडवल मिळण्यास सोय व्हावी म्हणून ते किती आस्थापूर्वक प्रयत्न करीत आहेत हें स्पष्ट होतें. अलिकडे ग्रामीण जनतेची उत्पादन शक्ती वाढावी म्हणून पतपेढ्यांना अल्पमुदतीचें कर्ज सवलतीच्या म्हणजेच १½ टक्के दरानें रिझर्व्ह बँकेकडून पुरविलें जातें. इंटरमिजियेट कर्ज देखील शेतकऱ्यांना सवलतीच्या दरानें देतां यावें म्हणून रिझर्व्ह बँक कायद्यांत जरूर ती दुरुस्ती होणार आहे. भू-तारण संस्थांना देखील भांडवलाची कमतरता भासूं नये म्हणून काढण्यांत आलेल्या डिबेंचर्सपैकी २० टक्के डिबेंचर्स स्वतः रिझर्व्ह बँकेकडूनच खरेदिले जातात. इतकेच नव्हे, तर सेंट्रल लँड मॉ. बँकांना जरूर त्या सर्व कामीं त्यांचेकडून योग्य सल्ला दिला जातो. त्यांच्या मार्गदर्शनाची लँड मॉर्गेज बँकांचे कामकाज वाढण्यास बरीच मदत झालेली आहे. आमच्या इलाख्यांतील ग्रामीण जनतेच्या त्यांनीं केलेल्या सेवेबद्दल या प्रसंगीं रिझर्व्ह बँकेचें अंतःकरणपूर्वक आभार मानणेस मला आनंद होत आहे.

"जगांतील सर्वच सुधारलेल्या राष्ट्रांत शेतकऱ्यांच्या लांब मुदतीच्या कर्जाची व्यवस्था ज्या त्या सरकारकडून स्वतःच केली जाते. जेथें सरकार स्वतः या खात्याकडे पहात नाहीं तेथें हें काम ज्या संस्थेकडे सोपविलेलें असतें तिच्यांत प्रामुख्यानें भाग घेऊन अशा संस्थेचे व्यवहार पायाशुद्ध भूमिकेवर चालण्यास सरकारकडून प्रयत्न केले गेले, आतुरतेनें मदत केली गेली, सल्ला, विशेष सवलती इत्यादि सर्व तऱ्हेनें, सहाय्य करण्यांत आलें.

— सुंदर बनारसी पातळें, नवीन जरीचीं लुगडीं —
व
मिलचें कापड
—यांकरितां—
शाहाडे-आठवले लि., दादर
शाहाडे बिल्डिंग; एन्. सी. केळकर रोड, दादर, मुंबई २८
:: टेलिफोन ६०५५४ ::

AN IDEAL URBAN CO-OPERATIVE BANK
IN THE
BOMBAY STATE

THE
# BHUSAWAL PEOPLE'S CO-OPERATIVE BANK LTD.,

*STATION ROAD, BHUSAWAL, E. K.*

PHONE No. 36 ] [ POST BOX No. 3.

***ESTABLISHED 1925.***

**Position as on 30-9-53.**

| | |
|---|---|
| *Capital* | *Rs. 2.00,000/-* |
| *Subscribed* | *Rs. 1,50 000/-* |
| *Paid Up* | *Rs. 1:50,000/-* |
| *Reserve Fund* | *Rs. 1.05.747/-* |
| *Other Reserves* | *Rs. 1,31,581/-* |
| *Deposits ( of all kinds )* | *Rs. 20.58,799/-* |
| *Working Capital.* | *Rs. 26,02,472/-* |

| | |
|---|---|
| Shri Hari Sadashiv Khare, | *Chairman* |
| Shri Ramkrishna Sonji Patil, | *Vice-Chairman.* |
| Shri Dhondu Soma Patil. | *Directors.* |
| Shri Bhimbhai Vasanji Naik. | |
| Shri Sarupchand Hiralal Bamb. | |
| Shri Sadashiv Vithal Vad. | |
| Shri Sadashiv Damodar Naik. | |
| Shri Jinabhai G. Desai. | *Manager.* |
| Shri Ratanji N. Desai. | *Asst. Manager.* |

The Bank accepts Current, Savings and Fixed Deposits from its members as well as non-members at favourable rates of interest. The special feature of the Bank is that it grants rebates to its borrowers. The scheme of thrift known as Members Provident Fund is in force. It allows medical-Aid to its members. It has a Safe Deposit Chambers. It advances to its members on the security of shares, securities, life insurance policies, Agriculture and Industrial goods, Gold and Silver ornaments.

*All kinds of Banking business transacted.*

# श्री वीरशैव
## को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड, कोल्हापूर

हेड ऑ. कोल्हापूर] स्थापना १९४२ [शाखा गडहिंग्लज

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. १,२५,००० |
| खपलेलें भांडवल | रु. १,०८,७४० |
| वसूल भांडवल | रु. ५४,३७० |
| रिझर्व्ह व इतर फंडस् | रु. ३०,१०५ |
| खेळतें भांडवल | रु. ५ लाखांचे वर |

★ संचालक मंडळ ★

मे. रावसाहेब डी. बी. माळी ( प्रेसिडेंट )
मे. एम. बी. चौगुले ( व्हा. प्रे. ), मे. एस. व्ही. नष्टे,
मे. आर. टी. गाडवे, मे. सी. जी. हंशेट्टी,
मे. आर. एन. मगदुम, मे. एस. एन. मिश्रकोटी,
मे व्ही. एस. डोईजड, मे. एस. के. पट्टणशेट्टी,
मे. जी. व्ही. वाली, मे. सी. एन. आजरी
( ब्रँच चेअरमन )

ॲक्टिंग मॅनेजरः—श्री. एम्. जी. जोटकर

व्याजाचे दरः—१ ते ४ टक्के

समाजाची शैक्षणिक, धार्मिक व सांस्कृतिक क्षेत्रांत सर्वांगीण उन्नति व अत्युत्कृष्ट आधुनिक सर्व प्रकारची बँकिंगची सेवा करण्यास बँक सुसज्ज आहे.

# धी कल्याण पीपल्स
## को-ऑपरेटिव्ह बँक लि.

पो. बॉ. नं. ११ ] कल्याण [ टे नं. ५५

स्थापना ४ जून १९२३

| | |
|---|---|
| आधिकृत व विक्रीस काढलेलें भांडवल | रु. ५,००,००० |
| भरलेलें भांडवल | रु. ३,१०,६४० |
| खेळतें भांडवल | रु. २५,०९,३११ |
| रिझर्व्ह व इतर फंड | रु. १,३२,८११ |

मुख्य ऑफिस :
सबनीस वकील यांची इमारत, टिळक चौक, कल्याण.

शाखा :
★ शिवाजी चौक, कल्याण ★ डोंबिवली
★ शहापूर व ★ अंबरनाथ

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

: डायरेक्टर बोर्ड :

चेअरमन
श्री. दौलतराव जयरामराव झुंजारराव

मॅनेजिंग डायरेक्टर्स
श्री. गंगाधर वासुदेव भिडे व
श्री. रावसाहेब मूळशंकर कृष्णराम जोशी

डायरेक्टर्स
श्री. पांडुरंग शिवराम देशमुख
श्री. महंमद युसुफ अब्दुल गफूर मुल्ला
श्री. वासुदेव गोविंद खडकबाण
श्री. माधव शंकर गोडबोले

मॅनेजर
बाळकृष्ण बाबुराव रुद्रभटे

स्थापना सन १९३१ टे. नं. २४५१८

# दि मराठा मार्केट पीपल्स
# को-ऑपरेटिव्ह बँक लि.

सिताराम बिल्डिंग, क्रॉफर्ड मार्केट, मुंबई नं. १
( १९२५ च्या सहकारी कायद्यान्वयें रजिस्टर झालेली )

| | |
|---|---|
| संकल्पित भांडवल | रु. १,००,००० |
| जमा भांडवल | रु. ९४,००० |
| फंडस् (रिझर्व्ह व इतर) | रु. ८०,००० हून अधिक |
| ठेवी | रु. ६,००,००० ,, |
| खेळतें भांडवल | रु. ९,००,००० ,, |

★ बोर्ड ऑफ डायरेक्टर्स ★

श्री. खं. सा. दौंडकर, एम्. ए., एलएल. बी., (अध्यक्ष)
श्री. रा. सा. भ. ना. ढोबळे, ( उपाध्यक्ष )
श्री. दृ. अ. ढोबळे, बी. ए., एम्. एल. ए., जे. पी.,
( मॅनेजिंग डायरेक्टर )
श्री. उ. भा. तांबे, श्री. आ. पा. ढोरे,
श्री. शं. कों. डुंबरे, श्री. म. बा. वेंडे, श्री. भि. कृ. पापडे,
श्री. खं. स. काळे, डायरेक्टर्स.

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

कारण, माझ्या मतें, लांब मुद्‌तीच्या कर्जाचे व्यवहार वाढून शेतीच्या उद्योगाची उर्जितावस्था होणें झाल्यास राज्य सरकारची मदत असल्याशिवाय हें साधणें शक्य दिसत नाहीं. मला नमूद करण्यास आनंद वाटतो कीं, आमच्या मद्रास सरकारनें आपल्या राज्यांत लँड मॉर्गेज बँकांच्या चळवळीस प्रोत्साहन देऊन सुरवातीपासूनच वेळोवेळीं त्यांच्या पुढील प्रश्नांचा सहानुभूतिपूर्वक विचार करून जें सहाय्य केलें त्यामुळेंच ही चळवळ येथें यशस्वी झालेली आहे. १९२९ सालीं मद्रास मध्यवर्ती लँड मॉर्गेज बँक व तिला संलग्न अशा १९ प्राथमिक लँड मॉर्गेज बँका स्थापण्यांत आल्या. त्यावेळीं शेअर भांडवल अवघें ५१,३०० रुपयाचें होतें. आज तीच संस्था भरभक्कम पायावर उभी असून १२० प्राथमिक लँड मॉर्गेज बँका तीस जोडलेल्या आहेत. शेअर भांडवल २३,००,००० रु. वर गेलें असून गंगाजळी ३१,००,००० रु वर सांठलेली आहे. ४७ वेळा एकूण ५२५५ लाखाचे डिबेंचर्स (कर्जरोखे) काढलेले असून ४८ व्या वेळीं ७२ लाखाचे नवीन कर्जरोखे काढलेलें आहेत. लँड मॉर्गेज बँकेचा कायदा कलम ६ प्रमाणें मद्रास सरकारनें ७००० लाखाच्या कर्जरोख्यांच्या व्याज, मुद्दलाची हमी घेतलेली आहे. बँकेच्या कार्यकारी मंडळानें १० कोटी रुपयांच्या डिबेंचर्सच्या व्याज–मुद्दलाची हमी घेण्यास विनंती केली असून सरकारची सदर संस्थेबद्दल असलेली सहानभूती व आस्था पाहतां आमची मागणी मंजूर होईल असें वाटतें. डिबेंचर्स वरील व्याजाच्या दराच्या खालील वर्गवारीकडे नजर टाकल्यास आमची बँक युद्धजन्य परिस्थितींत देखील बाजारांत स्पर्धेनें भांडवल मिळवूं शकलेली आहे हें दिसून येईल.

| डिबेंचर्सवरील व्याजाचा दर | डिबेंचर्सची रक्कम रु. |
|---|---|
| २¾ टक्के | ३८,१५,४०० |
| ३% | ३,२८ ३४,७०० |
| ३½% | ९९,०८,३०० |
| ३¾% | ६०,००,००० |
| ४½% | ७२,००,००० |

" राज्यांतील शेतकरी बांधवांना कमी दरानें लांब मुदतीचें कर्ज देतां यावें या उद्देशानें लँड मार्गेज बँका सुरू करण्यांत आलेल्या आहेत. आतां सभासदांना कोणत्या दरानें कर्ज देणें तें बँकेस भांडवल उभें करण्यास बाजारांत डिबेंचर्सवर द्यावें लागणाऱ्या व्याजाच्या दरावर अवलंबून असते. ३ टक्के व्याजानें ज्यावेळीं कर्ज रोखे खपले त्यावेळीं सभासदांकडून ५½ टक्के दरानें व्याज आकारण्यांत आलें. नुकत्याच काढण्यांत आलेल्या डिबेंचर्सवर ४½ टक्के व्याज देऊन ९९½ रु. ला डिबेंचर्स द्यावें लागल्यानें शेतकरी बांधवाकडून ६½ टक्के दरानें व्याज घ्यावें लागतें. माझ्या मतें हा दर भारी असून राज्यांतील शेतकरी बांधवांना शेतीचा औद्योगिक विकास होण्याच्या दृष्टीनें न परवडण्यासारखा आहे. तेव्हां सरकार व रिझर्व्ह बँक या गोष्टींचा विचार करून व्याजाचे दर कमी करतील अशी उमेद आहे.

" लँड मार्गेज बँकांकडून कर्ज मिळण्यास बराच कालावधी लागतो हा एक आमच्यावरील टिकेचा विषय आहे हें आम्ही जाणून आहों आणि तो कमी करण्याकरितां आमचे सतत आटोकाट प्रयत्न चालू आहेत. तरीपण आमची ग्रामीण जनता अडाणी असून तिला आपल्या जमिनीवरील मालकी हक्क शाबीत करणें जड जाणें अपरिहार्य आहे. संस्थेच्या सुरक्षिततेचा विचार केल्यास तारण देण्यांत येणाऱ्या मिळकतीच्या निर्विवाद व संशयातीत मालकी हक्काकडे दुर्लक्ष करून चालणार नाहीं हें आजपर्यंतच्या अनुभवावरून सिद्ध झालेलें आहे. कर्जास लवकरांत लवकर मंजुरी मिळावी हें मला देखील कबूल आहे, परन्तु त्या करतां अशा कांहीं विशिष्ट परिस्थितींत मिळकतीवर लँड मॉर्गेज बँकेचा बोजा झाल्यास त्यास कायद्यानें संरक्षण मिळावयास पाहिजे; अर्थात आमची ही मागणी फार मोठी आहे असें मला खरोखर वाटते. पण कसेंही का असेना, आम्हास कायद्यानें संरक्षण मिळावें व हें सरकारास मान्य होऊन तें लवकरच घडावें अशी आमची इच्छा आहे. असें जोपर्यंत होत नाहीं तोपर्यंत आम्हांस दिरंगाई करून कर्जास लागणारा वेळ कमी करतां येणार नाहीं.


" दुसरी एक आमच्या बाबतींत टीका होते ती अशी कीं, भू-तारण संस्थांनीं जुनें कर्ज भागविण्यास शक्य तितकें कर्ज देण्याचें कमी करून शेतींतील उत्पादन जेणें करून वाढेल इकडे लक्ष द्यावें व त्याच कारणीं कर्ज द्यावें. टीकाकारांना असें वाटतें कीं, मंदीच्या काळांत शेतकरी कर्जांत रुतलेला होता, त्यावेळीं त्यास या कर्जानें ऋणमुक्त करणें योग्य होतें. आतां असलें कर्ज देणें म्हणजे अनुत्पादनास उत्तेजन दिल्यासारखें होऊन असें करण्यानें देशाचें नुकसानीस कारणीभुत होणार आहे. बऱ्याच अंशीं हें खरेंही आहे. सेंट्रल लँड मॉर्गेज बँकेनें याचा वेळोवेळीं विचारही केलेला आहे. कर्ज मंजुरीस बराच कालावधी लागतो म्हणून शेतकरी जमीन सुधारणेस तात्पुरतें खाजगी कर्ज घेतात, जमीनी सुधारतात, आणि नंतर कर्ज भागविण्यास बँकेकडे कर्ज मागतात. तपासाअंतीं असें आढळून येतें कीं शेकडा ४९·९ कर्ज उत्पादनाकरितां झालेलें आहे, २८·३ % चे कर्जाचा उलगडा होत नाहीं. २१·८% मात्र लग्न इत्यादि कार्याकरितां झालेलें आहे. शेतकऱ्यास लँड मॉर्गेज बँकेच्या कर्जाची एक संधी तरी द्यावी; पुन्हा मात्र त्यानें कर्ज मागितल्यास तें उत्पादनाकरतांच असावें, असें जरी आहे तरी मला कांहीं वेळा वाटतें


## फील्डमन पाहिजे

पुणें जिल्हा सहकारी खरेदी विक्री संघ लि. या संस्थेमध्यें दोन कालिफाइड फील्डमन हंगामी नेमणें आहेत. पगारश्रेणी ५५–३–८५ अधिक नियमाप्रमाणें महागाई भत्ता. अर्जदारांनीं शैक्षणिक लायकी, वय, पूर्वानुभव यांसह दि. १०–११–५२ चे पूर्वी अर्ज करावेत. बटाटा उत्पादनासंबंधी प्रत्यक्ष माहिती असणारांनाच अधिक पसंती दिली जाईल.

मा. वि. फाटक
चेअरमन
पुणें जिल्हा सहकारी खरेदी विक्री संघ लि.
१२५ भवानी पेठ, पुणें २.





कीं दस्तांत जें कर्जाचें कारण लिहिलेलें असतें तें नेहमींच कांहीं खरें कारण आहे असें म्हणतां येत नाहीं. तज्ज्ञांच्या मतें यदाकदाचित् लँड मॉर्गेज बँकांनीं अशा प्रकारचें कर्ज देण्याचें नाकारण्याचें धोरण स्वीकारल्यास खाजगी सावकारीचें मात्र निर्मूलन न होतां ती टिकून राहील आणि शेतकरी बांधवांना मात्र सहकारी चळवळीपासून परान्मुख व्हावें लागेल. कारण, त्यांना तर ऋणमुक्त होणें हें त्यांच्या हिताचें वाटतें. याच तज्ज्ञांचा असा सल्ला आहे कीं, भरघोस तारण असल्यास असें कर्ज द्यावें., मात्र त्यांना कर्जाचा योग्य उपयोग करण्याचें वेळोवेळीं शिक्षण देण्यांत यावें.

" शेतीच्या मालाचे भाव भरमसाट वाढले असतांना आणि आतां सदर भावाची उतरती कमान समोर दिसत असतांना कर्ज काढणें हे शेतकरी बांधवांच्या हिताचें आहे काय, याचा मी अलिकडे सारखा विचार करीत आहे. असें जर घडलें तर बऱ्याचशा शेतकरी लोकांना आपली आर्थिक घडी नीटपणें बसवणें मुष्किलीचें होईल. रिझर्व्ह बँकेनें नुकतीच देशांतील क्रेडिटची पहाणी केलेली असून त्यांतून खरोखर काय निष्पन्न झालेलें आहे हें मला माहित नाहीं. तथापि, कांहीं कांहीं खेड्यांची चौकशी होऊन लांब मुदतीच्या आणि अल्प मुदतीच्या कर्जापासून खेडुतांनीं आपला कोणता फायदा करून घेतला आणि त्याचा विनियोग कसा करून घेण्यांत आला हें तरी पाहण्यास मिळेल म्हणून मी अशी चौकशी व्हावीच असें म्हणतो. संशोधन कार्यास योग्य असा नोकरवर्ग रिझर्व्ह बँकेकडे आणि मद्रास सरकारकडे असल्यानें त्यांनीं लोककल्याणाकरतां हें कार्य जरूर हातीं घ्यावें असें मी म्हणतों. तसेंच त्यामुळें सहकारी चळवळीस आपलें धोरण ठरविण्यासही बरें पडेल. जमीन सुधारणेस कर्ज देणेचे बाबतींत एक मोठी अडचण कोणती असेल तर लँड मॉर्गेज बँकांना भरपूर तारणाची उणीव भासते. तिचे नियमाप्रमाणें तारणाची किंमत कमी पडून अर्ज नामंजूर करावे लागतात. समजा, एकादे अर्जदारास आपल्या जिरायत जमिनीचे तारणावर त्याच जमीनींत विहीर काढणेकरतां कर्ज पाहिजे असल्यास जमीन जिरायत सदरांत येऊन अर्थात तिची किंमत कमी होईल. तगाई कर्ज देतांना मात्र पुढें होणाऱ्या सुधारणांचा विचार अगोदर करून तिची किंमत तगाई नियमास अनुसरून वाढविली जाते. भू–तारण संस्थांना ही जबाबदारी घेतां येत नाहीं. कारण, दुसऱ्याचें ऋण काढून कर्ज द्यावें लागतें. तेव्हां सरकारनें अशा कामीं वसूलाची हमी घेतल्यास योग्य त्या शेतकऱ्यांना कर्ज देतां येईल. मुंबई सरकारनें यांतील तत्त्व मान्य केल्याचें प्लॅनिंग कमिशनच्या रिपोर्टांत नमूद आहे. म्हणून हा मार्ग अवलंबण्यास इतर राज्य


## पुणें पीपल्स को-ऑपरेटिव्ह बँक लि.

१७०, सदाशिव पेठ, पेरूगेटाजवळ, पुणें शहर

सहकारी चळवळीशीं अनेक वर्षें ज्यांचा निकटचा संबंध आहे, अशा अनुभवी कार्यकर्त्यांच्या मार्गदर्शनाखालीं चाललेली एक नवीन सहकारी बँक.

सभासदांना व नाममात्र सभासदांना वेगवेगळया योजनेप्रमाणें रु. २५,००० पर्यंत व्यक्तिशः कर्ज देणारी पुणें शहरांतील ही एकच अर्बन बँक आहे. हिचा फायदा गरजूंनीं अवश्य घ्यावा.

द. दि. चितळे
मॅनेजिंग डायरेक्टर.

## दि इसलामपूर को-ऑपरेटिव्ह पीपल्स बँक लिमिटेड

उरुण-इसलामपूर. जि. द. सातारा.

स्थापना ४ मे, १९२६ र. नं. ५४०४

आकर्षक व्याजाच्या दरानें ठेवी स्वीकारल्या जातात व सर्व प्रकारच्या बँकिंगचे व्यवहार केले जातात. जास्त माहितीसाठी लिहा अगर भेटा.

डी. डी. लाटकर, मॅनेजर
एम्. डी. पवार, चेअरमन

मराठींतील पहिलाच ' व्यापारी व औद्योगिक माहितीचा ज्ञानकोश ' म्हणजे ' पॅरमाउंट '

## उद्योग–व्यापार वार्षिक १९५३

संपादक—ना. तु. ठाकूर, बी. ए., पर्सनल प्रेस सर्व्हिस

**कांहीं लेखकः**—श्री. न. वि. गाडगीळ, श्री. शं. ल. किर्लोस्कर, श्री. लालचंद हिराचंद, श्री. ए. सी. सन्ना, श्री. ग. रा. साठे, श्री. चिं. वि. जोग, श्री. शं. रा. दाते, श्री. श्री. वा. काळे, श्री. रा. म. कानिटकर, श्री. श्री. द. साठे, श्री. अ. ह. लिमये, श्री. वि. त्र्यं. शेट्ये इ.

**कांहीं विषयः**—पंचवार्षिक योजना, साखर, इंजिनियरिंग, प्लॅस्टिक्स, कागद, कांच, कापड उद्योग, सिमेंट, रेडिओ, चामड्याचा उद्योग, साबण, फार्मसी, रंग व रासायनिक धंदे, बँकिंग व विमाव्यवसाय, कोको–चॉकोलेट उद्योग, महाराष्ट्रीय उद्योगधंदे, विक्रीकर कायदा.

**प्रेस डिरेक्टरी विभागः**—मुद्रण–प्रकाशन–जाहिरातकला–वृत्तपत्रसृष्टि, २०० नियतकालिकांची माहितीपूर्ण सूची, खप, जाहिरातींचे दर, इत्यादि तपशील.

**नवीन उद्योगधंद्यासंबंधीं योजनाः**—व्यवहाराच्या निकषावर घासलेल्या, होतकरू तरुणांना नवीन क्षेत्र सुचविणाऱ्या उद्योगधंद्यांच्या योजना.

डेमी अष्टपत्री ग्लेझ्ड १६० पृष्ठें
अनेक फोटो व आकृती

किंमत फक्त रु. ३
व्ही. पी. नें रु. ३॥ बु. पो. ३ रु. ५ आ.

सरकारांनाही कळविण्यांत आलेलें आहे. शेतकऱ्यांना बोअरिंग मशिन, यांत्रिक सल्ला, इत्यादींची सोय करून वरील प्रकारचें आश्वासन सरकार देत असल्यास उत्पादन-कार्याकडे ग्रामीण जनतेचें लक्ष जरूर वेधण्यांत येईल.

" शेतकऱ्यांनी चालूं भारी व्याजानें भरमसाट कर्ज काढून भांडवली गुंतवणूक करण्याची अपेक्षा करणेंच मुळीं चूक आहे. समजा, आहेत ते भाव जरी चालूं राहिले तरी अंगिकृत कार्यांत शेतकऱ्यांचा फायदा होईल कीं नाहीं याची शंकाच आहे. रिझर्व्ह बँक अल्पावकाशाचें कर्ज प्रॉ. को. बँकांना सवलतीच्या म्हणजे १॥ टक्के दरानें पुरवते. मध्यम मुदतीचेंही कर्ज अशाच सवलतीच्या दरानें देण्याचा तिचा विचार आहे. परंतु लांब मुदतीच्या कर्जाकडे नजर टाकल्यास काढण्यांत आलेल्या डिबेंचर्सपैकीं २० टक्के भांडवलाचीं डिबेंचर्स स्वतः रिझर्व्ह बँक घेत असते. डिबेंचर्सवरील ठरलेल्या व्याजाचा दर इतराप्रमाणें त्यांनाही मिळतो. खरोखर चालूं चढ व्याजांत कर्ज काढून जमीन सुधारण्याचा मोह होत नाहीं. तेव्हां रिझर्व्ह बँकेस माझी अशी विनंती आहे कीं, तिनें प्रॉ. सें. को. लँड मॉर्गेज बँकांना जमीन सुधारणेकरतां दिल्या जाणाऱ्या कर्जास सवलतीचे व्याजाचे दर आकारावेत. हल्लीं असलेल्या कायद्याप्रमाणें देखील असें कर्ज देतां येईल. कायद्यांत दुरुस्तीची जरुरी असल्यास त्यांनी ती जरूर करावी. कारण, शेतकऱ्यांचें त्यांतच हित असून महान अशा शेतीचे उद्योगास त्यांनें मदत होणार आहे.

"सरकारनें तगाई इत्यादीस तहकूबी दिली अगर अन्य सवलती दिल्या म्हणून आपणासही तसें करतां येणार नाहीं. आपल्यास कर्ज काढून कर्ज द्यावें लागतें हें सभासदांनीं ध्यानांत आणावें. गेल्या ५ वर्षांत जनतेस दुष्काळास तोंड द्यावें लागत आहे आणि त्यामुळें थकबाकी वाढत असून त्याकडे प्राथमिक लँड मॉर्गेज बँकांनी दुर्लक्ष न करतां वसुलाचे त्यांचे हातून कळकळीचे प्रयत्न झाले पाहिजेत. " अशा आशयाचे थकबाकी आणि वसूलबद्दल आपले विचार प्रगट करून ते म्हणाले:—

"खेड्यांतील सावकारी नष्ट होऊन कर्ज मिळणें कठीण झालें आहे. त्यामुळें खेडूत लँड मॉर्गेज बँकांचा आश्रय घेत आहेत. १९५१-५२ सालीं प्राथमिक बँकांकडे १७० लाखाचे ६३०० अर्ज दाखल झाले; ४७ लाखाचे १५२८ अर्ज त्यांनींच नामंजूर केले आणि ९८ लाखाचे ४१८७ अर्ज शिफारस करण्यांत आले. १३६ लाखांचे ४९५६ अर्ज सालअखेर शिल्लक आहेत. प्राथमिक बँकांची कितीहि सदिच्छा असली तरी या शिल्लक अर्जांची तपासणी होऊन निकाल देणें अशक्यप्राय गोष्ट होऊन बसली आहे. त्याचबरोबर, नव्या अर्जांचा लोंढाहि आहेच. सरकारनें सहकारी खात्यांतील सब्-रजिस्ट्रारांची (जमीन तपासणी अंमलदार अगर लँड व्हॅल्यूएशन ऑफिसर्स ) संख्या वाढवेली तरच या अर्जाचे निकाल लागतील.

"हल्लीं ४० को-ऑपरेटिव्ह सब् रजिस्ट्रार्स व ३ डेप्यु रजिस्ट्रार्स लँड मार्गेज बँकांचें काम करीत आहेत. डेप्यु. रजिस्ट्रार्स व त्यांच्या नोकर वर्गाचा सर्व खर्च स्वतः बँक सोसत आहे. सब् रजिस्ट्रार्सचा निम्मा खर्चही बँकेकडून दिला जातो. जून १९५२ साल अखेर १,७९,४९२ रुपये या पोटीं बँकेनें सरकारकडे जमा केलेले आहेत. ३१-३-५३ अखेर सब् रजिस्ट्रारकरतां होणारा निम्मा खर्च सरकारनें सोसण्याचें कबूल केलेलें आहे. आम्ही ही सवलत चालूं रहावी म्हणून आग्रह पण केलेला आहे. सरकारच्याच कामकाजापैकीं एका कामाचा भाग ही बँक उचलित आहे याची आठवणही शेवटीं करून देणें भाग आहे. या कामीं अधिकारी लोकांवर होणारा खर्च हाही सरकारी खर्चाचाच एक कायदेशीर भाग आहे. ' सर्वच सुधारलेल्या राष्ट्रांतील शेतीच्या प्रगतीचा इतिहास पाहतां अल्प, मध्यम, आणि दीर्घ मुदतीच्या कर्जाची योजनाबद्ध सोय हाच मुळीं त्याचा पाया आहे. यानेंच शेतीच्या उद्योगांत वाढ होऊन भरभराट झालेली आहे. ' असें स्पष्टपणें प्लॅनिंग कमिशनच्या अहवालांत म्हटलें आहे, तें सत्य आहे. भू-तारण संस्था ह्या राष्ट्रीय संस्था असून सदोदित शेतकरी बांधवांचें कल्याण हेंच त्यांचें एकमेव ध्येय आहे.

" शेवटीं, आमच्या सहकारी सोसायटीजचे रजिस्ट्रार श्री. जे. सी. रायन, यांचे या प्रसंगीं आभार प्रदर्शित करणें योग्य होईल. १९५०-५१ सालीं ३.५३ टक्क्यांचे अल्प मुदतीचे सरकारी रोखे मिळत असतांना देखील ३ टक्के दराचे आमचे ७० लाखाचे डिबेंचर्स खपवून भांडवल मिळवून देण्याचें त्यांनाच श्रेय आहे. त्यांच्याच सांगण्यावरून सर्व सेंट्रल बँका आणि सोसायट्यांनी एकत्रित येऊन शेतकरी जनतेवर गुदरलेल्या प्रसंगांत मदत केली. ३ टक्क्यांनीं काढलेल्या कर्ज रोख्यांत त्यांनीं भांडवल गुंतवलें आणि शेतकऱ्यांना ५॥ टक्के व्याजानें कर्ज मिळण्यास साह्य केलें. तेव्हांपासून डिबेंचर्स करतां लागणाऱ्या भांडवलाची ते आस्थेनें विचारणा करीत आहेत. इतर जनतेचें जास्त लक्ष्य वेधण्याकरतां अलिकडे ४॥ टक्क्यांचीं डिबेंचर्स काढलेलीं आहेत. श्री. रायन हे याहि वेळीं डिबेंचर्सचे गुंतवणुकींत साह्यभूत झालेले आहेत."

टे. नं. ६०४२८
वामन गणेश हरचेकर
चांदी, सोनें, मोत्यें व जवाहिरांचे व्यापारी.
केळकर रोड, दादर, मुंबई नं. २८
यांजकडून
अभिष्ट चिंतन
चालू दीपावलि व नूतन संवत्सर
सर्व भारतीयांना सुखाचें व भरभराटीचें जावो.

रेखा फर्निशर्स
३२४, सदाशिव, पुणें.
सर्व प्रकारच्या सुबक फर्निचरचे
कारखानदार

### आस्ट्रेलिआचें राष्ट्रीय उत्पन्न

१९५२–५३ सालीं ऑस्ट्रेलिआचें राष्ट्रीय उत्पन्न १३,५७,९०,००,००० ऑस्ट्रेलिअन पौंड होतें, असें अधिकृत रीत्या जाहीर करण्यांत आलें आहे. ५१–५२ च्या फढणिशी वर्षापेक्षा उत्पन्नांत १० टक्के वाढ झाल्याचें आढळून आलें.

### हिंदी साड्यांना नवी बाजारपेठ

हिंदी साड्यांना जर्मनींत चांगली बाजारपेठ मिळूं शकेल असा अंदाज भारतामधील कापड व्यापाऱ्यांनीं व शिंप्यांनीं केला आहे. सायंकाळचा पोषाख म्हणून साड्यांचा वापर करतां येईल, असें मत त्यांनीं व्यक्त केलें आहे.

### महात्माजींच्या स्मारकाविषयीं

दिल्ली येथें महात्मा गांधींची समाधि १८ लाख रुपये खर्चून बांधण्यांत येणार आहे. ह्याविषयीं बोलतांना प्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ श्री. कुमारप्पा म्हणाले कीं, ज्या महान् व्यक्तीनें आपलें जीवित दरिद्री नारायणाच्या सेवेंत वेचलें आणि जो गरिबींतच जगला, त्याचें स्मारक एखाद्या मोगल साम्राज्यशहाला शोभेसें करण्यांत यावें हें कितपत उचित आहे ह्याचा विचार समाधीच्या नमुन्यांचा विचार करणाऱ्या कमिटीनें केला पाहिजे; महात्माजींच्या तत्वज्ञानाशीं व जीवनाशीं सुसंगत होईल अशा प्रकारच्या स्मारकाची कमिटीनें योजना करावी.


महाराष्ट्रीय कुटुंबाचीं
## तीन भूषणें

घरांतील माणसांच्या खाण्यापिण्यांतील आवडी–नावडी जशा त्रिविध असतात, त्याचप्रमाणें त्यांच्या वाचनाची अभिरुचिहि निरनिराळी असते. कोणाला भारदस्त वाचन आवडतें, कोणाला संसारांत उपयुक्त होणारे तेवढेंच हवेसें वाटतें, मनोरंजक गोष्टी, चुटके कांहींना आवडतात, शास्त्रीय लेखांत कांहीं रंगून जातात, साहित्याच्या निरनिराळ्या प्रांतांत कांहींना गोडी वाटते, प्रवासवर्णनांत कांहीं रंगून जातात. स्त्री–पुरुषांच्या विविध आवडींना पोषक, बौद्धिक खाद्य पुरविणारीं, अंतर्बाह्य सुंदर आणि लोकप्रिय मासिकें म्हणजे—

## ★ किर्लोस्कर ★ मनोहर ★ स्त्री

किर्लोस्कर—१ तारखेस प्रसिद्ध. वा. वर्गणी ६ रु.
मनोहर— १० तारखेस प्रसिद्ध. वा. वर्गणी ४॥ रु.
स्त्री— १५ तारखेस प्रसिद्ध. वा. वर्गणी ५ रु.

—तिन्हीं एकत्र वार्षिक वर्गणी १५॥ रु.—

★ किर्लोस्कर प्रेसचीं १५ उद्बोधक प्रकाशनें मे. केळकर बंधु, बुधवार चौक, पुणें २, यांच्या दुकानीं मिळूं शकतील. यादी मागवून त्यांतून निवड करा.

**किर्लोस्कर प्रेस, किर्लोस्करवाडी, द. सातारा**

## धी चाळिसगांव पिपल्स को-ऑपरेटिव्ह बँक लि.

**चाळिसगांव, पू. खा.**

(स्थापना सन १९४६)

(१) वसूल झालेलें भांडवल रु. ९०,०००.
(२) रिझर्व्ह व इतर फंडस् रु. ६१,०००
(३) खेळतें भांडवल रु. ४,३०,००० चे वर

**कार्यवाहक मंडळ**

(१) श्री. दाजी काशिनाथ भंडारी, (प्रेसिडेंट)
(२) श्री. पांडुरंग वामन अंतापूरकर, (व्हा. प्रेसिडेंट)
(३) श्री रामराव फकिरराव देशमुख
(४) श्री. नथु काळू वाणी
(५) श्री रामरतन गणेशराम कळंत्री
(६) श्री. शांतीलाल पन्नालाल जैन
(७) श्री अनंत विश्वनाथ थत्ते

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात. सोनें, शेतीचा माल व इतर मालावर, इमारतीचे तारणावर व पतीवर कर्ज दिलें जातें. चालू, सेव्हिंग्ज व मुदतीच्या ठेवी स्वीकारल्या जातात. मुदतीच्या ठेवीदारासहि बोनस मिळूं शकतो.

विशेष माहिती चौकशीअंतीं.

आनंदराव डी. पाटील
मॅनेजर.

## दि प्रेसिडेन्सी इंडस्ट्रियल बँक लि.

## (शिड्यूल्ड बँक)

## प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग

पुणें २. (टे. नं. २७६३)

अधिकृत, विक्रीस काढलेलें व खपलेलें भांडवल रु. १०,००,०००
जमा झालेलें भांडवल रु. ७,२४,९१०
खेळतें भांडवल रु. ७५,००,०००

मुंबई शाखा:—कॉमनवेल्थ बिल्डिंग, ८२, मेडोज स्ट्रीट, मुंबई १

श्री. ग. रा. साठे, अध्यक्ष. श्री. वा. ग. बापट, उपाध्यक्ष

**बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.**

श्री. गो. धों. जोगळेकर बी. ए. (ऑ.), बी. कॉम., एलएल. बी., मॅनेजर.
श्री. सी. टी. चितळे मॅनेजिंग डायरेक्टर. टे. नं. २६०७

# मोड—कचरा व चिंध्या ही संपत्ति—सोनें आहे

( बी. बी. पाटील, बी. ए., एलएल. बी., सांगली. )

यापुढें केलेलें संपत्तीचें वर्गीकरण शास्त्रीय सर्वंकश आहे, असा दावा नाहीं. सामान्य बुद्धीच्या लोकांनीं केलेलें हें स्थूल वर्गीकरण आहे.

(१) भूमातेच्या पोटांतील खनिज संपत्ति, (२) भूपृष्ठावरील संपत्ति. (अ) भूपृष्ठावर पिकणारीं—अन्नधान्यें, उद्योगधंद्यास लागणारा ताग, कापूस व जंगल (ब) भूपृष्ठावर पडून राहिलेलीं—तांबें, पितळ, काच व लोखंडादि जिनसांची मोड—कचरा व कापडाच्या चिंध्या इत्यादि इत्यादि व (३) सूर्यनारायणाची उष्णता. भूमातेच्या पोटांतील खनिज-संपत्ति, भूपृष्ठावर पिकणारी अन्नधान्यादिक संपत्ति व सूर्यनारायणाची उष्णता, या संपत्तीच्या विकासाचा विचार तज्ज्ञ आस्थेनें करीत आहेत. कचरा, मोड व अडगळ म्हणून पडून राहिलेल्या संपत्तीकडे जावें तितकें सरकारचें लक्ष गेलेलें नाहीं व सामान्य लोकांना या संपत्तीची कल्पनाहि नाहीं असें म्हणणें वावगें होणार नाहीं.

## मातीचें सोनें

एकवार उपयोगांत आणल्यावर निरुपयोगी म्हणून ठरलेल्या शेंकडोंच नव्हें तर हजारोंनीं मोजण्याइतक्या वस्तू आहेत. प्रथम उपयोगांत आणतांना ती संपत्तीच होती व निरुपयोगी झाल्यावरहि ती संपत्तीच असते, फरक इतकाच कीं ती कमी किंमतीची होते. परंतु अज्ञानादि अनेक कारणानें आम्हीं त्यांना कचरा समजतों. ती शून्य किंमतीची आहे, असें समजून तिची मनमानेल तशी वासलात लावितों.

तांबा व पितळादिकांच्या मोडींचें व चिंध्यांचें सोनें कसें होणार ? नव्या जगांतील ही नवी किमया आहे, बुवाबाजीची ही सुधारलेली आवृत्ती आहे, असें सकृद्दर्शनीं वाटण्याचा संभव नाहीं, असें नाहीं.

उद्योगी लोकांच्या हातांत माती दिली तर तिचें ते सोनें करून दाखवितात असें आम्ही म्हणतों तेव्हां ते नित्य व्यवहारांतील सोनें तयार करितात, असें आम्हीं समजत नाहीं. तर त्यांच्या उद्योगाच्या पोटीं संपत्ति निर्माण होते असेंच आम्हीं समजतों. प्रयत्न केल्यास तांबा, पितळ व लोखंडादि धातूंचा कचरा-मोड व कापडाच्या चिंध्या उद्योगी लोकांच्या हातांत दिल्यास यापासून संपत्ति—सोनें तयार करणें त्यांच्या हातचा मळ आहे. तांबा व पितळ यांच्या मोडीला कानडींत "भंगार" म्हणतात. "भंगार" या कानडी शब्दाचा मराठींत "सोनें" असा अर्थ आहे व तो सार्थहि आहे.

केवळ अशा तात्त्विक चर्चेनें वाचकांच्या मनाचें समाधान होणार नाहीं, हें जाणून या मोडींचें व चिंध्यांचें संपत्तींत रूपांतर करून सोनें कसें तयार केलें जातें या संबंधीं इंग्लंडांत यशस्वी झालेल्या प्रयत्नांकडे पाहूं.

## मँचेस्टरचा अद्भुत उपक्रम

इंग्लंडमधील मँचेस्टर शहराची औद्योगिक केंद्रांत प्रामुख्यानें गणना केली जाते. मँचेस्टरमध्यें तयार झालेल्या कापडांपैकी एका कापडाला—पटाला—आम्ही मँचेस्टरपट—मांजरपट—म्हणून ओळखतों. "वंडर्स ऑफ दि वर्ल्ड" "जगांतील अद्भुत चमत्कार" या नांवाच्या पुस्तकांत मँचेस्टर म्यु. कमिटीनें केलेल्या एका उपक्रमाची माहिती देऊन त्या उपक्रमाची अद्भुत चमत्कारांत गणना केली आहे, या उपक्रमांत अद्भुत तें काय आहे, याची पुढील माहिती वाचून खात्री होईल.

या शहराची सांजसकाळ झाडलोट व साफसफाई करणाऱ्या म्यु. क.-च्या नोकरांना रस्तोरस्तीं जुनें-नवें लोखंडाचें खिळे-मोळे व तुकडेटाकडे, तांबा व पितळ आदि धातूंचे लहानसहान तुकडे, कांचेचे तुकडे, कागद व कापडाच्या चिंध्या, विटांचे तुकडे, इत्यादि अनेकविध जिन्नस गोळा करावे लागतात. हा सर्वसंग्राहक कचरा विवक्षित ठिकाणीं नेल्यावर तेथें त्यांतील लोखंड, पितळ इत्यादि जिन्नस कचऱ्यांतून वेचून निरानिराळे केले जातात. काच, लोखंड, तांबा-पितळ इत्यादिकांचे तुकडे त्या त्या जिनसांच्या कारखान्याकडे रवाना होतात. शहराजवळील दलदलीचा भाग भरून काढण्यासाठीं वीट-माती, सिमेंट आदि कचरा रवाना होतो. या उपक्रमामुळें म्यु. क. च्या उत्पन्नांत भरीवर भर पडत आहे. निरुपयोगी समजून सार्वजनिक रस्त्यांतून टाकलेल्या कचऱ्याचें सोनें झालें कीं नाहीं ? म्यु. क. च्या कारभारांतील हा उपक्रम अद्भुत नव्हे काय ?

गेल्या महायुद्धांत इंग्लंडमधील युद्धखात्याला कापसाची टंचाई भासूं लागली. अडचण आली म्हणजे ती अडचण दूर करण्याचा मार्गहि प्रयत्नवाद्यांना मिळतो. कापडाच्या चिंध्या वापरून ही अडचण दूर करितां येईल, असें आढळून आलें. सरकार चिंध्या खरेदी करणार आहे असें जाहीर होतांच रस्त्याच्या तिकटया तिकटयावर चिंध्यांचे ढीग दिसूं लागले. युद्ध यशस्वी करण्यास आपणाला हातभार लावण्याची संधि मिळाली म्हणून चिंध्यांना व त्या जतन करून ठेवणाऱ्या लोकांना धन्यता वाटली.

## धातूंची मोड

भारतांतून सालदरसाल तांबा, पितळ व लोखंडादि धातूंची हजारों टन मोड (कचरा) परदेशीं रवाना होते. मोडक्या व निरुपयोगी लोखंडाच्या कचऱ्यानें भरलेल्या कित्येक बोटी परदेशीं रवाना झाल्याचें चालू सालचें ताजें वृत्त आहे. थोड्याच दिवसांपूर्वी ब्रह्मदेशच्या व्यापाऱ्यांनीं चिंध्यांची मोठ्या प्रमाणांत येथें खरेदी केली होती परंतु ब्रम्ही सरकारनें आयात परवाना नाकारल्यानें हा व्यवहार रद्द झाला. तांब्यादि धातूंची मोड अत्यल्प किंमतींत न्यावयाची व तिचें रूपांतर झाल्यावर भारी किंमत देऊन आपण ती विकत घेतों. हा क्रम अनेक वर्षें चालू आहे. भारत सरकारचें इकडे लक्ष गेलेलें नाहीं, असें नाहीं. भारत सरकारनें नेमलेल्या एका तज्ज्ञांच्या कमिटीनें तांब्याच्या मोडीचें रूपांतर करणारा सरकार-मालकीचा एक कारखाना उभारण्यांत यावा, अशी शिफारस केल्यास ३।४ वर्षांचा काळ लोटूनहि गेला पण त्या दृष्टीनें हालचाल झालेली दिसून येत नाहीं. वैयक्तिक भांडवल नव्या कारखान्यांत गुंतविण्यासारखी अनुकूल परिस्थिति असण्याचा विश्वास भांडवलदारांत नाहीं. तांबा तयार करणारा एकमेव एकच कारखाना भारतांत आहे. भारताची अल्पांशानें गरज भागण्याइतकें उत्पादन होत नाहीं. खनिज संपत्तींत समृद्ध असलेल्या भारतांत तांब्याची खाण उपलब्ध होईल असें ठिकाण अद्याप सांपडलेलें नाहीं. या सर्व कारणांचा विचार करितां मोडीचें रूपांतर करणारा एखादा कारखाना जरी सुरू झाला तरी परदेशीं जाणाऱ्या लाखों रुपयांचा प्रवाह निःसंशय थांबेल.

### चिंध्यांची कर्मकथा

घातूंच्या मोडीपेक्षा कापडाच्या चिंध्यांची कर्मकथा तर अधिकच विचारार्ह आहे. मोडीला पै-पैसा तरी मिळतो म्हणून तिचें थोडेंफार तरी जतन केलें जातें. चिंध्यांना अग्निनारायणाच्या हवालीं अगर मातीशीं समरस व्हावें लागतें. ब्रह्मदेशांत चिंध्यांचा पुरेसा पुरवठा होत नसल्यानें भारताकडे तेथील व्यापारी धांव घेतात, असेंच अनुमान काढणें युक्त होईल. एवढ्या मोठ्या प्रमाणांत तेथें कोणता उपयोग केला जातो व तसा उपयोग भारतांत करितां येईल अगर कसें याची चौकशी होणें जरूर आहे. यावेळीं जपान मधील घरगुती व छोट्या धंद्यांची माहिती मिळवावी व कांहीं धंदे प्रत्यक्ष करावेत म्हणून एक शिष्टमंडळ कांहीं दिवसांपूर्वी जाऊन आलें. या भेटीचा रिपोर्ट प्रसिद्ध झाला. या रिपोर्टाचें सर्वत्र स्वागत झाल्यानें गिऱ्हाइकांची मागणी भागविण्यासाठी त्याच्या दोन आवृत्त्या काढाव्या लागल्या. या शिष्ट मंडळानें घरगुती व छोट्या धंद्याला उपयुक्त अशी कांहीं यंत्रें खरेदी केलीं. या यंत्रांचें शिक्षण देण्यासाठी दोन जपानी तज्ज्ञहि आणविले व दिल्लीजवळील 'आरब की सराई' या नांवानें ओळखल्या जाणाऱ्या जागीं यंत्रें बसवून निर्वासितांना शिक्षण देण्यास सुरवात केली. या संस्थेच्या सुरवातीस अनेक थोरामोठ्यांनीं भेटी देऊन तेथें चाललेल्या कामकाजाबद्दल समाधान व्यक्त केल्याचें वृत्त वाचून अनेकांच्या अंगावर मूठभर मांस चढलें पण हल्लीं त्याचें नांवहि ऐकावयास मिळत नाहीं.

### चिंध्यापासून सूत काढणारें यंत्र

जपानमध्यें खरेदी केलेल्या यंत्रांत चिंध्यापासून सूत तयार करणारें सुमारें दहा हजार रुपये किंमतीचें एक यंत्र होतें. या यंत्रावर चाळीस नंबरपर्यंतचें सुमारें ३०० पौंड सूत रोज निघेल, असें वर निर्दिष्ट केलेल्या रिपोर्टांत नमूद केलें होतें. हें यंत्र साधें व सुटसुटीत असल्याचा निर्वाळाहि देण्यांत आला आहे. या यंत्राचें काय झालें? मोड म्हणून परत मायदेशीं तर रवाना झालेलें नाहीं ना? गेल्या वर्षभरांत तर घरगुती व छोट्या धंद्यांना उत्तेजन दिल्याशिवाय तरणोपाय नाहीं असा जोराचा प्रचार होत आहे, अशा वेळीं जपानपासून शिकून आलेल्या धंद्यांचा व तेथून आणलेल्या यंत्रसामुग्रीचा बोलबाला ऐकावयास मिळणें स्वाभाविक आहे, परंतु या बाबतींत मूग गिळले जात आहेत, असें वाटतें. जपानमध्यें चिंध्यापासून सूत काढलें जात असावें असें म्हणण्यास कोणताच प्रत्यवाय दिसत नाहीं; तसें नसतें तर दहा हजार रुपये किंमतीचें यंत्र तयार करण्याची यातायात करण्याइतका जपान मूर्ख खास नाहीं.

जपानहून आणविलेल्या यंत्रसामुग्रीवर व जपानी तज्ज्ञांच्या देखरेखीखाली शिक्षण घेण्यास संधि मिळावी म्हणून प्रस्तुत लेखक व त्याचे एक स्नेही यांनीं भारत सरकार, मुंबई सरकार व एतद्संबंधीं असलेल्या मुंबई सरकारच्या खात्याकडे सुमारें एक वर्षभर प्रयत्न केला. वैयक्तिक प्रयत्नास यश येत नाहीं असें वाटल्यानें एका सार्वजनिक संस्थेमार्फत प्रयत्न करून पाहिला, पण पदरीं निराशाच आली. हा भाग क्षणभर बाजूस ठेवून विचार करितां मोड व चिंध्या यांचें सोनें तयार करितां येतें व गरीब भारताला तर याची फार मोठी जरूरा आहे. राष्ट्रहिताचा दिनरात्र विचार करण्यांत गढून गेलेल्या 'आमच्या पुढाऱ्यांनीं हा प्रश्न धसास लावावा अशी विनंति आहे.


दि महाड को-ऑपरेटिव्ह अर्बन बँक लि., महाड.
महाड (जि. कुलाबा)
स्थापना : ३ जानेवारी १९३१
भागांची संकलित मर्यादा रु. १,००,०००
खपलेल्या भागांची रक्कम रु. ८४,५५०

: नियामक मंडळ :

(१) श्री. दत्तात्रय नरहर वैद्य, बी. ए., एलएल. बी. चेअरमन
(२) श्री. माधव तुळजाराम शेट व्हा. चेअरमन
(३) श्री. अनंत शंकर जोशी डायरेक्टर
(४) श्री. बाळकृष्ण सुंदर बुटाला "
(५) श्री. गंगाराम शंकर जाधव "
(६) श्री. रामविलास हिरालाल करवा "
(७) श्री. रामचंद्र गणपत बारंगे "
(८) श्री. चिंतामण गणेश देशपांडे "
(९) श्री. काशिनाथ मोरेश्वर बागडे "
(१०) श्री. तुकाराम नामदेव साळी "
(११) श्री. चंद्रकांत पुरुषोत्तम घर्या "
(१२) श्री. महादेव बाळकृष्ण वढके "


— बँकर्स —
मुंबई प्रॉव्हिन्शिअल को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड, मुंबई

मॅनेजर : श्री. मा. गो. धारप, बी. एस्सी., एच्. डी. सी.
ऑनररी मॅनेजिंग डायरेक्टर : श्री. पि. गो. मेहता, बी. ए., एलएल. बी.

ही दिवाळी आमचे खातेदारांस व हितचिंतकांस सुखाची जावो.



खास दिवाळीकरितां




-: सुगंधी उटणें, तेलें :-
कडबोळ्याची व चकलीची भाजणी वापरा.

★ व्ही. पी. बेडेकर आणि सन्स लि. ★
दुकानें—गुगभाट, ठाकुरद्वार, दादर, कोट, परळ
— द. ना. हेजीब, ३० शुक्रवार पेठ, पुणें —

## शेडयूल्ड बँकांचा भारतांतील व्यवहार

ह्या शीर्षकाखालील तक्त्यांत शेडयूल्ड बँका ह्यांचा अर्थ, रिझर्व्ह बँक कायद्यांतील दुसऱ्या परिशिष्टांत दाखल असलेल्या बँका असा आहे. शेडयूल्ड बँकांचें वसूल भांडवल व रिझर्व्हज् ह्यांची बेरीज किमान ५ लक्ष रुपये असावी लागते. डिमांड देण्यांच्या ५% व टाइम देण्यांच्या २% एवढी रकम शेडयूल्ड बँकांना रिझर्व्ह बँकेंत कायम ठेवावी लागते. कर्जरोख्यांचे तारणावर कर्ज मिळणें, बिल्स रीडिस्कौंटिंग करतां येणें, सवलतीच्या दरानें रकमा आणतां–पाठवितां येणें, इत्यादि सोई शेडयूल्ड बँकांना रिझर्व्ह बँक देते.

"डिमांड" देणीं म्हणजे जीं देणीं मागतांक्षणींच दिलीं पाहिजेत, अशीं. उदाहरणार्थ, डिमांड ठेवी, टेलिग्राफिक व मेल ट्रान्स्फर्सची द्यावयाची बाकी, डिमांड ड्राफ्ट, मागणी येतांच द्यावयाचा असा सेव्हिंग ठेवींचा भाग, मुदत भरून गेलेल्या मुदती ठेवी, बिल्स पेएबल, आदा न झालेलीं डिव्हिडंड वॉरंटस, येतांच दिलीं पाहिजेत अशीं बँकांकडून घेतलेलीं कर्जें (रिझर्व्ह बँक व इंपीरिअल बँक सोडून इतर). टाइम देणीं म्हणजे मुदती ठेवी, रिझर्व्ह बँक व इंपीरिअल बँक खेरीज इतर बँकांकडून मुदतीनंतर परतफेडीच्या अटीवर घेतलेलीं कर्जें आणि इतर देणीं, जीं डिमांड देणीं नाहींत अशीं.

वसूल भांडवल, रिझर्व्ह फंड, नफा–तोटा पत्रकांतील शिलकी जमा रकम, इन्कमटॅक्सची तरतूद, बिल्स फॉर कलेक्शन अँड ॲक्सेप्टन्सेस आणि इतर देणीं (जी बाहेर कोणास द्यावयाचीं नाहींत अशीं) हीं डिमांड किंवा टाइम दोन्हीं देण्यांत समाविष्ट केलेलीं नसतात.

रिझर्व्ह बँकेकडून व इंपीरिअल बँकेकडून घेतलेलीं कर्जें म्हणजे त्या बँकांनीं कर्जदार बँकांची पाहिलेली सोय.

कॅशमध्यें तिजोरींतील चालू नोटा व नाणीं ह्यांचा समावेश होतो. परदेशांच्या चलनाचा कॅशमध्यें समावेश होत नाहीं.

रिझर्व्ह बँकेजवळील शिलकामध्यें, परदेशांत स्थापन झालेल्या बँकांनीं ११ (२) कलमाप्रमाणें रिझर्व्ह बँकेंत ठेवलेल्या रोख ठेवींचा समावेश होत नाहीं.

मनी ॲट कॉल किंवा ॲट शॉर्ट नोटीस म्हणजे इतर बँकांना त्यांच्या विनंतीनुसार दिलेलीं कर्जें, जीं मागणी करतांच किंवा पंधरवड्याच्या अथवा त्यापेक्षा लहान नोटिशीनें परत मागतां येतात. बँकेनें आपण होऊन दुसऱ्या बँकेंत ह्याच अटीवर पैसे ठेवले, तर त्यास मात्र मनी ॲट कॉल किंवा ॲट शॉर्ट नोटीस असें म्हणत नाहींत.

सरकारी रोख्यांतील गुंतवणूक म्हणजे मध्यवर्ती व राज्यसरकार ह्यांच्या रोख्यांची बँकेच्या पुस्तकांतील किंमत, ट्रेझरी बिलें, ट्रेझरी डिपॉझिट रिसीटस्, नॅशनल सेव्हिंग्ज सर्टिफिकिटें, हींहि ह्या गुंतवणुकींत आलींच.

ॲडव्हान्सेसचा अर्थ कर्जें, ओव्हरड्राफ्टस, कॅश क्रेडिटस, फॉरिन इंपोर्ट बिल्स, निगोशिएटेड लेटर्स ऑफ क्रेडिट, रिअलायझेबल अँड एन्फोर्सेबल इन इंडिया, पंधरवड्यापेक्षा ज्यास्त नोटिशीनें परत मिळण्याजोगी इतर बँकांना त्यांच्या विनंतीवरून दिलेलीं कर्जें, इ.

इनलंड बिल्स परचेस्ड अँड डिस्कौंटेड ह्यांत भारतांत काढलेलीं व पेड व्हावयाचीं बिलें येतात. विकत घेतलेले डिमांड ड्राफ्टस हेहि त्यांत येतात; एक्सपोर्ट बिलें त्यांत येत नाहींत.




स्थापना १९३६

**युनायटेड वेस्टर्न बँक, लिमिटेड, सातारा**

[ शेडयूल्ड बँक ]

पॅलेस स्ट्रीट, सातारा.

शाखा—मुंबई फोर्ट, मुंबई गिरगांव, पुणें, नाशिक व बार्शी.

ता. ३१-१२-५२ अखेर

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | १०,००,००० |
| वसूल भांडवल | रु. | ६,६९,९२५ |
| रिझर्व व इतर फंड्स | रु. | १,७९,००० |
| ठेवी | रु. | ६३,००,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | ७८,००,००० |

मुदत ठेवीवरील व्याजाचे दर :

| १ वर्ष | दोन वर्षे | तीन वर्षे | ५ वर्षे |
|---|---|---|---|
| रु. २-८-० | रु. २-११-० | रु. ३-०-० | रु. ३-८-० |

दहा अगर अधिक वर्षे रु. ४-०-० (चार फक्त)

| | | |
|---|---|---|
| सेव्हिंग्ज बँक | दरसाल दर शेंकडा | १-८-० |
| सेव्हिंग्ज डिपॉझिट | " | २-०-० |
| चालू डिपॉझिट | " | ०-८-० |

सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

सी. ह. जोशी, बी. ए., बी. कॉम्., मॅनेजर. शं. हं. साठे, बी. ए., एलएल. बी., चेअरमन



दि

**युनायटेड कमर्शिअल बँक लि.**

कलकत्ता.

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | ८ कोटी रु. |
| खपलेलें भांडवल | ... | ४ कोटी रु. |
| वसूल भांडवल | ... | २ कोटी रु. |
| रिझर्व्ह फंड | ... | ७५ लक्ष रु. |

: बोर्ड ऑफ डायरेक्टर्स :

जी. डी. बिर्ला (चेअरमन)

| | |
|---|---|
| ईश्वरीप्रसाद गोएंका व्हाइस चेअरमन | रमणलाल जी. सरय्या व्हाइस चेअरमन |
| अनंत चरण लॉ | महादेव एल. डहाणूकर |
| बैजनाथ जालन | मदनमोहन आर. रुइया |
| गोविंदलाल बंगूर | मोहनलाल एल. शहा |
| पी. डी. हिमतसिंगका | मोतीलाल तापुरिया |
| रामेश्वरलाल नोपानी | नवीनचंद्र मफतलाल |

: जनरल मॅनेजर :

बी. टी. ठाकूर

भारत, बर्मा, पाकिस्तान आणि मलाया येथील महत्त्वाच्या शहरीं व गांवीं बँकेच्या शाखा असल्यानें आणि बँकेच्या सबंध जगभर एजन्सीच्या व्यवस्था असल्यानें भारतांत व भारताबाहेर अत्युत्कृष्ट बँकिंगची सेवा करण्यास बँक सुसज्ज आहे.

## शेड्यूल्ड बँकांचा भारतांतील व्यवहार
( लक्ष रुपयांचे आंकडे )

| | माहिती पुरविणाऱ्या बँका | देणी: डिमांड — एकूण | डिमांड — बँका-बँकांतील | टाइम — एकूण | टाइम — बँका बँकांतील | डिमांड व टाइम — एकूण | डिमांड व टाइम — बँका-बँकांतील | घेतलेली कर्जे: रिझर्व्ह बँक — एकूण | रिझर्व्ह बँक — यूझन्स बिल्स | इंपीरिअल बँक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| शुक्रवारची सरासरी | | | | | | | | | | |
| १९४८–४९ ... | ९४ | ६७४,५६ | २६,५९ | ३०३,८८ | ४९ | ९७८,४४ | २७,०८ | ३,३३ | ... | ... |
| १९५१–५२ ... | ९४ | ५९३,७३ | २३,२० | २९०,८२ | ६१ | ८८४,५५ | २३,८१ | १३,८२ | १६,८९ | ... |
| १९५२–५३ ... | ९१ | ५४६,२३ | १३,०४ | ३०९,२६ | ३,४३ | ८५५,४९ | १६,४६ | ११,२० | ६९५ | ५३८ |

| | जिंदगी: कॅश (नोटा व नाणीं) | रिझर्व्ह बँकेंतील शिलका | (११+१२) चें ६ शीं प्रमाण % | इतर बँकांत करंट खात्यावर शिलका | मनी ॲट कॉल व ॲट शॉर्ट नोटीस | सरकारी रोखे | १६ चें ६ शीं प्रमाण % | ॲड्व्हान्सेस | इनलंड बिल्स, परचेस्ड व डिस्कौंटेड | (१८+१९) चें ६ शीं प्रमाण % |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ | १७ | १८ | १९ | २० |
| शुक्रवारची सरासरी | | | | | | | | | | |
| १९४८–४९ ... | ३७,५१ | ७९,४६ | ११·९५ | ... | ... | ... | ... | ४२४,८५ | १६,४४ | ४५·१० |
| १९५१–५२ ... | ३७,३३ | ५७,२९ | १०·७० | ११,९१ | ११,४० | ३०३,४८ | ३४·३१ | ५२३,५९ | २२,८१ | ६१·७७ |
| १९५२–५३ ... | ३३,३३ | ५१,८२ | ९·९५ | ११,५७ | १७,२६ | ३०६,३४ | ३५·८१ | ४६१,६४ | ३८,४७ | ५८·४६ |

## देशांतील आर्थिक दुःस्थितीवर उपाय
( श्री. वा. पुं. वर्दे )

" गेल्या एका वर्षांत आर्थिक परिस्थितीला जें वळण मिळालें त्यानें थोडीफार चमत्कारिकच परिस्थिति निर्माण केली आहे. पैसाविषयक सरकारी धोरणानें चलनफुगवट्याला आळा पडून आर्थिक परिस्थिति सुधारली, उद्योगधंद्यांचें व शेतकीचें उत्पादनहि वाढलें; पण त्याचा फायदा सर्वसाधारण ग्राहकवर्गाला मात्र लाभलेला नाहीं. उद्योगधंद्यांतील खर्चाचें प्रमाण वाढीचेंच राहिलें असून याउलट निर्यात व्यापारी पेठांचीं कक्षा आकुंचन पावूं लागली आहे गेल्या वर्षीच्या व्यापारमंदीच्या वावटळीनंतर उसळलेली तेजीची लाट अल्प काळच टिकूं शकली आणि त्यामुळें बेकारीचा प्रश्न आतां अधिकच तीव्रपणें जाणवूं लागला आहे. अर्थमंत्र्यांनीं ही व्यापारमंदी संक्रमणकालाचा एक अपरिहार्य विशेष असल्याचें निर्देशिलें आहे. याचा अर्थ जर युद्धकालीन अर्थपरिस्थितींतून शांतताकालीन अर्थपरिस्थितींत देश पदार्पण करीत आहे असा करावयाचा असेल, तर नजीकच्या भावी कालांत शांतताकालाला अनुरूप अशी व्यापार व उद्योगवृद्धि घडून येण्याचा संभव आहे असें खात्रीनें सांगता येत नाहीं. विशेषतः खाजगी मालकीकडून सरकारी मालकीकडे औद्योगिक प्रवर्तनाची जबाबदारी जाऊं लागली आहे; अशा परिस्थितींत ही अनिश्चितता विशेष भासूं लागते. सरकारच्या पंचवार्षिक कार्यक्रमाला पाठिंबा देणें हें प्रत्येकाचें कर्तव्य आहे; पण गरजेच्या मानानें हा कार्यक्रम किती पुरा पडूं शकेल याची शंकाच आहे.

### कसा मार्ग काढतां येईल ?

"आजच्या या गोंधळाच्या आर्थिक परिस्थितींतून कसा मार्ग काढतां येईल याचें केवळ स्थूल मानानें दिग्दर्शन करतां येईल. उद्योगधंद्यांतील खर्चाचें मान कमी झाल्याशिवाय मालाच्या किंमतीमानांत बदल होणार नाहीं. तो खर्च कमी व्हावयाचा तर मजुरीच्या खर्चात कपात झाली पाहिजे आणि ती तशी व्हावयाची, तर राहणीचा खर्च कमी झाला पाहिजे; ही परंपरा लक्षांत घेतां किंमतीमानावर सरळच हल्ला चढविण्याची जरूरी भासेल आणि त्यासाठी पैशावरील नियंत्रण अधिकच दृढ करावें लागेल. हें करणें भाग आहे. कारण, परदेशच्या व्यापारपेठांतील स्थान टिकवायचें तर उत्पादन वाढलें पाहिजे आणि तें या व्यापारपेठांतील स्पर्धेत टिकाव लागूं शकेल अशी खर्चमर्यादा ठेवून वाढलें पाहिजे. पण लोकशाही सरकारला बेकारीच्या या प्रश्नावर तावडतोब इलाज योजण्याचीहि गरज भासणें स्वाभाविक आहे व त्यामुळें पैशावरील नियंत्रणें ढिलें करणें आवश्यक होऊन त्यायोगें चलनफुगवट्याचे जे कांहीं दुष्परिणाम होत असतात, त्यांना तोंड द्यावें लागेल. सरकार यांपैकी कोणत्या उपायाचा अवलंब करील हें सांगतां येत नाहीं; पण हें धोरण कांहींहि स्वीकारण्यांत आलें तरी त्याचीं सूत्रें श्री. चिंतामणराव देशमुख यांच्यासारख्या व्यवहारचतुर अर्थमंत्र्यांच्या हातीं आहेत, ही त्यांत मोठीच समाधानाची बाब आहे." ( सारस्वत बँक लि. च्या वार्षिक सभेंतील अध्यक्षीय भाषण ).

## प्रायोगिक बँकेच्या योजनेचें स्वागत

### सहकाराचीं आश्वासनें

"प्रायोगिक बँकेची योजना अत्यंत उपयुक्त आहे. बँका व व्यापारी शिक्षणसंस्था यांच्या सहकार्यानें हा उपक्रम यशस्वी होईल अशी आशा वाटते. व्यक्तिशः व संस्थेच्या वतीनें जें साहाय्य करणें शक्य होईल, तेवढें आनंदानें करूं"

ज्यं. म. जोशी

प्रिन्सिपॉल बृहन्महाराष्ट्र कॉलेज ऑफ कॉमर्स पुणें ४.

३०-१०-१९५२

"आपल्या प्रायोगिक बँकेची योजना वाचली. उपक्रम फार स्तुत्य आहे एवढेंच नव्हे तर आवश्यक आहे. बँकिंगसंबंधीं पुस्तकी ज्ञानाच्या जोडीला प्रात्यक्षिक ज्ञान दिलें गेल्या खेरीज विद्यार्थ्यांमध्यें अवश्य तो आत्मविश्वास निर्माण होत नाहीं आणि म्हणून शिक्षण अपुरेंच ठरतें. प्रत्यक्ष ज्ञान देणें जरूर असलें तरी तें दिलें जाण्याचे कामीं अडचणीहि अनंत आहेत व त्या खऱ्याहि आहेत. तथापि कांहींतरी मार्ग हा काढलाच पाहिजे. त्या दृष्टीनें ह्या योजनेंत सुचविलेला प्रयत्न करून पाहणें अवश्य आहे. या कामीं मला जें कांहीं सहकार्य करतां येईल तें मी आनंदानें करीन."

ग. कृ. मोघटकर

संस्थापक, डेक्कन इन्स्टिटयूट ऑफ कॉमर्स, पुणें.

२९-१०-५२

"प्रायोगिक बँकेचा आराखडा आम्हीं वाचला. या उपक्रमांत व्यक्तिशः जो सहकार करतां येईल तो आम्हीं करूं."

चिं. वि. जोग,

मॅनेजर, दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.

गो. गं साठे,

मॅनेजर, बँक ऑफ पूना लि.

गो. धों. जोगळेकर,

मॅनेजर, दि प्रेसिडेन्सी इंडस्ट्रिअल बँक लि.

२९-१०-५२.

---

## चित्रपट निर्मितींत भारताचा दुसरा क्रमांक

चित्रपट निर्मितीच्या बाबतींत भारताचा जगांत दुसरा; अमेरिकेच्या खालोखाल, अनुक्रम लागतो. १९४२ पर्यंत अमेरिकेंत दरसाल ५०० चित्रपट तयार होत; १९३७ मध्यें तर ५६७ तयार झाले होते. १९४३ पासून मात्र अमेरिकेंतील निर्मिति ४०० चित्रपटांच्यावर गेलेली नाहीं; फक्त एकदांच, १९४४ मध्यें, ४३० चित्रपट तयार झाले होते.

भारतांत १९३२ मध्यें ८३ चित्रपट तयार झाले. त्यांची संख्या वाढत जाऊन १९३५ मध्यें ती २३३ झाली. १९४७ सालापर्यंत दुसऱ्या कोणत्याहि वर्षी एवढी चित्रपट निर्मिती झाली नाहीं. १९५० मध्यें २४१ चित्रपट तयार झाले.

युद्धापूर्वी, जपानचें वार्षिक उत्पादन ५०० चे वर होतें. आतां तें २०० चित्रपटांचें आसपास आहे. मेक्सिकोमधील निर्मिती वाढत वाढत १२५ पर्यंत पोचली आहे.

युरोपमध्यें इटली देश अग्रेसर आहे. ग्रेटब्रिटनमधील निर्मिति १९३७ सालापासून कमी होत चालली आहे. १९४६ मध्यें फक्त ४६ चित्रपट तयार झाले. १९५१ मधील निर्मिति ११४ चित्रपटांची झाली.

## दर माणशीं दररोज किती अन्न मिळतें?

### भारतीयाला सर्वांत कमी

बहुतेक सर्व देशांतून युद्धापूर्वीइतकें अन्न लोकांच्या वांट्यास येऊं लागलें आहे. कांहीं देशांत तर तें वाढलें आहे. उलट ऑस्ट्रिया, डेन्मार्क, इजिप्त, प. जर्मनी व भारत ह्या देशांतील लोकांना माणशीं अन्न पूर्वीपेक्षां बरेच कमी कॅलरी मिळतें. बर्मा, इटली, जपान व पोलंड येथील लोकांनाहि अन्न जरा कमी मिळतें. परंतु, अन्न मिळण्याच्या बाबतींत बर्मा व भारत हे देश सर्वांत खालीं आहेत.

दर माणशीं दररोज किती अन्न मिळतें?

**३,००० किंवा त्या पेक्षां अधिक कॅलरी**
आयर्लंड, न्यूझीलंड, ऑस्ट्रेलिया, स्वित्झरलंड, कॅनडा, स्वीडन, आइसलंड, फिनलंड, युनायटेड स्टेटस, अर्जेंटिना, नॉर्वे, डेन्मार्क, ग्रेट ब्रिटन आणि नेदरलंडस.

**२,८००-२,९९९ कॅलरी**
युराग्वे, बेल्जम, लक्झेंबर्ग व प. जर्मनी

**२,६००-२७९९ कॅलरी**
फ्रान्स, ऑस्ट्रिया, क्युबा, झेकोस्लोव्हाकिया, इस्राएल, द. आफ्रिका व पोलंड.

**२,४००-२,५९९ कॅलरी**
ग्रीस, टर्की, सायप्रस व इटली

**२,२००-२,३९९ कॅलरी**
चिली, ब्राझील, इजिप्त, कोलंबिया, मॉरिशस व वेनेझुएला

**२,०००-२,१९९ कॅलरी**
जपान, सिलोन, इंडोचायना व पाकिस्तान

**२,००० कॅलरीपेक्षां कमी**
बर्मा व भारत

---

## भारतीयांची आयुर्मर्यादा सर्वांत कमी

जगांतील सर्वच भागांत, आतां जन्माला येणाऱ्या अर्भकांना त्यांच्या पूर्वजांपेक्षा दीर्घतर आयुष्य लाभण्याचा योग आहे. वेगवेगळया देशांत आयुर्मर्यादा कमी-अधिक वाढली आहे. तुलना करतांना हें लक्षांत ठेवलें पाहिजे, कीं एकाच काळा-संबंधीचे आकडे सर्व देशांबाबत उपलब्ध नाहींत. परंतु, प्रवृत्ति कळण्यास तुलना पुरेशी आहे. भारतासंबंधीचे आकडे जरा जुने आहेत, परंतु आपल्या मनुष्यबळाचा होणारा नाश दर्शविण्यास ते पुरेसे भयानक आहेत.

जगण्याची अपेक्षा
वर्षे (जन्माचे वेळीं)

| देश | मुलगे | मुली |
|---|---|---|
| कॅनडा | ६५·१८ | ७९·०५ |
| युनायटेड स्टेटस | ६१·६० | ६५·८९ |
| इस्राएल | ६७·३ | ७०·१ |
| जपान | ५६·१९ | ५९·६१ |
| फ्रान्स | ६१·९ | ६७·४ |
| जर्मनी | ५७·७२ | ६३·४४ |
| नेदरलंडस | ६९·४ | ७१·५ |
| ग्रेट ब्रिटन | ६६·५ | ७१·२ |
| ऑस्ट्रेलिया | ६६·०७ | ७०·६३ |
| भारत | २६·९१ | २६·५६ |

### भारतांत अर्भकांच्या मृत्यूचें प्रमाण फार मोठें

अर्भकांच्या मृत्यूंच्या संख्येचा विचार केला, तर भारतीयांची केवढी मोठी हानि होत आहे, हें दिसून येईल. बहुतेक सर्व देशांतून जरी ह्या बाबतींत सुधारणा घडून येत असली, तरी इतर देशांतील आरोग्याची परिस्थिति भारतापेक्षा फारच समाधानकारक आहे. दर १,००० जिवंत जन्मलेल्यापैकीं सरासरीनें किती जणांचे एक वर्षाचे आंत मृत्यू घडून येतात, त्याचे आंकडे खालीं दिले आहेतः—

| देश | १९५१ चे आंकडे |
|---|---|
| इजिप्त | १३५.५ |
| दक्षिण आफ्रिका ( युरोपियन लोक ) | ३३.५ |
| कॅनडा | ४०.७ |
| युनायटेड स्टेटस | २८.६ |
| सिलोन | ८८.३ |
| जपान | ५७.१ |
| डेन्मार्क | २८.८ |
| नेदरलंडस | २६.६ |
| स्वीडन | २१.४ |
| ग्रेट ब्रिटन | २९.६ |
| ऑस्ट्रेलिया | २५.२ |
| भारत | १२२.८ |

### भारतीय सेनेची कामगिरी

भारतीय सेनेनें अधिक धान्य पिकविण्याच्या मोहिमेंत भाग घेण्यास सुरुवात केल्यापासून चांगलीच प्रगति केली आहे. १९५२ च्या जूनमध्यें भारतीय सेनेनें ५,००० एकर जमीनींत शेती केली होती. १९५३ च्या जूनपर्यंत आणखी ४,००० एकर जमीन लष्करानें लागवडीखालीं आणली. अन्नधान्याच्या निर्मितींतहि ७,००० टनापासून १७,००० टनापर्यंत प्रगति झाली आहे.

### २०० माणसांचें कुटुंब

उत्तर प्रदेशांतील जामनगर तालुक्यांतील एका गांवीं हाजी उस्मान नांवाचा एक मुसलमान राहतो. त्याचें वय ११० वर्षांचें असून त्याच्या कुटुंबांत २२७ माणसें आहेत. त्याची सध्यांची चवथी बायको त्याच्यापेक्षा वयानें ५० वर्षांनीं लहान आहे. हाजी उस्मान हा धंद्यानें खलाशी होता. त्याची दृष्टि अद्याप शाबूत आहे. नियमानें सहलीला जाणें आणि दिवसा दर चार तासांनीं खाणें, असा त्याचा कार्यक्रम आहे.

### 'दो बिघा जमीन' लोकप्रिय

बिमल रॉय ह्यांनीं दिग्दर्शित केलेला 'दो बिघा जमीन' हा चित्रपट युरोपमध्यें बराच लोकप्रिय झाला आहे. ता. २५ ऑक्टोबर पासून तो लंडनमध्यें दाखविण्यांत येत आहे. फ्रेंच व इटालिअन वृत्तपत्रांतून चित्रपटाचें कौतुक करणारे परीक्षणात्मक लेख प्रसिद्ध झाले आहेत.

### सौराष्ट्र इंडस्ट्रिअल कॉर्पोरेशन

सौराष्ट्र राज्य सरकारनें आपली स्वतंत्र इंडस्ट्रिअल फिनॅन्स कॉर्पोरेशन स्थापन करण्याकरतां १ कोटी रुपयांचे भाग विक्रीला काढले होते. भाग मिळविण्यासाठी इतके अर्ज आले कीं, सरकारला त्यांची मुदत आणखी कांहीं दिवस वाढविणें भाग पडलें.

### अमेरिका व मेक्सिको ह्यांचें सहकार्य

अमेरिका आणि मेक्सिको ह्यांच्या सरहद्दीवर बांधण्यांत आलेल्या एका धरणाचें उद्घाटन प्रे. आयसेन होअर ह्यांनीं केलें. उत्तर अमेरिकेंतील दोन सरकारांनीं ह्या बाबतींत सहकार्य केल्याचें हें पहिलेंच उदाहरण आहे. विजेची निर्मिति, पुरावर नियंत्रण आणि शेतीला पाणी, अशीं त्रिविध कार्यें वरील धरणानें साधणार आहेत.

### नवरदेवांचा जबर भाव

उत्तर प्रदेश विधिमंडळांत हुंड्याच्या पद्धतीवर चर्चा चालू असता निरनिराळ्या दर्जाच्या नवरदेवांचे भाव एका सभासदानें सांगितले, ते असेः—आय. ए. एस्. ऑफिसर ३० ते ४० हजार रुपये; प्रांतिक सरकारचे नोकर २० हजार रुपये; सरकारी विद्यापीठाचा इंजिनिअरिंगचा पदवीधर १० हजार रुपये; कॉलेजमधील लेक्चरर अगर विद्यापीठांतील प्राध्यापक ४ हजार रुपये.

### आपोआप मिटणारीं तावदानें

लंडनमध्यें धांवणाऱ्या आगगाड्यांच्या खिडक्यांना नवीन धर्तीचीं तावदानें लावण्याचे प्रयोग सध्या चालू आहेत. पावसाचे शिंतोडे तावदानावर पडल्याबरोबर तीं आपोआप मिटतील आणि पाऊस बंद झाल्यावर आपोआप उघडतील, अशा प्रकारची यांत्रिक रचना तावदानांना बसविण्यांत आली आहे.

### चीनमधील नवे कारखाने

युद्धाचा संभव लक्षांत घेऊनच चीनमधील पंचवार्षिक औद्योगिक कार्यक्रम आंखण्यांत आला आहे. सर्व नवे कारखाने देशाच्या अंतर्गत भागांत खोलवर उभारण्यांत येत आहेत. मोटारी, विमानें, रणगाडे व तोफा निर्माण करण्यावर योजनेंत भर देण्यांत आला आहे.

दि कमर्शिअल बँक लि., कोल्हापूर
( स्थापना १९३६ )
रे. नं. २७० पो. बॉ. नं. १८
हेड ऑफिसः—लक्ष्मीपुरी, कोल्हापूर.
ब्रँचेसः—( १ ) इचलकरंजी ( २ ) हुपरी
बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.
विशेष माहितीसाठीं समक्ष भेटा अगर लिहा.
आमच्या भागीदारांना, खातेदारांना व हितचिंतकांना नवें वर्ष सुखाचें व भरभराटीचें जावो.
दि कमर्शिअल बँक लि. कोल्हापूर.

महाराष्ट्र भुवन, बेळगांव
मुजावर गल्ली.
महाराष्ट्राचे व कर्नाटकचे अत्यंत [illegible] व सुखसोईनें युक्त
बेळगांव मुजावरगल्ली. मालक महाराष्ट्र भुवन

# दि भारत इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड

—पुणें शहर—

पो. बॉ. नं. ५८६ (स्थापना १९१८) टेलि- { फोन-२०४६ / ग्राम-भाईबँक

शाखा....(१) पुणें लष्कर (२) बारामती (३) श्रीरामपूर (४) लोणावळा (५) खोपोली (६) ओझर-तांबट.

## एकूण खेळतें भांडवल रु. ६० लाखांचे वर

संचालक मंडळ

(१) श्री. वा. भ. वाळवेकर, अध्यक्ष
(२) श्री. के. पां. जोशी, उपाध्यक्ष
(३) श्री. भा. प. केळकर
(४) श्री. का. म. महाजन
(५) सौ. इंदुमतीबाई फडके, बी. ए. (ऑ.), बी. टी.
(६) श्री. रा. म. गिरमे, श्रीरामपूर
(७) श्री. ह. ब. गिरमे, माळीनगर
(८) श्री. रा. प्र. दामोदरे, बारामती
(९) श्री. रा. बा. साळवेकर, बी. ए., एलएल. बी., मॅनेजिंग डायरेक्टर.
(१०) श्री. नी. ना. क्षीरसागर मॅनेजिंग डायरेक्टर

बँकेस सहर्ष जाहीर करण्यास आनंद होतो कीं, बँकेचें लक्ष्मी रोडवरील स्वतःचे भव्य इमारतींत ता. ७ नोव्हेंबर १९५३ रोजीं दीपावलीचे शुभ मुहूर्तावर बँकेचें ऑफिस जात असून तेथें इतर बँकिंगचे व्यवहाराबरोबरच सेफ डिपॉझिट लॉकर्सची व्यवस्थाहि करण्यांत आली आहे.

रा. बा. साळवेकर, बी. ए., एलएल. बी., }
नी. ना. क्षीरसागर } मॅनेजिंग डायरेक्टर्स

आमचे खातेदार, भागीदार व हितचिंतक यांना ही दीपावलि आनंददायक जावो.



# धी बॉम्बे स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक, लिमिटेड

स्थापना १९११

मुख्य कचेरी : ९, बेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई

टेलिफोन नं. २५४६१, ३१६८६
पोस्ट बॉक्स नं. ४७२
तारेचा पत्ता-फॉर्मरबँक

## ह्या बँकेंत गुंतविलेला पैका शेतकरीवर्ग व सर्व प्रकारच्या सहकारी संस्था ह्यांच्याच उपयोगासाठी दिला जातो.

| | | |
|---|---|---|
| भरपाई झालेलें भांडवल—भागीदारांतर्फे रु. ३३,९९,१५० / मुंबई सरकारतर्फे रु. १६,००,००० | ... | रु. ५९,९९,१५० |
| गंगाजळी व फंड | ... ... ... | रु. ५४,३३,९०० |
| ठेवी | ... ... ... | रु. ९,२५,२६,५०० |
| खेळतें भांडवल | ... ... ... | रु. १२,२९,०२,८०० |

**१६ जिल्ह्यांमध्यें ६७ शाखा**

भारतांतील प्रमुख शहरीं हुंड्या, बिलें वगैरे वसुलीची व्यवस्था केली जाते.
सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात. शर्तींसाठीं चौकशी करावी.

वा. पुं. वर्दे
ऑ. मॅनेजिंग डायरेक्टर.

॥ श्री ॥

# दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लि., पुणें २.

## शिक्षण किंवा आरोग्यसंस्थांना व्यक्तिशः देणगी मिळणें ह्याला कालावधि लागतो.

शेअरवर कांहीं नफा हा स्वार्थ
व
संस्थांना नफ्यांतून देणगी हा परमार्थ.

कंपनी स्थापनेच्या वेळेस कंपनीच्या
आर्टिकलमध्यें केलेली योजना.

"To subscribe or contribute or otherwise to assist or to guarantee money to charitable, benevolent, religious, scientific, national or other institutions or objects which shall have any moral or other claims to support or aid by the Company either by reason of locality of operation or of public and general utility or otherwise."

वरील योजनेप्रमाणें १९४३ सालीं अल्प कार्य करतां आलें. गूळबंदीमुळें १० वर्षें थांबावें लागलें. नवीन हजार टनांच्या मशिनरीनें पुनः कांहीं अल्प कार्य करण्याचें साधन कंपनीच्या हातीं आलें आहे.

सिंडिकेट यशस्वी रीतीनें चालावी अशा भावनेच्या भागीदारांचे व ठेवीदारांचे आभारी आहोंत.

यंदाची दीपावलि व नूतन वर्ष सिंडिकेटच्या भागीदारांना व ठेवीदारांना आनंदाचें व सुखाचें जावो.

९८० सदाशिव पेठ,
लक्ष्मी रोड, पुणें २.

चंद्रशेखर गोविंद आगाशे,
मॅनेजिंग एजण्टस


हें पत्र पुणें, पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.